म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र २२८३
IRBK-0102283
IRBK-0102283
IRBK-0102283

3 MAY 1973

नाटक —
१५०

दा. क्र.-2263
28 AUG 1982

# प्रस्तावना.

नाटक म्हणजे संसार—चित्र असें म्हणतात: त्याचप्रमाणें रंगभूमि म्हणजे संसार—चित्रालय असें म्हणतां येईल. चित्रालयामध्यें जशीं विविध देशचीं व विविधकाळचीं चित्रें मांडून ठेविलीं असतां विशेष शोभा येते त्याचप्रमाणें रंगभूमीवरही निरनिराळ्या देशकालाचीं नाटकें केलीं असतां मौज होते. रंगभूमि ही एकदेशीय अशी चीज खास नव्हे. सर्व जगाला साधारण अशा ज्या कांहीं गोष्टी आहेत त्यांपैकीं ही एक होय. आतां परकीय चालीरीतींचें नाटक स्वदेशी रंगभूमीवर एकाएकी पसंत पडत नाहीं व तें गोड लागण्यास पहाणाराचे अंगीं चांगली सहृदयता लागते ही गोष्ट खरी, तरी पण सहृदयतेचें बीज मनुष्यमात्राचे ठिकाणीं स्वाभाविक असतेंच, मात्र त्याचा विकास विदेशी संसार चित्रांचें चिरपरिचयानें होतो. केवळ पौराणिक नाटकांची अशी एक वेळ आपल्या इकडे होऊन गेली त्या वेळीं, हल्लीं लोकप्रिय असलेल्या उत्तम (बुकिश) नाटकांपैकीं एखादें रंगभूमीवर आणलें असतां प्रेक्षकांस कसेंसेंच वाटलें असतें. बेगडीचें किरीट घातलेला इंद्र व लुगडीं नेसलेला रावण हींच सोंगें जोंपर्यंत डोळ्यांत बसलेलीं होतीं तोंपर्यंत साधारण तुमच्या आमच्या साख्या पोषाख केलेला राव किंवा पंत रंगभूमीवर आला असतां लोकांस चुकल्या चुकल्या सारखें खचीत झालें,

असतें. इल्लींची मजल स्वदेशी ऐतिहासिक नाटकाप-
र्यंत सहज येऊन बसलेली असल्यानें किंचित् पुढें धां-
व मारून, तरुणी शिक्षणासारखा आधुनिक फार्स, किंवा हॅमले-
ट अथेल्लो किंवा फाल्गुनराव यांसारखीं विदेशी रिवाजा-
चीं नाटकें रंगभूमीवर आणलेलीं लोकांस गोड लागू
लागलीं आहेत. तात्पर्य, काळ प्रतिक्षणीं बदलत
असतो व जनरुचि आपोआप उत्पन्न होत नसून तिला
उत्पन्न करून कायमचें वळण लावणें हें ज्या त्या कालच्या
दूरदर्शी, धीट व बुद्धिमान पुरुषांकडे असतें. इंग्लंडांतील
रंगभूमीवर "महंमद" यासारखीं नाटकें, पौर्वात्य
चालीरीतीस धरून व पांचव्या सहाव्या शतकाचे
पोषाख घालूनही होतात व तीं लोकांस आवड-
तात. आपल्याकडे अजून तितकी मजल आले-
ली नाहीं. विदेशी नांवें व पोषाख घेऊन केलेलीं नाटकें
आपल्या रंगभूमीवर आवडावयाचीं नाहींत असा सा-
र्वत्रिक समज होऊन राहिलेला दिसतो. (मात्र
कोणी या समजाचें यथार्थत्व प्रत्यक्ष प्रयोग
करून पाहिलें असेलसें वाटत नाहीं.) पाश्चिमात्य
लोकांचे सहवासानें व इंग्रजी ग्रंथांचे वाचनानें विदेशी
चालीरीतींचा आम्हां सुशिक्षित लोकांना पुष्कळ परिचय
होऊन त्यांतलें विपरीतत्व बहुतेक नाहींसें झालें आहे म्हटलें
तरी चालेल. परंतु पोषाख व नांवें यांची बूज मात्र अद्याप
आपणामधून निघालेली नाहीं. याकरितां क्रांतीचे काळांत
नव्याची आवड व जुन्याची ओढ या दोन विषम शक्तींत
सांपडलेल्या सद्भावी पण अपवाद भीरु अशा सुधारकांस
जीं ढोंगें व ज्या बतावण्या कराव्या लागतात त्याच प्रका-

युक्त्या नाटककारांसही प्रस्तुत कराव्या लागत
र्हत. केवळ नांवें बदलून अगदींच ओंगळ दिस-
ाऱ्या विदेशी जनरीतीचे प्रसंगांना स्वदेशी कल्हयी
ेली असतां, मग बाकी स्वदेशी रंगप्रयोगास काय
ाटेल तें असलें तरी चालतें इतकी स्थिति हल्लीं येऊन
ोचली आहे. रंगप्रयोग सुशिक्षित व अशिक्षित दोनही
प्रकारच्या लोकांकरितां असतात यामुळें साधारणतः भा-
षा मात्र कधींही बदलून चालावयाचें नाहीं. एरवीं पोषाख
व नांवें बदलूनही प्रयोग मनोरंजक करणें शक्य आहे
असें माझें स्वतःचें मत आहे. क्रमाक्रमानें साहसप्रिय नाटक-
मंडळ्या निघून जें आज साध्य दिसतें तें उद्यां सिद्ध
होईल अशी मला फार उमेद आहे.

प्रस्तुतचें माझें नाटक वर सांगितलेल्या सुधारकांचे
युक्तींचाच अंमल करून लिहिलेलें आहे. मूळ गोष्ट, पात्रें,
रीतरिवाज, व कथानक प्रसंग सगळे कांहीं अस्सल
विलायती; तथापि नाटकांतील विनोद, स्वभाववर्णन
व काव्य हीं जगांतील सर्व देशच्या रसिक पुरुषांनीं आ-
नंदानें सेवन करावीं अशीं आहेत. तरी पण त्यांची गोडी
स्वदेश बांधवांस देतांना मला नुसतें भाषांतर करावें लागलें
एवढेंच नव्हे तर नांवें, नातीं, व क्वचित् प्रसंगही मराठी-
शाही थाटाचे करावे लागले. हा दोष मी माझा समजत
नाहीं, नाटककंपन्यांचा आहे. उत्तम भाषांतर कराव-
याची जबाबदारी आपणांवर घेऊन, मला नांवें व
प्रसंग अगदीं जसेच्या तसे सहज ठेवतां येतील. परंतु
नरुचि बनविण्याचें सुधारकी काम करण्यास धाडसी
शी नाटककंपनी मला कोठें मिळणार ! व नाटक-

असते. हल्लींची मजल स्वदेशी ऐतिहासिक नाटका- यैत सहज येऊन बसलेली असल्यानें किंचित् पुढें धां- मारून, तरुणी शिक्षणासारखा आधुनिक फार्स, किंवा हॅमले- ट अथेल्लो किंवा फाल्गुनराव यांसारखीं विदेशी रिवाज- चीं नाटकें रंगभूमीवर आणलेलीं लोकांस गोड लाग- लागलीं आहेत. तात्पर्य, काळ प्रतिक्षणीं बदलत असतो व जनरुचि आपोआप उत्पन्न होत नसून तिला उत्पन्न करून कायमचें वळण लावणें हें ज्या त्या कालच्या दूरदर्शी, धीट व बुद्धिमान पुरुषांकडे असतें. इंग्लंडांतील रंगभूमीवर "महंमद" यासारखीं नाटकें, पौर्वात्य चालीरीतीस धरून व पांचव्या सहाव्या शतकाचे पोषाख घालूनही होतात व तीं लोकांस आवड- तात. आपल्याकडे अजून तितकी मजल आले- ली नाहीं. विदेशी नांवें व पोषाख घेऊन केलेलीं नाटकें आपल्या रंगभूमीवर आवडावयाचीं नाहींत असा सा- र्वत्रिक समज होऊन राहिलेला दिसतो. ( मात्र कोणी या समजाचें यथार्थत्व प्रत्यक्ष प्रयोग करून पाहिलें असेलसें वाटत नाहीं. ) पाश्चिमात्य लोकांचे सहवासानें व इंग्रजी ग्रंथांचे वाचनानें विदेशी चालीरीतींचा आम्हां सुशिक्षित लोकांना पुष्कळ परिचय होऊन त्यांतलें विपरीतत्व बहुतेक नाहींसें झालें आहे म्हटलें तरी चालेल. परंतु पोषाख व नांवें यांची बूज मात्र अद्याप आपणामधून निघालेली नाहीं. याकरितां क्रांतीचे काळांत नव्याची आवड व जुन्याची ओढ या दोन विषम शक्तींत सांपडलेल्या सद्भावी पण अपवाद भीरु अशा सुधारकांस जीं ढोंगें व ज्या बतावण्या कराव्या लागतात त्याच प्रका-

युक्त्या नाटककारांसही प्रस्तुत कराव्या लागत हेते. केवळ नांवें बदलून अगदींच ओंगळ दिसणाऱ्या विदेशी जनरीतीचे प्रसंगांना स्वदेशी कल्हयी केली असतां, मग बाकी स्वदेशी रंगप्रयोगास काय वाटेल तें असलें तरी चालतें इतकी स्थिति हल्लीं येऊन पोंचली आहे. रंगप्रयोग सुशिक्षित व अशिक्षित दोनही प्रकारच्या लोकांकरितां असतात यामुळें साधारणतः भाषा मात्र कधींही बदलून चालावयाचें नाहीं. एरवीं पोषाख व नांवें बदलूनही प्रयोग मनोरंजक करणें शक्य आहे असें माझें स्वतःचें मत आहे. क्रमाक्रमानें साहसप्रिय नाटकमंडळ्या निघून जें आज साध्य दिसतें तें उद्यां सिद्ध होईल अशी मला फार उमेद आहे.

प्रस्तुतचें माझें नाटक वर सांगितलेल्या सुधारकांचे युक्तींचाच अंमल करून लिहिलेलें आहे. मूळ गोष्ट, पात्रें, रीतरिवाज, व कथानक प्रसंग सगळे कांहीं अस्सल विलायती; तथापि नाटकांतील विनोद, स्वभाववर्णन व काव्य हीं जगांतील सर्व देशच्या रसिक पुरुषांनीं आनंदानें सेवन करावीं अशीं आहेत. तरी पण त्यांची गोडी स्वदेश बांधवांस देतांना मला नुसतें भांषातर करावें लागलें एवढेंच नव्हे तर नांवें, नातीं, व क्वचित् प्रसंगही मराठीशाही थाटाचे करावे लागले. हा दोष मी माझा समजत नाहीं, नाटककंपन्यांचा आहे. उत्तम भाषांतर करावयाची जबाबदारी आपणांवर घेऊन, मला नांवें व प्रसंग अगदीं जसेच्या तसे सहज ठेवतां येतील. परंतु नरुचि बनविण्याचें सुधारकी काम करण्यास धाडसी शी नाटककंपनी मला कोठें मिळणार ! व नाटक-

असते. हल्लींची मजल स्वदेशी ऐतिहासिक नाटकाप-र्यंत सहज येऊन बसलेली असल्यानें किंचित् पुढें धाव मारून, तरुणी शिक्षणासारखा आधुनिक फार्स, किंवा हॅमलेट अथेल्लो किंवा फाल्गुनराव यांसारखीं विदेशी रिवाजाचीं नाटकें रंगभूमीवर आणलेलीं लोकांस गोड लागूं लागलीं आहेत. तात्पर्य, काळ प्रतिक्षणीं बदलत असतो व जनरुचि आपोआप उत्पन्न होत नसून तिला उत्पन्न करून कायमचें वळण लावणें हें ज्या त्या कालच्या दूरदर्शी, धीट व बुद्धिमान पुरुषांकडे असतें. इंग्लंडांतील रंगभूमीवर "महंमद" यासारखीं नाटकें, पौर्वात्य चालीरीतीस धरून व पांचव्या सहाव्या शतकाचे पोषाख घालूनही होतात व तीं लोकांस आवडतात. आपल्याकडे अजून तितकी मजल आलेली नाहीं. विदेशी नांवें व पोषाख घेऊन केलेलीं नाटकें आपल्या रंगभूमीवर आवडावयाचीं नाहींत असा सार्वत्रिक समज होऊन राहिलेला दिसतो. ( मात्र कोणी या समजाचें यथार्थत्व प्रत्यक्ष प्रयोग करून पाहिलें असेलसें वाटत नाहीं. ) पाश्चिमात्य लोकांचे सहवासानें व इंग्रजी ग्रंथांचे वाचनानें विदेशी चालीरीतींचा आम्हां सुशिक्षित लोकांना पुष्कळ परिचय होऊन त्यांतलें विपरीतत्व बहुतेक नाहींसें झालें आहे म्हटलें तरी चालेल. परंतु पोषाख व नांवें यांची बूज मात्र अद्याप आपणामधून निघालेली नाहीं. याकरितां क्रांतीचे काळांत नव्याची आवड व जुन्याची ओढ या दोन विषम शक्तींत सांपडलेल्या सद्भावी पण अपवाद भीरु अशा सुधारकांसहीं ढोंगें व उ्या बतावण्या कराव्या लागतात त्याच प्रका-

युक्त्या नाटककारांसही प्रस्तुत कराव्या लागत होते. केवळ नांवें बदलून अगदींच ओंगळ दिसणाऱ्या विदेशी जनरीतीचे प्रसंगांना स्वदेशी कल्हयी केली असतां, मग बाकी स्वदेशी रंगप्रयोगास काय वाटेल तें असले तरी चालतें इतकी स्थिति हल्लीं येऊन पोंचली आहे. रंगप्रयोग सुशिक्षित व अशिक्षित दोनही प्रकारच्या लोकांकरितां असतात यामुळें साधारणतः भाषा मात्र कधींही बदलून चालावयाचें नाहीं. एरवीं पोषाख व नांवें बदलूनही प्रयोग मनोरंजक करणें शक्य आहे असें माझें स्वतःचें मत आहे. क्रमाक्रमानें साहसप्रिय नाटकमंडळ्या निघून जें आज साध्य दिसतें तें उद्यां सिद्ध होईल अशी मला फार उमेद आहे.

प्रस्तुतचें माझें नाटक वर सांगितलेल्या सुधारकांचे युक्तींचाच अंमल करून लिहिलेलें आहे. मूळ गोष्ट, पात्रें, रीतरिवाज, व कथानक प्रसंग सगळे कांहीं अस्सल विलायती; तथापि नाटकांतील विनोद, स्वभाववर्णन व काव्य हीं जगांतलि सर्व देशच्या रसिक पुरूषांनीं आनंदानें सेवन करावीं अशीं आहेत. तरी पण त्यांची गोडी स्वदेश बांधवांस देतांना मला नुसतें भांषातर करावें लागलें एवढेंच नव्हे तर नांवें, नातीं, व क्वचित् प्रसंगही मराठीशाही थाटाचे करावे लागले. हा दोष मी माझा समजत नाहीं, नाटककंपन्यांचा आहे. उत्तम भाषांतर करावयाची जबाबदारी आपणांवर घेऊन, मला नांवें व प्रसंग अगदीं जसेच्या तसे सहज ठेवतां येतील. परंतु नरूचि बनविण्याचें सुधारकी काम करण्यास धाडसी शी नाटककंपनी मला कोठें मिळणार? व नाटक-

कंपनी हवी तशी मिळत नसेल तर नाटकाचीं पुस्तकें लिहिणाऱ्याचे श्रमांपेक्षां, पुस्तकें बांधणाराचेच श्रम मल वाटतें अधिक बरें.

प्रस्तुत पुस्तकांत चांगलें वाईट काय आ हें सहज समजण्यासारखें आहे. यांतील विनोद स्वभाव वर्णन वगळलें तर यांत कांहींच उरत नाहीं. पण आहे तो विनोदच नुसता इतका बहारीचा आहे कीं, नाटक चांगलें वठलें असतां, प्रेक्षक मंडळीचें हंसतां हंसतां पोट दुखूं लागेल. भाषांतरांत तो विनोद कित पत उतरला आहे हें प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्याशिवाय क ळणार नाहीं. प्रस्तुत सारख्या पुस्तकांवरील मार्मिक टीकेचें स्थान पुस्तकालय नसून नाटकगृह हेंच होय.

हें नाटक स्वतःस केवळ करमणूक व्हावी म्हणून लिहिलें, व लोकांस करमणूक होईलसें वाटलें म्हणून छापलें. लोकांस करमणूक झाली तर रंग प्रयोगाचे द्वारानेंच होईल, व यास्तव प्रयोग गोड लागण्यास ज्या कांहीं युक्त्या करवल्या तितक्या केल्या आहेत. या नाटकाचा प्रयोग चांगला वठण्यास नाटकमंडळी अनुभविक असतील तितकें चांगलें, व प्रथम प्रयोगावर नाटकाची पुढील सर्व अब्रू अवलंबून असते, याकरितां प्रयोग करणें तर होतां होई तों चांगल्याच नाटकमंडळीकडून तो प्रथम करावा असा हितचिंतकांकडून उपदेश मिळाल्यामुळें, प्रयोग करण्याचा हक्क मला राखून ठेवावा लागला; तथापि, कोणी परवानगी मागितल्यास सारासार विवेक करून होतां होई तों प्रयोगाची परवा द्यावयास कांहीं हरकत नाहीं.

# तोही मी आणि हाही मीच
अथवा
# नवरदेवाची जोडगोळी.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

कारंजपुरांतील एक रस्ता.

( दौल्या पुढें व त्याचे मागोमाग छब्या

असे प्रवेश करितात. )

**छब्या**—अर कोन् तो ! दौल्या ? छीः अक्षी त्योच न् शंका कशाला व्होवी ! त्योच: दौल्या ! दौल्या ह—!

**दौल्या**—अर हो ! छब्या ! राम राम. गड्या, राम राम.

**छ०**—गड्या, तुला बगून शेनी हरश झालाया त्यो काय सांगूं !

**दौ०**—बर कायर मर्दा, तूं तर बारमावानी लइ खुशींत दिसतुयास ! पन कायर ? तुझ्या धाकटया धनीसाबाच कसं काय चाललया ? इचिभन त्येना हत बघुनशेनी दाजीसाब अक्षी डोळ फाडून बगत व्हात्याल न्हव !

छ०–त्येना म्हंजी !

दौ०–अर, त्येना म्हंजी रंगरावांना म्हंतो !

छ०–न्हाईवा, आपुन न्हाई कोना रंगरावाच चाकुर.

दौ०–खर म्हंतुस ?

छ०–आपल अत्ताच धनी हायती दफ़दार गुलाबराँव म्हनून.

दौ०–मग कस. काय? तुझा नवा धनी हायका फक्कड!

छ०–कुटला नवा धनी काढलायास् ?

दौ०–म्हंजी ? ल्येका तूं आत्तां ह्मनाला न्हाईस का रंगराव न्हाई आतां आपला धनी ह्मनून ? अस कां !

छ०–कवा ? न्हाईबी आपुन रंगरावाची नोकरी सोडली अजून ! बर पन् जाऊं दे ल्येका, तुला उगच कशाला फसवूं ? सांगूच तर–ह्यें बग रंगराव सुभदार त्योच गुलाबराव, अन् गुलाबराव त्योच रंगराव; कां आलं का ध्येनांत ?

दौ०–इचिभन काय लंवाड् लोक वगा !

छ०–अर त्ये तसच ! अत्तां मी चाललुया गुलाबरावाच्या कामावर ! तवा रंगराव कुट राह्यला माझा धनी ? बोल की. असंच का न्हव ?

दौ०–अस्स, अस्स, आत्तां आल माझ्या ध्येनांत. हित काइबी कावा हाय ! पन ल्येका छब्या, आपल्याला त्येतलं काइबी उमगना, सांग बगूं त्येंतल गुपीत. मी न्हाइ तुला कदी सांगत ?

छ०—पन ल्येका, गुपीत कळल्यावर मग तोंड आवळून धरल पाहिजे बग तुला, तर सांगन.

दौ०—अशी गप्प न्हाइन बग, मुस्क आवळलेल्या कुतऱ्यावानी. आतां तरी झालं?

छ०—मग सांगू तुला त्येतलं इंगीत? इशक बग इशक. दुसर काइबी न्हाइ. ह्या इशकान येडावल म्हंजी या जगांतल लोक नुसत नांवाचीच लपवाछपवी करत्यात येवढच न्हव तर दुसर काइबी करतील!

दौ०—अर, मला त्येचा वास लागलाच न्! मला वाटलच की, या भानगडीत इचभन कुनी मैना असनार! पन कायर, तुझ्या धन्यान हे जे दफदार गुलाबराव म्हनून नांव घेतलंय त्ये ल्येकानं एखाद्या सरदाराचं घेऊं न्हवत!

छ०—अर पन्, इंगीत अन् गुपीत काय हाय तें ततच हाय! आमच धनीसाब जिच्यावर फिदा झाल हाइत का न्हाई; ती पन छबेली अशीच कांहीं येडीपीर दिसतीया! तिला म्हन त्यो नाइकच व्हावा. मग त्यो अगीक कुणी म्होटा सरदार, अन् पैसवाला मानकरी असला तरीबी न्हाइ म्हन पसंत.

दौ०—इचिभन असली कसली द्वाड आवड कायकी! पन तिच्याजवळ तरी काइ ऊब हाय काय—पैशाची? तिच्या जवळ जर एकाद डबोल असल तर मग चालल!

छ०—त्येवढ मात्र हाय खर! म्हंजी अस बग सरकारच्या खजिन्यांतल्या निम्याइक्त पैस तिच हैती म्हननस! अन् मी जस आपल्या हजामाला दोन दिडक्या देतो, तसच इचिभन ती लाखो रूपये बेगुमान देऊन टाकती. तिच कुत्र हाइत न्हव, त्येंची भाकर खायची ताट समूदी सोन्याची हाइती, अन् तिच पोपट तर तिच्या हातातन मोती घेऊन कडाडा फोडून खात्यात.

दौ०—पुर ल्येका तुझ वर्नन! पन तिच अन् रंगरावजिच सूत नामी जमतं का न्हाई?

छ०—त्ये काइ इचारू नग. इचिभन खबुतरावानी येकामेका भोवती अक्षि—गिरक्या घालीत न्हात्यात!

दौ०—पन् तिच नांव गांव काइ सांगशील का न्हाइर?

छ०—नांव व्हय? तिचं नांव मोट मारू—लीला म्हन लीला. पन् लीलाबाई आन् आमच धनी ह्येंच्या मदी येक कोडगी चिवट म्हातारडी आडवी येऊ करातिया.

दौ०—बर, त्येंची एकदा शादी व्हावी अन् माझ्या बगीच्या घोड्यावानी त्येंची गुतागूत होऊन जावी, अस माझ्या मनाला फार फार वाटतं! बरं कायर? सांग मला, ह्ये कारंजपुर कसं काय हाये? जो बगावा तो त्येच वर्नन तर लइ लइ करतो.

छ०—लइ नामी—नामी हाय बग हे शहार. खान काय आन् खेळन काय? दौलुबा, आज रातच मला त्या

चवाट्यावरच्या गुत्यांत भेटा बर का धा वाजतां, मग आपुन थोडी करू चैनबाजीनु रंग—राम—राम—

( जातात. )

---

## प्रवेश २.

माणकुबाईच्या घरची एक माडी.

( लीला हातांत एक पुस्तक घेऊन कोचावर वाचीत पडली आहे. चंपी जवळ उभी आहे. )

**ली०**—( त्रासून ) झाल! बर मग तूं माझ्याकरितां कोणची पुस्तकं विकत आणलीस तें तरी एकदां सांग ?

**चं०**—हीं पहा. ही " प्रेमाची गांठ, " ही " पट्याची धार " हा " मुठींतला नवरा. "

**ली०**—बरं बरं. तें बाहेर कोण आलं आहे पहा आधीं. ( चंपी जाते ) खरच मला जम्नेचा आवाज ऐकलासा वाटला. मग काय कीं. ( चंपी येते. )

**चं०**—बाईसाहेब, जम्नाबाईसाहेब आल्या आहेत.

**ली०**—काय म्हणतीस ! खरंचका जम्ना आली आहे ?

( जम्ना प्र० करिते. )

ये ! ये ! जम्ने मला भेटूंदे एकदां तुला. अहाहा काय पण तुला पाहून मला हर्ष झाला आहे ! अशी ही आनंदाची घडी मनानं चिंतलीसुद्धां नव्हती.

**जम्ना**—खरं तें. आणि म्हणूनच या आपल्या भेटीचं सुख विशेष. तुझी नि म्हणे माझी गांठसुद्धां पडायची नव्हती. आणि मग हें असं कसं झालं बाई ?

**ली०**—सांगतें—सगळं सांगतें. एवढंच काय, मला तुला एक शंभर गोष्टी सांगायच्या आहेत. पण आधीं मला सांग कीं, या वेळीं या कारंजपुरांत तुला कुणी आणलीन. दाजीसाहेबसुद्धां का आले आहेत ?

**ज०**—हो. आम्हांला इथं येऊन एक तास देखील झाला नाहीं. दाजीसाहेब माणकुबाईनां भेटायला आत्तां येतील.

**ली०**—होय कां? तर मग आपल्या मनमोकळ्या बोलण्याचालण्यांत बिब्बा पडायच्या आधीं, माझे जे हाल चालले आहेत, त्याची थोडीशी हकीकत तुला सांगूं दे. तूं शहाणी आहेस म्हणून मला थोडासा दोष देशील. पण किनई मायाळू आहेस म्हणून माझी कींवच करशील ! माझ्या पत्रावरनं, गुलाबरावावर माझं मन कसं बसलं वगैरे गोष्टी तुला कळल्या आहेतच. पण जम्ने, काय ग सांगूं, गुलाबराव किनई मला मुकले ! आमच्या माणकुवर बाईनीं माझं पत्र वाटेंत पकडलं आणि मला तेव्हांपासून या घरचा कैदी करून सोडलं आहे ! आणि आपण मात्र एका दिपमाळीसारख्या उंच फक्कड सरदारावर फिदा होऊन गेली आहे ! हें सांगितलं तर खरं तरी वाटेल का तुला ?

ज०—छे. कांहीं तरीच! इतक्या म्हातारपणीं! तूं आपली थट्टा करती आहेस झालं.

ली०—अगदीं खरं. माझ्या गळ्याचीच शपथ. अग तिनं एक नाजुकसं नांव घेऊन त्याच्याबरोबर एकसारखा सरास पत्रव्यवहार सुरू केला आहे नि काय!

ज०—असं जर असेल तर मग ती तुला पुष्कळ मऊपणानच वागवीत असेल. कारण, तुझं दुःख काय तें तिला कळतं असं झालं.

ली०—छे ग! अगदीं उलट आहे. तिला आपलं छिद्र कळूं लागल्यापासून ती माझ्या वागणुकीबद्दल फार संशयखोर बनली. झालं. दुसरं एक मला त्रासाचं कारण कोणचं म्हणशील तर तो मेला भागोजीराव आज या कारंजपुरांत यायचा आहे. तेव्हां आपलं मला असं वाटूं लागलं आहे कीं, आतां मला हे लोक गांजून गांजून वेडी करून सोडणार!

ज०—असो. राहूं दे. उगीच असं वेडंवाकडं आपणच कशाला मनांत आणावं आधीं? आपले दाजीसाहेब कांहीं तरी थोडीशी माणकुबाईनां भीड घालतील अशी माझी खात्री आहे. मी करतें ती तजवीज.

ली०—अग पण सगळ्यांत अनिष्ट तें तूं अजून कुठं ऐकलं आहेस? आमचा स्नेहसंबंध माणकुबाईनां कळण्या पूर्वींच, मी गुलाबरावाशी थोडी कलागत केली. आणि, आपली पुन्हां दिलजमाई करीन म्हटलं तर

तेंव्हां पासून त्यांची नि माझी गांठच पडली नाहीं, अत्तां पावतर !

ज०---कलगत करायला असा त्यांनीं अपराध तरी कोणता केला तुझा ?

ली०---( शरमून ) छे ग. अपराध कसला! आम्ही किनइ त्याच्या पूर्वीं कध्धीं कध्धीं भांडलें नव्हतों. आणि गुलाबराव आपणाकडून भांडणाचं कांहीं कारण करतील असं मला कधीं वाटेचना. मग काय असेल तें असो. मीं आपलं एक दिवस माझं मलाच पत्र लिहिलं. काय कीं, " गुलाबराव हल्लीं दुसऱ्याच एका स्त्रीवर प्रेम करीत आहेत. ते तुला विसरले. " त्यावर " तुझी अपरिचित मैत्रीण " अशी मींच सही केली. मग तें गुलाबरावांना दाखविलं. " तुम्ही असेच बेइमान पुरुष ! " असं त्यांना दूषण दिलं. अंगांत अगदीं जळजळीत राग आणला. आणि तुमचं तोंड सुद्धां पुन्हा पाहणार नाहीं अशी शपथ वाहिली !

ज०--आणि असं असून तूं त्यांनां तसंच जाऊं दिलंस आणि त्यानंतर पुन्हा त्यांची भेट देखील घेतली नाहींस नां ? वाहवा! काय शहाणी ग तूं !

ली०--हो. आणि दुसऱ्याच दिवशीं आमच्या माणकुबाईंना बित्तं बातमी लागली. जम्ने, खरंच ग, माझ्या मनांत कीं नाहीं केवळे त्यांना तीन चार दिवस

थोडासा त्रास देऊंन मजा करायची होती. पण आता बघंतें तों ते मला जन्माचेच मुकले असं भय वाटतं!

ज०—पण तूं सांगतीस तसेच जर ते थोर आणि मोकळ्या मनाचे गृहस्थ असले तर ते तुला येवढ्या कारणांवरून कधींही टाकणार नाहींत. म्हणून भिऊं नको. पण काय ग तूंही अशी श्रीमंत, आणि ते गुलाबराव कोणी यःकश्चित दफ़ेदार आहेत असं तूं म्हणतीस हें कसं!

छ०—होय. पण माणकुबाईच्या संमती शिवाय जर मीं लग्न केलं तर मी आपल्या बहुतेक संपत्तीला मुकणार आहे हें आहे कां तुला माहीत! मला हें कळल्यापासून मींही आपल्याच इच्छेप्रमाणें लग्न करण्याचा निश्चय केला आहे. मीं आपल्या पैशाची केव्हांच आशा सोडली! आणि त्यांतूनही तुला सांगून ठेंवतें कीं, ज्याला माझ्यासारख्या अपार संपत्तीला भुलून आजचं लग्न उद्यांवर टाकायचा धीर निघेल तो कोणी कसाही असला तरी मला बिलकुल आवडणार नाहीं!

ज०—काय तरीच. तूं तर बाई फारच लहरी बायको दिसतीस, मला तरी.

ली०—अस्सं. अस्सं. लहरी कां! मला वाटलं होतं कीं, सर्जेरावांचा इतका सहवास तेंव्हां तुझ्या दृष्टीनें जगांत लहरीपणा म्हणून कांहींच नसावा!

तेव्हां पासून त्यांची नि माझी गांठच पडली नाहीं, अत्तां पावतर !

ज०---कलागत करायला असा त्यांनीं अपराध तरी कोणता केला तुझा ?

ली०---( शरमून ) छे ग. अपराध कसला! आम्ही किनइ त्याच्या पूर्वीं कध्धीं कध्धीं भांडलें नव्हतों. आणि गुलाबराव आपणाकडून भांडणाचं कांहीं कारण करतील असं मला कधीं वाटेचना. मग काय असेल तें असो. मीं आपलं एक दिवस माझं मलाच पत्र लिहिलं. काय कीं, " गुलाबराव हल्लीं दुसऱ्याच एका स्त्रीवर प्रेम करीत आहेत. ते तुला विसरले. " त्यावर " तुझी अपरिचित मैत्रीण " अशी मींच सही केली. मग तें गुलाबरावांना दाखविलं. " तुम्ही असेच बेइमान पुरूष ! " असं त्यांना दूषण दिलं. अंगांत अगदीं जळजळीत राग आणला. आणि तुमचं तोंड सुद्धां पुन्हा पाहणार नाहीं अशी शपथ वाहिली !

ज०--आणि असं असून तूं त्यांनां तसंच जाऊं दिलंस आणि त्यानंतर पुन्हा त्यांची भेट देखील घेतली नाहींस नां ? वाहवा! काय शहाणी ग तूं !

ली०--हो. आणि दुसऱ्याच दिवशीं आमच्या माणकुबाईंना बित्तं बातमी लागली. जम्ने, खरंच ग, माझ्या मनांत कीं नाहीं केवळे त्यांना तीन चार दिवस

थोडासा त्रास देऊंन मजा करायची होती. पण आता बघतें तों ते मला जन्माचेच मुकले असं भय वाटतं!

ज०—पण तूं सांगतीस तसेच जर ते थोर आणि मोकळ्या मनाचे गृहस्थ असले तर ते तुला येवढ्या कारणांवरून कधींही टाकणार नाहींत. म्हणून भिऊं नको. पण काय ग तूंही अशी श्रीमंत, आणि ते गुलाबराव कोणी यःकश्चित दफेदार आहेत असं तूं म्हणतीस हें कसं!

छ०—होय. पण माणकुबाईच्या संमती शिवाय जर मीं लग्न केलं तर मी आपल्या बहुतेक संपत्तीला मुकणार आहे हें आहे कां तुला माहीत! मला हें कळल्यापासून मींही आपल्याच इच्छेप्रमाणें लग्न करण्याचा निश्चय केला आहे. मीं आपल्या पैशाची केव्हांच आशा सोडली! आणि त्यांतूनही तुला सांगून ठेंवतें कीं, ज्याला माझ्यासारख्या अपार संपत्तीला भुलून आजचं लग्न उद्यांवर टाकायचा धीर निघेल तो कोणी कसाही असला तरी मला बिलकुल आवडणार नाहीं!

ज०—काय तरीच. तूं तर बाई फारच लहरी बायको दिसतीस, मला तरी.

ली०—अस्सं. अस्सं. लहरी कां? मला वाटलं होतं कीं, सर्जेरावांचा इतका सहवास तेव्हां तुझ्या दृष्टीनें जगांत लहरीपणा म्हणून कांहींच नसावा!

ज०—तें कां होईल ? जे दोष आहेत ते त्यांचे असले म्हणून काय झालं ! ते मला नाहींच आवडणार.

ली०—जम्ने, तूं तर बाई स्वतःची मालकीण आहेस. तरी पण तुला सर्जेरावांच्या त्या लहरी, संशयखोर तऱ्हेवाईक स्वभावामुळें आज सबंध वर्षभर थंड राहावं लागलं. काय बाई ! कृतघ्न स्वभाव माणसाचा ! त्यांनां आपलं अंगीन करून तुला पट्टराणीचे अधिकार द्यायला नकोत; आणि इकडे तूं मात्र अगदीं लग्न लागलेल्या बायकोसारखी, नम्र, आज्ञेत वागायला हवीस अं !

ज०—चकतीस बरं तूं लीले. अगदीं चुकतीस. हें पहा, आमचा वाङ्निश्चय बाबा मरायच्या पूर्वींच झाला होता; तेव्हां त्यांचा मृत्यु आणि इतर कांहीं भानगडीच्या व अडचणींच्या गोष्टीमुळं त्यांच्या मनांत फार उत्कंठा असून सुद्धां, आमचं लग्न लांबणीवर पडलं. बाईग, स्वारी फार थोर मनाची आहे बर कां ! असल्या गोष्टीसंबंधानें तिकडून वावगी हलगर्जीपणाची वर्तणूक कधींच व्हायची नाहीं. आणि त्यांचं शील तुला माहीत नाहींसं दिसतं. ते फार मानी व दिलदार आहेत. आतां त्यांची वागणूक थोडी लहरी दिसते, तरी पण त्यांत कपटाचा मागमूस सुद्धां नसतो. आणि त्यांचं मन जरी तेव्हांच चंचल होतें तरी त्यांचा सभ्यपणा कधींच ढळत नाहीं. दिखाऊ प्रेमाचे चारगट थेर असतात कीं नाहीं ते त्यांना

माहीत नाहीत; आणि म्हणून केव्हां केव्हां प्रेमाच्या माण-सासारखी त्यांची वागणूक दिसतं नाहीं इतकंच कायतें.

ली०—बरग बाई, त्यांची तरफदारी तूं नाहीं केलीस तर दुसरं कोण करील? तेव्हां मीं तरी तुला कसा दोष देऊं? पण एक विचारतें तें जम्ने अगदीं मोकळ्या मना-न सांगशील कां? जर सर्जेरावानीं विहिरींत उडी टाकून तुझे प्राण वांचविले नसते तर हल्लीं आहे इतकी प्रीति तुझी त्यांच्यावर बसली असती का?

ज०—उपकार आठवून, त्यांच्यावरचं माझं प्रेम दृढ झालं असेल, एवढंच. बाकी जीव वांचविण्यापूर्वींच मला ते आवडत होते. पण तसं जरी बघितलं तरी नुसते प्राण वांचविणं हा उपकार कांहीं लहान झाला कां?

ली०—उपकार, यांतग कसला उपकार? त्यांच्याच जागीं जर एखादा पाणकुत्रा असता तरी देखील त्यानं तें काम केलं असतं. छे ग बाई. एखाद्या माणसाला पोहा-यला येतं येवढ्याकरितांच कां कुणी त्याला आपलं प्रेम वाहील!

ज०—जाग. तूं अगदींच अविचारी कशी ती!

ली०—बरं तर राहूं दे. मींही आपली उगीच थट्टा केली तुझी.—पण हें कोण आलं हें इकडे?

( चंपी घाईघाईनें प्रवेश करिते. )

चं०—बाईसाहेब, हे पहा दाजीसाहेब आणि माणकु-बाई इकडेच येताहेत मिळून.

**ज०**–बरं तर मला जाऊंदेच. माणकुबाईंना भेटायला मी पुन्हा एकदां केव्हां तरी येईन. त्यांचें तें संस्कृत शब्द घालून शोभविलेलं पोक्त भाषण ऐकायचं म्हणजे एक मजाच आहे. पण तें आत्तां नाहीं उपयोग.

**चंपी**–अगबाई, दोघंहीजणं आलींच तीं पहा या निन्यान.

**स्त्री०**–मग तर जा बाई तूं. जम्ने, आतां नाहीं मी तुला राहवून घेत. आणि तुलाही पण सर्जेरावांना भेटायची फार उत्सुकता झाली असेल. जा बाई. तो बघ पलीकडच्या खोलींतून जिना आहे खालीं जायला.

**ज०**–येतेंग ! ( जाते. )

**स्त्री०**–बरं चंपाबाई, आतां तुम्हीं एवढं करा. आटप हीं पुस्तकं लपीव अगोदर, तो "राणा भीमसिंग" कपाटांत घाल. तो " निर्दोषी व्यभिचार " त्या " मनुष्याच्या कर्तव्यां "त टाक दडपून. "महाराज रणधीरसिंग " पलंगाखालीं घाल. " कालिदास " उशी खालीं घुसडून टाक. " प्रेमाचा माणूस " तुझ्या ओच्यांत दडीव. ( चंपी तसें करतें ) अस्सं, आतां ती रामायणाची पोथी दिसे अशी समोर राहूं दे. आणि शिवलीलामृत उघडून ठेव.

**चं०**–पण बाईसाहेब, आपण मघांशीं शामदान पुसायला शिवलिलामृताचे पहिले दोन अध्याय फाडायला सांगितलेत कीं !

**लीला**—अग तर, चवथा उघडून ठेव.—आणि आतां येऊं दे त्यांना वर.

( दाजीसाहेब आणि माणकुबाई येतात. )

**माणकुबाई**—बघितलींत कां दाजीसाहेब ! ती—ती पहा मूर्ख पोरिका, आपल्या कुलाला कलंक लावायला बसली आहे. आणि तें तरी कुणाकरितां म्हणाल तर आहे एक कुणी असामी दीडदमडीच्या किमतीचा—शिपुरडा !

**ली०**—काकू, हें काय असलं बोलतां तें ! मला वाटलं—

**माण०**—वाटलं ? कायग पोरी तुला वाटलं ? वाटलं आणि बिटलं तुलाग काय करायचं ? हें वाटणं तुझ्यासारख्या तरण्या पोरीला शोभत नाहीं. असो. त्या तुझ्या फक्कडाला मनांतनं अजीबात विसरून टाकायचं वचन दे. त्याची विस्मृति म्हणून आपल्या सुहृत्फाटकावरून काढून टाक कशी !

**ली०**—काकू, विसर म्हणायचं सोपं आहे खरं, पण विसरायचं कठीण आहेना ! विसरायचं काम आपल्या इच्छेवर थोडचं आहे अवलंबून.

**माण०**—छे, विसरायचं अगदीं सोपं आहे. मीं सांगतें मनांत आणल्यावर कांहीं विसरायच्यापेक्षां दुसरी सोपी गोष्टच नाहीं जगांत. मीं नाहीं कां विसरलें त्यांना ? ते होते तेव्हां कीं नाहीं बाई कसं सगळं ठीक होतं (रडूं लागते.)

बाई, तुझ्यासारख्या तरुण मुलीला ही धड आठवण शोभत नाहीं !

**लीं०**—( गाहिंवरून ) हें काय काकू मीं असं काय केलं आहे तुमचं. मला अशा वागविता त्या !

**मा०**—काय केलं आहे ? आतां काय केलं आहे म्हणून कसं चालतं आहे? मजजवळ आहेना त्याचा पुरावा? पण सांग! आम्हीं म्हणजे तुझं बरं पहाणारे मित्र, तुला सांगूं तसं वागशीलना ? आमची आवड तीच तुझी आवड होईलना ?

**लीं०**—( त्रासून ) मला नाहीं कांहीं ठाऊक आवड-नि नावड.

**माण०**—मीं झालं तरी तेंच म्हणतें. तुझ्यासारख्या कोंवळ्या पोरीला आवड नि नावड घेऊन करायची आहे काय? आणि दुसरं असं. लग्नाच्या कामांत तर आवडीची नावड आणि नावडीची आवड होत असते, म्हणून प्रथम लग्न करतांनाच नावड असलेली बरी.

**लीं०**—( रागानें निघून जाते ).

**माण०**—पाह्यलंना दाजीसाहेब ! कशी हट्टी आणि तऱ्हेवाईक पोर आहे ती !

**दाजी०**—हो. हो. हट्टी तर काय ? पण मी तुम्हांला सांगतों कीं, हा सारा लिहायला वाचायला शिकवण्याचा गुण ! मला जर एकादी पोरगी असती, तर ती बेटी चे-

टकीण झालेली पुरवती पण ही विद्या नको. असो. बरं लग्नाचं काय ?

**माण०**—हो. लग्नाचं असं. भागोजीरावाला मीं कांहीं वचन प्रणाम करून सुपारी दिलेली नाहीं. त्यांतून, या सटवीला तो अगदीं नावडता आहे. तेव्हां तुमच्या पुतण्याचं म्हणजे रंगराव सुभेदारांचं बस्तान कदाचित् जुळेल अशी आशा आहे.

**दाजी०**—असो. ठीक आहे तर मग. मी त्याला पत्र लिहून आत्तां बोलावतों छावणींतून. माझ्या मनांत हें आज किती तरी दिवस घोळतं आहे पण म्हटलं आपलं ठरल्यावरच मग त्याला लिहावं.

**माण०**—ठीक आहे. मी भागोजीरावाला सांगून टाकतें साफ !

**दाजी०**—आणि माणकुबाई त्यांतूनही एक खुबी करा. काय कीं, त्या भागोजीरावाला रंगरावाचं नांव कळवूं नका. फक्त एवढंच लिहा कीं, म्हणावं गुलाबरावावर तिचं मन गेलं आहे. आपणाला नाहीं म्हणावं लागतं त्याबद्दल फार वाईट वाटतं पण नाइलाज आहे.

**माण०**—बरं आहे. तुम्हीं रंगरावांना सांगून ठेवा कीं, लिला फार चांगली आहे म्हणून.

**दाजी०**—मी करितों त्याची तजवीज मोठ्या नाजुकपणानें. आणि माणकुबाई, तुम्हींही हा मजकूर इकडनं तिकडनं तिच्या कानावर घालून तिच्यावर थोडासा

अम्मल करून तिची कबुली घ्या. अम्मल जरा-करडाच असूंदे. नाहीं होयं म्हणाली कीं दाखवावी जरा कुलूपकिल्ली. आणखी २।३ दिवस चाकरांनां तिला ताट नेऊन द्यायला सांगायचं विसरावं कीं आलीच वठणीला. ( जातो. )

**माण०**—खरंच ही लीलेची ब्याद माझ्या हातनं लवकर सुटली म्हणजे बरं होईल. मानाजीरावाची आणि माझी बातमी तिला समजली असेलसं दिसतं. पण चंपीनं तर गुपीत फोडलं नसेलना! छेः, नाहींच. तसं असतं तर तिला मीं केव्हांच कबूल करायला लावली असती. चंपे, चंपे, अग चंपे!

**चंपी**—( प्र० करून ) ही आलें बाई साहेब. आपणच कां हाक मारलीत मला ?

**माण०**—होय, मारली. तूं बाहेर गेली होतीस तेव्हां भेटले होते कां मानाजीराव ? ( हंसते. )

**चं०**—नाहीं बाईसाहेब. मुळीं दिसले सुद्धां नाहींत !

**माण०**—( हिरमुसून ) बरं. पण चंपे, तूं ह्यातलं अगदीं कुण्णाजवळ बोलली नाहींसना ! बघ नीट याद राखून ठेव.

**चं०**—नाहीं नाहीं, रे देवा! बाईसाहेब, ही जीभ कापून ठेवायला मी तयार होईन, पण मनांतली गोष्ट ओठांतनं म्हणून बाहेर काढायची नाहीं !

**माण०**—बरं बरं. आहेच मला खात्री म्हणा. पण

म्हणतें तूं आहेस जरा भोळी बापडी. कुणी तुला फसवूं बिसवून घेतील काम करून. संभाळ हां.

**चंपी**—तें का होईल बाईसाहेब ?

**माण०**—बरं तर. आत्तां आणखी एक मी पत्र देतें मानाजीरावांनां, तें जा घेऊन. नीट गुप्तपणानं तें पोंचीव. लोकांच्या गुप्त गोष्टी मला येऊन सांगितल्यास तर गोष्ट निराळी. पण माझं गुपीत जर उघडं केलंस कुणाजवळ तर मात्र संभाळून ऐस. मग माझी तुझ्यावर मेहेरबानगी म्हणून जन्मांत व्हायची नाहीं. तूं म्हणशील कीं, मी भोळी बापडी अन् हें न् तें. पण मग कांहीं चालायचं नाहीं. सांगून ठेवतें आहे. ( जाते ).

**चं०**—अगबाई, माझ्या भोळ्या बापडेपणानं बरीच मौज केली आहे म्हणायची ! असो. आतां मी एकटी आहें तोंपर्यंत हा भोळेबापडेपणाचा मुखवटा जरा बाजूला काढून ठेऊं दे मला. ( चालचलणूक बदलून ) माझ्या स्थितींतल्या पोरींनां, आपण शहाण्यासुर्त्या आणि चतुर धूर्त दिसावं असं फार फार वाटत असेल. पण मला हा आपला वेडगळपणाचा मुखवटा फारच आवडतो. एवढंच कीं, त्यांतनं आपलं बरं वाईट पाहायचे डोळे चांगले उघडे असले म्हणजे झालं ! खरंच माझ्या बावळटपणानं माझा काय काय फायदा झाला आहे तो एकदां पाहूंयाच हां ! ताराबाईचं लग्न जुळवून आणायच्या कामांत, रुपये २००, एक काळी

चंद्रकळा आणखी गर्भसुती खण तर हवे तितके. तारावाईच्या नवऱ्यापासून रुपये पन्नास. लीलाबाई आणखी गुलाबराव यांच्या गुपिताची बातमी माणकुबाईला सांगितली त्याबद्दल रुपये पंचवीस आणि लुगडें एक. कलम तिसरं. भागोजीरावानां पोंचविण्याकरितां दिलेल्या पण न पोंचलेल्या पत्राबद्दल किती? हो, रुपये तीस आणि एक चांदीचा पेला. कलम चार. मानाजीरावाकडून किती? हं रुपये पन्नास. मोहरेची एक आंगठी आणि एक जरीचा खण. आणखी आपण थेरड्या माणकुकाकूबरोबर पत्रव्यवहार करीत नाहीं तर तिच्या फाकड्या फटाकड्या कोवळ्या पुतणीबरोबर करतों आहे असा जो मानाजीरावाला भ्रम आहे तो कायम तो कायमच! ठीक! भोळ्या बापड्या बावळट चंपाबाई ही आपल्या वेडगळ मूर्तीची कमाई बरं!

( जाते. )

# अंक २.

—:o:—

## प्रवेश १.

( रंगराव सुभेदार आणि छब्या प्रवेश करितात. )

**छब्या**—मीं तथ हाय् तवर इकत्यामंदि आल दाजीसाब घरीं. मीं सांगितलं त्येस्नी, आपली परकृत कशी काय हाय त्येचा सोद घेऊनशेनी ये म्हनून सुभेदारांनीं आपल्याकड पाठिवल हाय मला. आन् आपनाला भ्येटायला कवाशी फुरसद व्हईल म्हनून बी मीं त्येस्नी इचारल.

**रंगराव**—हं. बरं? मी कारंजपुरांत आलों आहें असं त्यांना कळल्यावर मग ते काय म्हणाले?

**छ०**—अबबब! त्ये काय पुसुबी नगा! तुमी हितं आलासा इवड ऐकलं मातर, का जे त्येनी केलया त्ये काय सांगूं? दाजीसाब येवड पोक्त पन काय पोरावानी डोळ फाडल त्येनी. मोटच्या बैलावानी भरारा चार पावल मागं बी सरल. धापाच शिव्या बी हसडल्या—आपनाला न्हवं धनीसाब—पन् उगच व्हात्या वाऱ्याला. आन् म्हन्—त्यात कस, " छब्या " !—तर म्हटलं जी—" कायर भुता बितानं बोलावून आनलं काय त्येला हत इकत्यांत " ?

**रंग०**–( हंसून ) हंहं ! बरं मग आपली स्वारी काय बोलली ?

**छ०**–माजी सवारी व्हय ! दिली लोणकडी बात ठेवून न् काय ! मी कायससं सांगितलं त्येस्नी, पन् त्येचातनं त्येनां खऱ्याखुऱ्या बातमीचं एक टिपुसबी गवासैल अ-सलं तर इचिभन सांगाल त्ये ऐकन कीं ! पन, सरकार, जेला त्येला हत यायचं कारन् सांगाय पडनार. तवा म्हन्तो आपली एक बात ठरवून ठेवली असली म्हंजी बरं ! न्हाई तर जत तत मी आपला घबाड चुका करीत जायाचा ! दाजीसावांच चाकूर मातर लइ लइ चि-किस्ता करनार–त्येनीं संमद्यांनीं मिळून, काय, कुट, कदीं कुनी, कोन् कशापायीं असं करून करून मला अशी भं-डावून सोडलं न् काय ?

**रंग०**–( घाईनें ) बरं, मग त्यांना सांगितलस का काय तूं शिंचा ? बोल लवकर.

**छ०**–छे: सरकार. एक अक्षर बी न्हाई. मातर, चा-बुक कडकवनारा त्येंचा तो दौल्या कोचमिल हये नाहीं—

**रंग०**–हा शिंचा, घात केलास, मला वाटतं त्याजवळ ओकला असशील सगळं तूं !

**छ०**–न्हाई सरकार आपल्या पायाच्यान् एक शबद-बी न्हाई बोललों त्या संग. इकतच का तो घोडेवाला लइ लइ लागला इचारपुस करायला. तवा दिलं सांगून त्येला—

रंग०—( उत्सुकतेनें ) अरे काय.

छ०—का धनीसाव आल्याती पटकावायला—मग त्ये पटकावायचं काय का असेना, त्येचं, त्येला काय अन् मला काय? अन् कुनाला तरी काय?

रंग०—असों चालेल म्हणा मोघम म्हटलंस तें चालेल.

छ०—अन् त्ये पटकावन् खरं दिसावं म्हून दिलं सांगून का त्येनीं पटकावल पाचसात पलटणीच जवान, दोन आचारी, अन् चार हुजर—अन्—

रंग०—बस बस. अरे लेका, वेळ मारून न्यायला हवंच असेल तेवढंच बोलावं. उगीच बारीकसारीक फाटे ओढीत बसूं नये—समजलास?

छ०—चुकलों, चुकलों सरकार. पन् खोटं सांगायचं त्यें खरं वाटेलसं सांगाया होवं का न्हाई?

रंग०—पण लेका, खऱ्याखोट्याची खात्री देऊन फारशी जामीनकी पतकरूं नये. नाहीं तर सगळीच नापत व्हायची. बरं पण सर्जेराव कुठं आहे?

छ०—त्ये हायतीकी वर्तीं, जरा जामानिमा बदलत्यात जनुं.

रंग०—बरं दाजी साहेब आणखी जम्ना इथं आल्याची कळली आहे कां त्यांना खबर?

छ०—मला वाटतं का न्हाई कळलं त्यांनां अजून! ऐका सरकार! त्येच येत्याती जनुं आपल्या पायानीं हकडच!

रंग०—जा जा. सांग त्याला मी इथं आहे म्हणून..

**छ०**–जातों खरं. पन् दाजीसाब आलं तर त्येस्नी काइबी पटकावाया आलों असंच म्हना बर काय ? न्हाई तर गाढिचा छळ्या लटक बोलला असं व्हायाच !

**रंग०**–बरं. बोलेन जा.

**छ०**–आन् मी बोललों तसं त्ये पलटनीच लोक आचारी न् हुजर यांच बी जरा बोला म्हंजी बरं पडल. म्हंजी असं बगा–अन्नूला भ्यायचंन् दुसर काय ? धनी साबांच्या कारनापायीं वाईस खोटंबिटं बोलायच न्हाई वाईट वाटत म्हना, पन् ( डोकें खाजवीत ) पन्–खोटं बोलुन लोकांना गवसायचं त्येच इचभन जरा वाईट वाटतव !

( जातो. )

**रंग०**–बरं. आतां हे, आमचे तऱ्हेवाईक स्नेही सर्जेराव आले अं ! त्याची प्रिया इथं आल्याचं जर त्याला माहीत नसलं तर थोडीशी चेष्टा केल्याशिवाय तें कळवायच नाहीं.

( सर्जेराव येतो. )

या, तुम्हीं सर्जेरावजी. अगदीं वेळेवर परत आलास बुवा.

**सर्जे०**–अरे वेळेवर न यायला काय झालं. गेलों होतों तें काम आटपलं मग कशाला राहायचं ? बरं. पण कायरे लीलेचं अन् तुझं कसं काय चाललंय !

**रंग०**–काय असायचं ! जसं होतं तसंच आहे. आमचं भांडण झाल्यापासून पुन्हां मीं तिला भेटायला

गेलों नाहीं. पण, तिचं बोलावणं येणार असं मला क्षणोक्षणीं वाटतं आहे.

**सर्जे०**—बरं. एकदम निघून माझ्या बरोबर चल असं तूं म्हणावंस कां नाहीं तिला?

**रंग०**—वाहीवारे वाहवा. आणि एकदम चल म्हणून तिच्या बरोबर मिळायच्या संपत्तीचे दोन हिस्से गमावूं म्हणतोस की काय ? अरे, हें तूं विसरलास वाटतं ? नुसती तीच हवी असती तर आतां पर्यंत कां मिळाल्याशिवाय रहाती खुळ्या ?

**सर्जे०**—पण तुला सांगतो रंगराव, असा फार वेळ वात्रटपणा करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. माझा आपला उपदेश ऐक. ती तुझ्यावर फिदा आहे अशी जर तुझी खात्री असेलच तर एकदम आपल्या खऱ्या नांवानं पुढं होऊन त्या माणकुबाईजवळ मागणी घाल कसा! आणखी, इकडं दाजीसाहेबांनां रुकार द्यायला लिही म्हणजे झालं !

**रंग०**—अरे, हळू हळू ! कोणी ऐकेल. त्यांतलं असं आहे, गुलाबरावाबरोबर पळून जायला ती अगदीं एका पायावर तयार आहे. पण रंगरावाबरोबर नसेल! तिची तऱ्हा फार विलक्षण आहे. म्हणून रंगराव तोच गुलाबराव ही गोष्ट तिच्या नजरेला हळू हळू आणणार आहे, समजलास ? बरं तूं आज आमच्याबरोबर जेवायला राहणार ना

**सर्जे०**—नाहीं. आज आपला दिल कांहीं रंगेल नाहीं तुमच्याशीं ख्यालीखुशाली करीत बसायला !

**रंग०**—छेः छेः बोवा. सर्जेराव, तुझी तर संगतच सोडून दिली पाहिजे असं मला दिसतं. अरे राम ! राम ! राम ! काय हा तऱ्हेवाईकपणा, काय ही मत्सरी भित्रा स्वभाव तुझा ! अरे, आषक करायचा तो तरी मर्दासारखा करावा !

**सर्जे०**—तें कांहीं म्हण, पण चार चौघांत बसून हंसायला खेळायला माझं मन मोकळं नाहीं खास.

**रंग०**—अरे, तुझ्यासारखाच मी नाहीं कां? प्रीतीच्या पाशांत गुंतलेला ? आणखी माझा तर कसा विचित्र नाटकीथाट आहे ! आपल्या प्रीतीची प्यारी पटकावीपर्यंत पुरूषाला भीति, शंका, दुःख, आशा, निराशा, यांनीं वेडावून सोडलेलं असतं खरंच. पण हा तुझ्यासारखा प्रकार मात्र नाहीं पाहिला कुणाचा. तूं आपला जिथं जिथं जाशील तिथं तिथं तुझ्या मागूनं हें सारं लटांबरच्या लटांबर आहेच तयार !

**सर्जे०**—अरे, पण तुझं माझ्यासारखं नाहीं. तुझं काय? घबाडावर दृष्टि गुलामा तुझी. ह्या देवतेनं नाक मुरडलं कीं कर दुसरीची आराधना ! माझी मनूची देवी एकटी एक. ती माझ्याकडं पाहून प्रसन्नतेनं हंसली म्हणजे जन्माचा सुखी नाहीं तर जन्माचा दुःखी !

**रंग०**—बरं तसं घेऊन चाललं तरी, आत्तां याक्षणीं तुला भीति वाटायला काय रे कारण झालं आहे?

**सर्जे०**—कारण—हं? अरे एक कां! शंभर कारणं आहेत कीं रे बाबा. ती माझी प्रिया शरीरानं आणि मनानं आहे फार नाजूक. माझ्या वियोगानं तिला फार दुःख होत असेल आणि हुरहुर लागली असेल. काळ-जीचीआग तिला भाजीत असेल. तसंच तिची प्रकृति किती तरी कोमळ! थोडासा पाऊस पडला तर तिला हिंव येईल, जरा कुठं वारा गार सुटला तर तिला हु-डहुडी भरेल, असं सारखं मनांत येत असतं. केवळ जिच्या खातर मी आपल्या प्राणांना पाळतों, तिला भय नाहीं कशाचं? दुपारची गरमी, संध्याकाळचं दंहिवर अन् जाईच्या फुलाला—

**रंग०**—बरं—पण ती तुझी लवंगवेलदोडी नाजुक नार खुशाल आणि आनंदांत आहे असं कुणी सांगितलं तर मग तुझं मन थंड होईल कीं नाहीं?

**सर्जे०**—वः वः मग आणखी तें काय पाहिजे! तेवढीच मला काळजी आहे.

**रंग०**—बरं, तुझी काळजी एकदम दूर करूं तर! जम्नाबाई खुशाल आहे एवढंच नव्हे तर—कळलं कां—ती आत्तां या वेळीं कारंजपुरांत आहे.

**सर्जे०**—कां बाबा माझी उगीच थट्टा करतोस?

**रंग०**—ती दाजीसाहेबांबरोबर एक तासाच्या पूर्वींच इथं आली आहे.

**सर्जे०**—( हंसून ) खरं रे? खरंच का आली आहे?

रंग०—अरे, खरं ह्मणजे ? दाजीसाहेबांची तऱ्हा तुला माहीत आहेच. तेव्हां आश्चर्य वाटण्याचं कांहीं कारण नाहीं. तुझ्या गळ्या शपथ जम्ना आली आहे.—

सर्जे०—ओल्लो—तरी पण माझा मित्र—( त्याला कंवटाळून ) अरे, माझी पगडी आणारे कुणी, आणि ती छडी ! आतां कशाचीही मला काळजी नाहीं.

( छब्या येतो. )

छ०—भागोजीराव खाली आल्याती.

रंग०—अरे सर्जेराव, थांब जरा. हा भागोजीराव दाजीसाहेबांच्या घराजवळ राहतो. तो सांगेल जम्नेची जास्त हकीकत.

सर्जे०—काय मग त्याला कुटुंबांतल्या सर्वांची चांगली ओळख असेलच.

रंग०—होहो ! आहे म्हणजे ? आणखी मौज सांगतों. त्या भागोजीरावाला पाहूनही तुला फार मौज वाटेल ! हे आहेत आमचे प्रतिस्पर्धी. ह्मणजे गुलाबरावाचे प्रतिस्पर्धी असं समजायचं ! याचा डोळा आहे लीलेवर. तिचा याच्यावर आहे कां नाहीं तें निराळें म्हणा ! असो. रंगराव सुभेदार अन् गुलाबराव हे एकच हें त्याला ठाऊक नाहीं. याची अशी समज आहे कीं, मीं—म्हणजे रंगरावानं ती लीला पाहिलीसुद्धां नाहीं कधीं काळीगोरी. तेव्हां तो येतो माझ्याजवळ कुरकूर करायला गुलाबरावाविषयीं. कां आहे कीं नाहीं मौज. अरे तो आलाच वाटतं.

( भागोजीराव येतो. )

**भागोजी**–रामराम, रंगराव! सुभेदारसाब रामराम. कां कसं काय हाय! बेस हाय का न्हाई ? आत्तां हा असाच आलों बगा. जसा काय अस्मानांतन् तारा तुटून धांवतो न्हाई तसा आलों धांवत.

**रंग०**–हं हं! तरकटी तारा तर खराच. (हंसून) पण कुणा चांदणीनं असं ओढीत आणलं आपल्याला हें सारं ठाऊक आहे म्हटलं मला. भागोजीराव हे आमचे मित्र सर्जेराव आपली ओळख असूंद्या.

**भागो०**—हः हः हः रामराम सर्जेरावजी! आमची गरीबाची जरा वळख राहु द्यावी म्हटलं. तुमच्या सारख्यांची वळख म्हंजी आम्हास्नी लाभ आहे मोठ्ठा. बरं, रंगरावजी ह्येच का त्ये सर्जेराव–त्ये त्ये ?

**रंग०**–हो हो तेच जम्नाबाईचे–हं(डोळ्यानें खुणावतो.)

**भागो०**–वः ती समदी मंडळी आत्तांच आलीतकीं. अन् तुम्हीं न्हाई भेटलां त्येनां सर्जेराव? पण, सर्जेराव तुमी लई सुखी आहां बुवा.

**सर्जे०**–भागोजीराव, मीं अजून जम्नाबाईनां भेटलों नाहीं खरा. पण कायहो त्या अलीकडे ख्यालीखुशालींत होत्यांना ! प्रकृतिविकृती ठीक होतींनां !

**भागो०**–त्ये काय इचारता! लइ लइ ख्यालीखुशालींत. त्यो झोकनोक अन् त्यो गुलाबी हसता नूर. लई बेस.

**रंग०**—अरे, खरं ह्मणजे? दाजीसाहेबांची तऱ्हा तुला माहीत आहेच. तेव्हां आश्चर्य वाटण्याचं कांहीं कारण नाहीं. तुझ्या गळ्या शपथ जम्ना आली आहे.—

**सर्जे०**—ओळ्खो—तरी पण माझा मित्र—( त्याला कंव-टाळून ) अरे, माझी पगडी आणारे कुणी, आणि ती छडी! आतां कशाचीही मला काळजी नाहीं.

( छब्या येतो. )

**छ०**—भागोजीराव खाली आल्याती.

**रंग०**—अरे सर्जेराव, थांब जरा. हा भागोजीराव दाजीसाहेबांच्या घराजवळ राहतो. तो सांगेल जम्नेची जास्त हकीकत.

**सर्जे०**—काय मग त्याला कुटुंबांतल्या सर्वांची चांगली ओळख असेलच.

**रंग०**—होहो! आहे म्हणजे? आणखीं मौज सांगतों. त्या भागोजीरावाला पाहूनही तुला फार मौज वाटेल! हे आहेत आमचे प्रतिस्पर्धी. ह्मणजे गुलाबरावाचे प्रतिस्पर्धी असं समजायचं! याचा डोळा आहे लीलेवर. तिचा याच्यावर आहे का नाहीं तें निराळें म्हणा! असो. रंगराव सुभेदार अन् गुलाबराव हे एकच हें त्याला ठाऊक नाहीं. याची अशी समज आहे कीं, मीं—म्हणजे रंगरावानं ती लीला पाहिलीसुद्धां नाहीं कधीं काळीगोरी. तेव्हां तो येतो माझ्याजवळ कुरकूर करायला गुलाबरावाविषयीं. कां आहे कीं नाहीं मौज. अरे तो आलाच वाटतं.

( भागोजीराव येतो. )

**भागोजी**–रामराम, रंगराव! सुभेदारसाब रामराम. कां कसं काय हाय! बेस हाय का न्हाई? आत्तां हा असाच आलों बगा. जसा काय अस्मानांतन् तारा तुटून धांवतो न्हाई तसा आलों धांवत.

**रंग०**–हं हं! तरकटी तारा तर खराच. (हंसून) पण कुणा चांदणीनं असं ओढीत आणलं आपल्याला हें सारं ठाऊक आहे म्हटलं मला. भागोजीराव हे आमचे मित्र सर्जेराव आपली ओळख असूंद्या.

**भागो०**—हः हः हः रामराम सर्जेरावजी! आमची गरीबाची जरा वळख राहु द्यावी म्हटलं. तुमच्या सारख्यांची वळख म्हंजी आम्हास्नी लाभ आहे मोठा. बरं, रंगरावजी ह्येच का त्ये सर्जेराव–त्ये त्ये?

**रंग०**–हो हो तेच जम्नाबाईचे–हं(डोळ्यानें खुणावतो.)

**भागो०**–वः ती समदी मंडळी आत्तांच आलीतकीं. अन् तुम्हीं न्हाई भेटलां त्येनां सर्जेराव? पण, सर्जेराव तुमी लई सुखी आहां बुवा.

**सर्जे०**–भागोजीराव, मीं अजून जम्नाबाईनां भेटलों नाहीं खरा. पण कायहो त्या अलीकडे ख्यालीखुशालींत होत्यांना? प्रकृतिविकृती ठीक होतीनां?

**भागो०**–त्ये काय इचारता? लइ लइ ख्यालीखुशालींत. त्यो झोकनोक अन् त्यो गुलाबी हसता नूर. लई बेस.

**सर्जे०**—खरंच हो? मीं ऐकलं होतं कीं त्यांना थोडसं गैर आराम वाटत होतं ह्मणून.

**भागो०**—छे: छे: खोटं अगदीं खोटं. उगीच तुम्हांला तरास द्यायाला कुनबी सांगितल असल अन् काय ?

**सर्जे०**—रंगराव पाहिलंत कां? ती माझ्यापेक्षां जरा-भक्कम आहे. मीं तर काळजी करून करून रोगी व्हायच्या बेतांत आलों होतों. हं. हीच जम्नाबाई प्रीति आपली ?

**रंग०**—अरे पण सर्जेराव, वहावा! जम्ना आजारी पडली नाहीं म्हणून रागावणार वाटतं तिच्यावर. खाशी!

**सर्जे०**—अंहं! तसंच नव्हेरे! तरी पण हें पाहा प्रेमाच्या माणसानां वियोगामुळं थोडसं गैरआराम वाटावं हें स्वाभाविक आहे कीं नाहीं सांग तूंच! आराम प्रकृति, ख्यालीखुशाली आणि गुलाबी हंसता नूर यांत गैर प्रीतीचं कांहींच चिन्ह नाहीं असं कां म्हणशील तूं ?

**रंग०**—होय बाबा, तूं दूर असतांना ती आजारी पडली नाहीं ही तिची चूक आहे खरी.

**सर्जे०**-बरं भागोजीराव, ती काय अगदीं आनंदी आनंदांत होती ना!

**भागो०**—अहो आनंदांत म्हणजे विचारतां काय ! जिथं जाइ तिथं हर्ष गजर करून सोडीत अस अगदीं! किती निष्काळजी आणि खेळकर !·काय तिचा विनोद आणि गोड भाषण! व:

**सर्जे०**—पहा पहा रंगराव! बायकाच्या जातीतच असा

हलकटपणा असतो कीं कसला ही प्रसंग आला तरी तो कायमच. हं: मीं इतका दूर आणि माझ्या मागं तिला इतकं सुख होत होतं अं !

**रंग॰**—बाबा, आतां कमाल केलीस. पुरे तुझा हा मूर्खपणा. अरें खुळ्या, ती काळजींत आणि उदास असेल अशा भीतीनं, आत्तां ना तूं रडत होतास?

**सर्जे॰**—रंगराव, तूंच सांग, माझ्या प्रियेच्या वियोगांत असतांना, मीं कधीं चार चौघांत हंसून खेळून करमणूक करून घेतली आहे कां?

**रंग॰**—नाहीं.

**सर्जे॰**—कधीं आनंदी आणि खेळकर दिसत होतों काय?

**रंग॰**—छे: मुळींच नाहीं.

**सर्जे॰**—मीं कधीं विनोद थट्टामस्करी करीत होतों काय?

**रंग॰**—विनोद कसला. नेहमीं रडतोंड्या आणि उदास होतास. कबूल आहे.

**भागो॰**—कायव. ह्ये गिरस्त असं काय करूं लागले ह्ये!

**रंग॰**—अहो, जम्नाबाई सुखी आणि खुशाल आहे असं ऐकून त्यांना झालेल्या आनंदाचं हें ते वर्णन करताहेत.

**सर्जे॰**—बरं, आणखी ती काय काय करीत होती!

**भागो॰**—आणखी होय, तिचं गाणंबिणं तर किती नामी! लइ बेस. मी एकदां सहज दाराभाइरनं ऐकत होतों तवां आंत बाया बिया मिळवून त्यांनीं गाणीं म्हणण्याचा काय धडाका उडविला होता?

**सर्जे०**—पाहिलं कां. गाणीगात होती. माझी नुसती आठवण तरी काढायची होती तिनं ?

**रंग०**—अरे खुळ्या, प्रेमानं वेडावलेल्या तरुणींचं गाणं हें एक मोठं करमणुकीचं साधन आहे.

**सर्जे०**—हो. हो साधन ! असेल ! बरं पण गाणीं तरी कोणतीं म्हणत होती ?

**भागो०**—नाहीं बा, नाहीं आपल्याला आठवत !

**रंग०**—अरे, विचारायचं काय ? असतील प्रेमाची न् शोकाची ! " गिरि शिखरिं असें धवल धुकें तें जडलें " हें किंवा " सखि जयि तव विरहाचा काल पातला " हें असेल ?

**भागो०**—नाहीं. तें नव्हतं खास.

**रंग०**—किंवा " सूर्यकिरण चंचल प्रवाहा वाहत वाहत जा हळूं रे " हें असेल.

**भागो०**—छे: तसंही नव्हतं. हें पहाहो हं आतां आठवलं एक—

" माझ्या मनाचीं मीहो धनीन " असं कायसंसं होतं.

**सर्जे०**—छे: छे: मूर्ख. मूर्ख मीं शतमूर्ख. असल्या बेमान पोरीवर मीं आपलं सारं जीवित गुंतवून टाकलं त्या माझी अक्कल कुठं गेली होती चरायला ?

**रंग०**—अरे, काय विनाकारण अकांडतांडव करतो आहेस तूं हें ? माझी प्रिया इतकी रंगेल आणि गुलहौशी

आहे असं जर मीं ऐकलं असतं तर बाबा मला अत्यंत आनंद झाला असता!

**सर्जे०**—अरे, ती आनंदांत होती याचं मला सुद्धां बरं वाटतं आहे. ती आजारी होऊनच पडावी अशी माझी इच्छा नाहीं. तरी पण तिला माझी कोरडी आठवण जर असती तर तिनं गाणं म्हणून तरी ती दाखविली असती म्हणतो. छेः तें कांहीं नाहीं. हा निघालोंच.

( जाऊं लागतो. )

**रंग**—अरे, पण भागोजीरावांनीं ही आनंदाची बातमी सांगितली याबद्दल त्यांचे आभार तरी?

**सर्जे०**—आग लागो त्यांच्या बातमीला. ( जातो ).

**भागो०**—कायव रंगराव मीं त्या जम्नाबाईची स्तुति करीत होतो म्हणून तर नाहींना त्यांना राग आला?

**रंग०**—असेल बाबा. त्याचा काय नेम. तो आहे थोडा मत्सरी.

**भागो०**—अन् माझ्याइशी मत्सर? इचिभन् ही मजाच हायकी—लइ बेस!

**रंग०**—मजा कसची? (थट्टा करण्याचे स्वरानें) अहो भागोजीराव, आपणही कांहीं कमी नाहीं. ही तुमची अक्कड हा थाट, हें तुमचं पोटांत शिरायचं अलंकारिक गोड गोड भाषण—हीं पाहिलीं म्हणजे—कोवळ्या पोरी, त्यांना काय, जातील सहज भुलून!

**भागोजी०**—हः हः हः ( मिशावर हात फिरवून व

ऐटीनं हंसून ) तें खरं म्हना. पन् रंगराव आमच्या स्वारीचं आमी आतां मालक न्हाईना ! लीला पोरीनं आपला अम्मल केलायनां आमच्यावर ?

**रंग०**–हं हं आणि गुलबरावाची काय वाट ?

**भागो०**–त्येची कसली वाट ? अव रंगराव-त्यो गुलाबराव सापडु द्या की आतां कुठं सांधी कोपऱ्यांत दडून मुरका मारून बसलाय त्यो. म्हंजी दावतो त्येला भागुजीरावाचा हिसका ! म्हणाव ल्येका नवरी पटकावली ना तुझ्या पाठीवर !

**छ०**–( प्रवेश करून ) धनीसाब खालीं येक गिरस्त आल्याती आपनाकड. त्येनां खालीं बसवूं कां ?

**रंग०**–हं बशीव.

**भागो०**–हं अतां मला गेलंच पाहिजे.

**रंग०**–जरा थांबा कायरे छब्या खालीं आलें आहे तें कोण ?

**छ०**–आपल काकासाहेब, दाजीसावकी !

**रंग०**–अरे लेका गाढवा त्यांना एकदम वर पाठवून द्यायचे होतेस कीं नाहीं ? मूर्ख कुठचा–(छब्या जातो).

**भागो०**–मलाबी थोडं काम हाय. माणकुबाईकडनं एक निरोप यायचा हय. अन् मानाजीरावांना एक पाठवायचा हाय. तवा आतां जातो. अन् रात्रीं गाठ पडुद्या बरं कां. लीला पोरीच्या नांवानं झोकूं दोन पेल सरबताच !

**रंग०**—होहो तें तर फार आनंदानं मी करीन!

( भागोजी जातो. )

**रंग०**—आतां हे आमचे काका साहेब येणार अन् एक मोठं थोरलं व्याख्यान झोडणार आमच्यावर. असो. मी इथं कशाला आलों हें त्यांना खरं कळलं नसलं म्हणजे पुरे म्हणतों.

( दाजीसाहेब येतो. )

यायचं काका साहेब! आपणाला पाहून मला फार फार आनंद झाला आहे. प्रकृतिही बरीच बरी दिसती आहे. नाहीं तर म्हटलं तुम्हीं एकदम निघून कारंजपुरांत आला तेव्हां कांहीं आजारीपणा वगैरेचं कारण आहे कीं काय कळेना! म्हणून आपला जरासा काळजींत होतों.

**दाजी०**—बरं पण तूंरे, तूं इथं नोकरीवरच आला आहेस ना रंगराव?

**रंग०**—होय काकासाहेब!

**दाजी०**—असो आयतं बरंच झालं. नाहीं तर कांहीं कामाखातर मी तुला लष्करांत पत्र पाठवणार होतों. आतां समक्षच बोलतों. मीं किनही रंगराव, आतां म्हातारा बुदरूक असामी झालों. शक्तिही कमी पडत चालली दिवसेंदिवस. तेव्हां तुला त्रास द्यायला मीं कांहीं फार दिवस वांचत नाहीं हें दिसतंच आहे.

**रंग०**—छे छे काकासाहेब. असं कां आपण मनांत आणतां आहांत! मला तर वाटतं कीं, आपण या वेळीं

प्रकृतीनं चांगले घड आहां. आणखी थोडे बहुत उल्हासीही दिसतांहां. आपण असेच सुदृढपणानं आणि आनंदांत पुष्कळ वर्षं जगावं अशी देवाजवळ माझी हात जोडून प्रार्थना आहे.

**दा०**—( हंसून ) बरं बाबा. तसंच कां होईना! मीं पुष्कळ वर्षं वांचावं आणखी तुला असाच त्रास द्यावा असंच का ईश्वरकृपेनें होईना! पण कायरे, नोकरीनं, आणखी माझ्याकडन जे पैसे मिळतात ते, तुझ्या सारख्या तरण्याताठ्या रंगेल शिपाई गड्याला खर्चाला नीट पुरत नसतील असं मला वाटत आहे. तें खरंनां पण?

**रंग०**—( आजचा हा रंग कांहीं निराळाच दिसतो आहे. ) ( उघड ) हं. त्याला काय करायचं आहे! पण काकासाहेब, मीं विनंति करायच्या आधींच आपल्या मनांत हा कळकळीचा विचार आला. या वरन आपलं माझ्यावरचं प्रेम उघड होतं.

**दा०**—दुसरं असं, माझ्या रंगरावानं या हल्लींच्या धंद्यांत रखडत न पडतां स्वतंत्रपणानें इतर कांहीं करून नांवलौकिक मिळवावा अशी माझी फार फार इच्छा आहे. म्हणून तुला एकदमच श्रीमान आणि स्वतंत्र करून सोडायचा मीं निश्चय केला आहे.

**रंग०**—काकासाहेब, या आपल्या ममतेच्या समुद्रांत आतां मीं गटकळ्या खाऊं लागणार कीं काय अशी मला शंका येऊं लागली आहे. कारण, हा नुसता उदा-

रपणाच इतका अलोट आहे कीं, आपली कृतज्ञता कशी दाखवूं या विचारानं दुसरा तिसरा माणूस वेडा होऊन जायचा. आणि त्यांतून मीं तर प्रत्यक्ष पुतण्या.

**दा०**—माझ्याकरितां म्हणत नाहीं.—पण तूं उपकार जाणतोस. हें पाहून मला आनंद होतो. असो. थोड्याच दिवसांत तुझ्या हातांत एक मोठी इष्टेट येईल समजलास!

**रंग०**—आत्तां काय बोलूं. मी उपकार स्मरतों कीं नाहीं तें माझ्या या पुढच्या आचरणानं कळून येईल आपल्याला. बरं पण काकासाहेब? मला मग लष्करची नोकरी सोडावी लागणार नाहींनां!

**दा०**—अरे. त्याचं मी काय सांगूं? तुझ्या बायकोला जसं आवडेल तसं तुला केलं पाहिजे.

**रंग०**—काय? माझी बायको?

**दा०**—हो हो. तुझी बायको आणि तूं दोघं मिळून काय तें ठरवा. त्यांत मीं तिसरा कशाला?

**रंग०**—काय म्हटलं काकासाहेब, माझी बायको!

**दा०**—हो हो. बायको. बायको असंच ना मीं म्हटलं मगाशीं!

**रंग०**—अं हं! आपण त्या इस्टेटीसंबंधानं वगैरे बोलतांना, हे बायकोचं बोललां नाहीं कांहीं!

**दा०**—असं का? बरं नसेल कदाचित्. पण ती बायकोची गोष्ट तुलान् मला कुणालाच विसरतां कामा नये. कारण स्वातंत्र्य द्यायचं म्हणून मगाशीं म्हणालों तें स्वातंत्र्य

लग्न करून मिळायचं आहे. आणि जी संपत्ति मिळायची आहे, तिच्यावर एक फक्कड नवी नवरी बसली आहे. कांहींका असेनां! बायको नसली आणि असली तरी सारखंच. डबोलं तें डबोलचं कीं नाहीं.

**रंग०**—छे काकासाहेब. तुम्हीं मला आतां याने गोंधळून टांकलंत आश्चर्यानं.

**दा०**—अरे—या पोराला वेडबिड तर नाहींना लागलं? कायरे आत्तां तूं बोलत होतासनां कीं, ममता, उपकार, कृतज्ञता यंव आणि त्यंव?

**रंग०**—होय. पण काकासाहेब, तेंव्हां आपण बायकोचं एक अक्षरही काढलं नव्हतंत तोंडातनं!

**दा०**—बरं नव्हतं—आणि आतां काढलं म्हणून काय बिघडलं त्यांत! अरे, एकादी इष्टेटच्याइष्टेटच जर मिळाली तर मग तिच्यातलं स्थावरजंगम, सजीवनिर्जीव सारंच नकोका घ्यायला?

**रंग०**—पण काकासाहेब, ती इस्टेट विकत घ्यायला माझ्या जन्माच्या सुखाची किंमत द्यावी लागत असेल, तर मी साफ सांगतों कीं ती मला घ्यायची नाहीं. बरं पण ती होती बायको कुणाची कोण आहे? तिचं नांव गांव कांहीं?

**दा०**—वेडा कुठचा! अरे नांवगांव घेऊन करायचं आहे काय तुला? कांहींही नांव असलं तरी बायको ती बायकोच असणार! हं आटप .कसा. तिजबरोबर लग्न

करांयचं आणि तिच्यावर प्रीति करायचं मला एकदम वचन दे कसा! खुळा कुठचा!

**रंग०**—काकासाहेब! आपणच पहा हें सयुक्तिक दिसतंकां? ज्या स्त्रीचं मला नांवगांव सुद्धां माहीत नाहीं तिजवर प्रीति करण्याचं वचन देऊं?

**दा०**—हो हो. कारण ज्या स्त्रीचं तुला नांवगांव सुद्धां माहीत नाहीं ती स्त्री चांगली असणार नाहीं असं तूं घेऊन चालतोस तेव्हां तूं खुळा नव्हेस कां?

**रंग०**—छे काकासाहेब. आतां मीं आपल्याला साफ सांगतों कीं, अप्सरेसारख्या सुंदर अशा एका स्त्रीवर माझी प्रीति बसली आहे. आणि मी तिला वचनही देऊन चुकलों आहें.

**दा०**—अंः एवढेंच ना? मग त्यांत काय मोठसं आहे? येऊन जाऊन वचन मोडायचं एवढंच कीं नाहीं! अरे तें एका नुसत्या निरोपाचंच काम आहे. सांगून पाठीव म्हणजे झालं, कीं म्हणावं तुझी तूं मोकळी अन् माझा मी मोकळा!

**रंग०**—पण काका, मी तिला शपथाही देऊन टाकल्या आहेत!

**दा०**—एवढंच ना? देऊन टाकल्यास तर टाकल्यास. पुन्हां परत मागायच्या भरीला पडूं नकोस म्हणजे झालं! त्या ती ठेवीना का आपल्यापाशीं? त्यांत कांहीं विशेष तोटा नाहीं. कारण त्या अप्सरेच्या शपथाही असतीलच तुजजवळ मोबदल्याला!

**रंग०**—काकासाहेब, माफी असावी. या कामांत मला आपलं साफ ऐकायचं नाहीं. हें मी एकदांच सांगून टाकतों कसा !

**दा०**—रंगराव, रंगराव नव्हे बरं ! इतका वेळ आपलं मीं तुझं बोलणं मुकाट्यानं ऐकून घेतलं; मी रागावलों नाहीं संवरलों नाहीं. संभाळ ! जोंपर्यंत माझ्या उलट कोणी बोलत नाहीं, तोंपर्यंत मी त्याचें सर्व ऐकतों. जोंपर्यंत माझ्या मनाप्रमाणें गोष्टी घडून येताहेत तोंपर्यंत मला हवा त्यानें हवा तसा वळवावा.—पण—कशाला अधिक बोलूं ? मला राग आणूं नकोस एवढंच सांगतों.

**रंग०**—मघाशीं एकदां सांगितलं आहे तेंच पुन्हां एकवार सांगतों कीं या कामांत आपली आज्ञा मला पाळतां येत नाहीं. माझा नाइलाज आहे.

**दा०**—आग लागो या तुझ्या बोलण्याला—रंगराव—पुन्हां म्हणून साऱ्या जन्मांत जर तुला रंगराव म्हणेन किंवा तुझं तोंड पाहीन तर—

**रंग०**—काकासाहेब, असं काय करतां हो ? जरा ऐकून तरी घ्याल कीं नाहीं मी काय म्हणतों तें ?

**दा०**—एक शब्द—एक शब्द—एक शब्दसुद्धां आतां बोलूं नकोस. चल, करायचंच असेल माझ्या म्हणण्याप्रमाणं तर नुसतं मानेनं एक वेळ हो म्हणून वचन दे कीं, रंगराव—छे चुकलों. तुला रंगराव कोण म्हणतो आतां?

**रंग०**—काका, काका, न बघितल्या सवरलेल्या

कोणा विद्रूप गोळ्याला गळ्यांत बांधून घ्यायचं वचन देऊं तरी कसं ह्मणतां !

**दाजी०**—अरे. होहो—नुसतं मी म्हणतों म्हणून तुला वचन दिलंच पाहिजे. विद्रूप आणि सद्रूप तुला काय पोराला ! म्हणे विद्रूप. अरे विद्रूपचशी काय पण आणखी जरी तिच्या दोन्ही खांद्यावर दोन उंटाच्या मदारी सारखीं आवाळूं उठलीं असलीं, धनुकलीच्या कामटी इतकी ती वाकडी किंवा कुब्जे सारखी अष्टावक्र असली, अथवा तिचे डोळे जरी काळभैरवासारखे बटबटीत असून बुबळं गरगर फिरत असलीं, तिचं अंग जरी घोरपडीच्या अंगासारखं खरबुजी असलं, किंवा गोसाव्या सारखी तिला दाढी असली—कांहीं असलं तरी तुला ती पत्करली पाहिजे. इतकंच नव्हे; मीं सांगतों म्हणून, वेडे लोक चंद्राकडे जसे टक लावून बघत बसतात तसं दिवसभर तुला तिच्याकडं टकमक टकमक पहात बसलं पाहिजे; आणखी रात्रीं तिच्या सौंदर्याचं वर्णन करायला तिच्यावर गाणीं करीत जागत बसल पाहिजे.

**रंग०**—ठीक ठीक—काकासाहेब हा आपला बेत इतका कांहीं सरळ, समंजसपणाचा आहे कीं तो मोडण्याची कुणाचीही छाती व्हायचीच नाहीं. ( हंसतो ).

**दाजी०**—अरे चूप. आणखी हंसून थट्टा करतोस काय माझी ! हे दांत दाखवतोस काय मला ! मूर्ख बेटा.

**रंग०**—थट्टा? छे थट्टा करायला माझं मन कुठं आहे विनोदाच्या लहरींत ?

**दा०**—होहो. माहीत आहे तें सारं मला. गुलाम गां-ळांतल्यागालांत हंसतो आहे आणि मीं पाठ फिरविली की अस्से दांत काढील. ( वेडावतो )

**रंग०**—काकासाहेब, मीं काय करावं आणि काय नाहीं हें माझं मला चांगलं कळतं आहे. समजलां!

**दा०**—पुरे पुरे. रागावून काय होतं आहे? हें रागाव-णंन फेंदारणं नाहीं म्हटलं माझ्यापाशीं चालायचं !

**रंग०**—छे छे राग कसचा. मीं हल्लींइतका शांत साऱ्या जन्मांत केंव्हांच नव्हतों.

**दा०**—आणि पुन्हां खोटं बोलतो! तूं अगदीं आंत आंत मनाच्या त्या कोंपऱ्यांत रागावून बसला आहेस तें मला दिसत नाहीं वाटतं? आहे, मला सारं ठाऊक आहे. ढोंगी बुवा—ही लपवाछपवी म्हटलं माझ्यापाशीं नका करूं.

**रंग०**—काकासाहेब,. मीं साफ सांगतों—

**दा०**—पुन्हां तेंच. मूर्ख कुठचा. रागावून काय व्हाय-चं आहे म्हटलं माझ्यापाशीं? तूं किनई अगदीं उद्धट, बेगुमान अन् मगरूर झाला आहेस सांगून ठेवतों. काय पहा! माझी चेष्टा करतो आहे बेटा! हें पहा मला उगाच चिडवूं नको. अरे गाढवा. जोंपर्यंत मी तापलों नाहीं तोंपर्यंत तुझं कांहीं बरं झालं तर होईल. माझ्या शांत स्वभावाचा दुरुपयोग करतोस काय? पण बाबा,

हे. तुला ठाऊक असूं दे सत्व ध्यायलाच बसल्यावर साधुसंतसुद्धां रागावतात म्हटलं! पण असो. आतां काय! आतांपासून ६ तास तुला विचार करायला देतों. तेवढ्या वेळांत मी सांगीन तें काम, कांहीं अटी न घालतां, करण्याला जर तयार होऊन आलास तर माझी तुझ्यावर मेहरबानगी राहील कदाचित्; नाहीं तर!— नांव कशाला? तुला नि मला रहायला गुलामा, निरनिराळींच जगें हुडकून काढलीं पाहिजेत! तुझी. नोकरी काढून घेईन, तुला एक फुटकी कवडीही द्यायचा नाहीं. अन् पुन्हां म्हणून तुला रंगराव म्हणेन तर शपथ!

( जातो ).

**रंग०**—वः काय हा शांतपणा आणि सुस्वभाव! छे छे काकासाहेब, आपल्या शांतस्वभावानं आपण धर्मराजालाही लाजवलंत! खरोखर सौम्यतेबद्दल आणि सौजन्याबद्दल आपल्या पायांवर डोकीच ठेविली पाहिजे. वहावा! एखाद्या गोष्टीबद्दलचं आपल मत सांगायचं, ते आमचे काकासाहेब, किती पण शांततेन सांगतात हो!—बर पण त्यांनीं जरी कांहींही म्हटल तरी तें सारंच खरं असेल असं कशावरून! किंवा कुठली पैसेवाली थेरडी त्यानीं काढली आहे माझ्या पाठीवर लादायला कुणाला ठाऊक! काय पहा! मनुष्याचा स्वभाव तरी किती चमत्कारिक सो! हे आमचे काकासाहेब तरुण होते तेव्हां किती पण रंगेल आणि

इषक्बाज होते ! जसा काय पीस काढून एका पायावर थयथयणारा कोंबडाच ! त्यांनीं स्वत: लग्न केलं तें केवळ प्रेमाखातर ! आणि आतां पहा माझी वेळ आली तर, काय मांडला आहे शहाणपणाचा बाजार !

( छब्या येतो. )

**छब्या**—छे छे धनीसाब, आपल्या काकासाबांनीं रागावूनशेनी या पिरथिमीला आग घालायाच्या ब्येत क्येलाया जनूं ! नुसत जिन्यातनं उतरत्यात तर कस धापाच पायऱ्यावंलांडून पावल हापटत्यात ! आन् जाता जाता भितीलाच बदाडत्यात हातानं ! तोंडानं पुटपुटत्यात काय अन् गुरगुरत्यातबी काय ! दरवाज्याशी आल तर तत मीन् माझा कुतरा, उभ ! आमी दोगबी बघतोय डोळ वटारून त्येंच्याकडे ! इचिभन त्ये काय स्वांग का काय त्ये कळबीना ! आन् जसा का मुजरा कराया मीं हात वर क्येला तसा रावांनीं दिला कीं काटीचा एक फटका डुइवर अन् काय ! अन् म्हंत्यात कस,—ल्येका छब्या, ह्ये न्हेऊन देजा तुझ्या धन्याला ! आन् भरारा शेपन्नास शिव्या हसडून ग्येली कीं सवारी एका खिनात ! छे, वा ! अन् धनीसाब आपनास्नीं ह्ये कसं मानवत देव जाने ! इचिभन जर का ह्यो माझा काका असता तर दिला असता तवाच फू करून ! कुना ल्येकाला न्होवा असला काकान् बाबा !

**रंग०**—अहो गाढवाचे राजे या वेळेला हा फाजील-

पणा करायला इथं आपणाला कुणी बोलावणं पाठविलं होतं वाटतं ! चल हो बाजूला–मूर्ख नाहीं तर–(जातो.)

छ०–अस्सं, अस्सं, आतां आलं माझ्या ध्येनांत जरास ! तरी म्हटल, इचिभन आमच धनीसाब पिसाळल्या कुत्र्यावानी का करत्यात ! ( टाळी वाजवून ) दाजीसाबांनीं हत येऊन धनीसाबासनी जरा सूर्याची पिल्लंबिल्लं दाखिवली जनूं ! तरीच. त्येंच्या फुडं बोलायची छाती होईना तवा तोंडाला लावल कुलप ! आन् त्येकाचा गाढवावानी गरीबसा छब्या गावला तावडीला तवा घेतल त्येच्यावर तोंडसुख ! वड्याच त्येल वांग्यावर काडायच म्हंजी इचिभन काय न्याव झाला ह्यो !

( चाकर प्रवेश करतो. )

चा०–छबुबावा ! अव छबुबावा–तुमासनी धनीसाब हाक मारत्यात कीं !

छ०–अर ए–घाणेरड्या कुतऱ्याच्या पोरट्या जरा दमब्रिम हाय का न्हाई ! अर उगीच काय लावलियास बोंबाबोंब !–खरच पन् आमच्या धनीसाबानी काय अन् कुनीबी काय, अस वड्याचं त्येल वांग्यावर काडनं म्हंजी लइ वंगाळ.

चा०-अव छबुबादा--अन् जलदी करा जलदी—

छ०–हुड तुझी शेपटी मी मारी त्येंका–जलदी म्हन जलदी—धनीसाब रागावत्यात त्ये रागावत्यात !

अन् ल्येका तुझावी माझ्यावर करडा अम्मल—थांब ल्येका, चुली फुकणीच्या !—( त्याला बदाडीत जातो. )

---

## प्रवेश २.

( चंपी प्रवेश करिते. )

**चंपी**—असं? एकूण तर आमच्या बाईसाहेबांच्या भावी नवऱ्यांची संख्या आणखीही थोडीशी वाढली म्हणायची! हे नवे नवरदेव कोण!—रंगरावसुभेदार कां? असेतना बिचारे! आमचा बयाणा मिळाल्याशिवाय आम्हीं कांहीं त्यांचं वकीलपत्र घेणार नाहीं खास. अरेरे त्या भागोजिरावाकड पाहून मात्र मला थोडं वाईट वाटतं खरं! बिचाऱ्याला गचांडी मिळाली अखेर! पण मानाजीराव अजून कसा नाहीं आला इथं? तो म्हटलं म्हणजे अगदीं वेळेवर यायचा! माणकीकडनं पत्रं यायचं म्हटलं म्हणजे, बसतो अगदीं लाळ घोटीत—जसा कांहीं बाई बोकाच दुधाला पाहून जिभल्या चाटतो आहे!—पण मेला कसा फसणार आहे साफ शेवटीं—मला तर त्याची आठवण होऊन हसायलाच येतं! ही माणकी का फाणकी ही वीस वर्षांची लुसलुशीत मुसमुसीत तरणी पोरगी नसून पन्नाशीच्या घराला जाऊन पोंचलेली, पण पाट लावायला उत्सुक झालेली कुणी भताडी विधवा आहे असं जर मानाजीरावाला आज कळलं तर—अग बाइ बाइ कायग होईल त्याचा विरस! जसं कांहीं मिठांत पाणी! पण तें

कांहीं कळतां उपयोग नाहीं. कारण मग मला कोण देईल लुगडीं चोळ्या, अन् कशाला!

( मानाजीराव येतो. )

**माना०**–हां वकीलसाहेब! आपण इकड कुणीकडं! आपली वाट पाहत मी घरीं किती तरी वेळ बसलों होतों. बर पण चंपाबाई, आमच्याकरितां कांहीं आणलं आहे कीं नाहीं!

**चं०**–नाहीं कसं? हें पहा आपल्या माणकीचं पत्र.

**माना०**–तूं मोकळ्या हातानं यायची नाहीं हें मला माहितीच. आण आण इकडे. काय म्हणते आहे ती माझी प्रियतमा, तें पाहूं या अगोदर.

**चं०**–हें घ्या. ( पत्र देते. )

**माना०**–( पत्र वाचतो ).

मत्प्रेमकानन प्रहारी मानाजीराव! प्रेमाच्या उर्शिकाळतेचा एक क्षण आणि निकट सांधींत घालविलेलें दैन्यशतक याचें तुलिनत्व कसें होईल? स्त्रीसहजित जें भेडावित त्याच्या योगें अधिक बोलवत नाहीं. तथापि आपल्या दृष्टभेटीनें सौख्योपाधीला जें भारत येईल तें काय सांगूं! आ० माणकी.

चंपाबाई आपल्या धनीणसाहेब बऱ्याच विद्वान आहेत असं दिसतं. ती लिहिण्याची ऐट, आणि ती शब्दाची मांडणी—

**चं०**– अहो, त्यांच्यासारख्या सत्तराव्या वर्षांच्या अनुभवशीर स्त्रीला तें कसचं अवघड?

**माना॰**–काय, सतरा वर्षांचे आंत इतका अनुभव —छे:—

**चं॰**-( आत्मग्याशीं ) अगबाई! मी फसलें होतें कीं; बाईसाहेबांचं वय विसाच्या आंत आहे म्हणून सांगायच हें लक्ष्यांतच धरलं नाहीं मीं. जळ्ळ खरं तेंच तोंडाला आलं. असो पण अजूनही सुधारता येईल. (उघड) तें खरं. पण माझ्या धनीणसाहेब किती पण डोंगरच्याडोंगर वाचतात! ही लिहिण्याची गोष्ट झाली. किनई त्यांचं बोलणं सुद्धां काय पण खुबीदार आणि रसभरित असतं. अन् त्यांतूनय जेव्हां त्या तुमच्याविषयीं बोलत असतात तेव्हां तर काय! तुम्ही स्वतःच जर तें ऐकायला असलां तर, माझ्यासारखं तुम्हांलाही तें नुसतं ऐकतच बसावंसं वाटेल.

**माना॰**–ठीकठीक. चंपाबाई तुम्हीं त्यांना सांगा कीं, माझं हृदयसरोवर प्रेमानं डबडबलं आहे. लग्न झालं म्हणजे तर ममता आणखी सौख्य यांचे जसे कांहीं झरे वाहायला लागतील. पण असो. चंपाबाई, तुम्ही आमची कामगिरी फार चांगली बजावलीत तेव्हां तुम्हांला कांहीं द्यावं असं मनांत आहे! पैकीं हे घ्या पांच रुपये. सुरेखसा जरीचा खण घ्यायला! संध्याकाळीं पुनः भेटा म्हणजे या पत्राचं उत्तर देईन! पण लक्ष्यांत राहील कां भेटायचं!

**चं॰**–नाहीं बाई. त्याचा काय नेम सांगावा? मी आहे जराशी भोळवट अन् शुद्धिसांड.

**माना०**—असं कां—बरं तर आठवण राहण्यासाठीं हा घ्या एक गोडसा—

**चं०**—इश्श! हीच का आपली थोर लोकांची रीत? आपण जर असं उद्धटपणाचं वर्तन कराल तर माझ्या बाईसाहेबांना नाहींहो पसंत पडायचं सांगून ठेवतें.

**माना०**—छे: छे: चंपाबाई, तुम्हीं चुकतांहात! अहो, पुरुषांच्या अंगांत विनय का काय म्हणतात तो असणं कांहीं चांगल नाहीं. कारण, सभ्य पुरुषांची बायका जरी तोंडदेखणी स्तुती करितात तरी, ते त्यांनां मनापासून आवडत नाहींत. फार लांब कशाला, आतां तुम्हीं आपल्या धनीनिचीच गोष्ट घ्या. मीं आतां एक वेळ गोडसा घेतला आहे कीं नाहीं! हं. हेंच जाऊन तुम्हीं बाईसाहेबांना सांगा कीं—म्हणावं मानाजीरावांनीं माझे पन्नास वेळां—

**चं०**—इश्श, खोटंच सांगू का काय मीं त्यांना!—

**माना०**—असं असं—नका खोटं नका मीं म्हणतों तसं खरंच करतों, म्हणजे झालं. ( पुढें सरतो. )

**चं०**—इश्श हें काय—शु: तें कोणसं येतं आहे इकडे.

**माना०**—बरं तर—जातों. ( जातो ).

( छब्या प्रवेश करितो ).

**छब्या**—चंपाराणीसाब—म्हाराणीसाब, हिकुडन आपला, एका गरीब गड्याचा येतोया म्हटल दंडवत.

**चं०**—कोण ते, छबाजी बावा! इश्श मीं भ्यालें कीं—

छ०—अन् न्हाउद्ये कीं त्ये तुझं भिनं न बिनं! हृतं तिसर कोन बी न्हाई. तवा म्हटल त्यो तुज्रा न्ह्येमीचा बावळटपनाचा बुरखा द्ये टाकून अन् गोष्ट कर जरा मोकळ्या मनानं! चंपे, मगा ह्याच डोळ्यांनीं बग, तुला त्या मानाजीला पत्तर द्येतांना ह्येरलं—तवा सांग कीं काय तुझ्या मनांत हाय तरी काय! आमास्नी तूं फसीवतियास ननूं! अं!

चं०—बाबा, तूं तरी मला उतावळाच दिसतोस निखा-लस! अरे तें पत्र कुणाचं कुणाला दिलं यांतलं कांहीं आहे का माहीत तुला?

छ०—न्हाई बा अमास्नी ठाव कुनाच पत्तर त्ये.

चं०—अरे खुळ्या, मग समजावून घ्यावं कीं नाहीं आधीं? हें पत्र कुणाकडन आलं होतं माहीत आहे कां? येरडया माणकुबाईकडन; ती त्या मानाजीरावाची ऐट पाहून अगदीं फिदा होऊन गेली आहे त्याच्यावर!

छ०—थू तिच्याभन. काय आवड द्वाड बगा की—अन् ती मानाजीरावावर फिदा होती तर माझ्यावर तरी कां न व्हईल! बरं—मरना का ती. आपनास्नी घेऊन काय करायची हाय! पन आमच्या धनीसाबांचं काम, त्या लीलाबाईजवळ कसं काय रंगतया?

चं०—छेः ती आतां कांहीं बोलायची सोय उरली नाहीं बाबा!

छ०—म्हंजी?

चं०—अरे, तुझ्या धन्याला म्हणजे गुलाबरावाला आणखी एक नवीन प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला आहे! आणि पुन्हां तो भागोजीराव पुरवता पण हा नको. दाजीसाहेब शिरक्यांनीं, आपल्या चिरंजिवांचं म्हणजे रंगराव सुभेदारांचं घोडं ढकललंय पुढे.

छ०—काय? दाजीसावांनीं रंगरावांपाई मागनी घातली-या लीलाबाईला!

चं०—हं. मला तें सगळं समजलं. मी तें चोरून ऐकलं सारं!

छ०—( टाळी वाजवून ) अस्सं काय—वः काय पन मना उडलिया! तर मग ही बातमी मला तावडतोब न्हेली पाहिजे नू काय! ( हंसतो. )

चं०—तूं आपला हवा तर हंस. पण तुला सांगतें बातमी अगदीं खरी आहे. पण छब्या, तुझ्या धन्याला म्हणावं—गुलाबराव धीर सोडूं नका! अजूनय आहे—

छ०—( थट्टेच्या स्वरानें ) छेः आतां कसचा धीर निघतोय त्या गडयालान् काय? मला वाटतं आमच गुलाब-राव आतां अक्षी वेड होऊन जानारन्! ( आपल्याशीं ). येड खर, पन आनंदान येड ह्ये तुला काय ठावका-ईला म्हाईत!

चं०—आणखीही गुलाबरावांनां असं सांग कीं म्हणावं रंगराव का कोण आहे तो त्याच्या बरोबर उगीच कला-

गत काढूं नका! दमानं घ्या म्हणजे म्हणाल्तं मगळं जुळेल.

छ०—छे: येड नि महायेड झाल तरी काय झालं? रंगरावासंगट गुलाबरावसाव न्हाईच कधीं भांडायच! अक्षी मी सांगतों, उगच आपल हूं म्हन. ( दोघेजण जातात. )

# अंक ३.

—:o:—

## प्रवेश १.

( दाजीसाहेबांचा दिवाणखाना. )

**रंग०**—आश्चर्यच आहे मोठं म्हणायचं! छब्यानं सांगितलेली बातमी अगदीं अक्षरशः खरी आहे. असो. बहार उडाली. आमच्या काकासाहेबांच्या तऱ्हेवाईकपणाची अगदीं शिकस्त झाली! काय मौज झाली आहे पहा! ज्या स्त्रीला उपटायचा बेत मीं केला आहे, तिलाच काकासाहेबांची माझ्याकरितां मागणी आहे म्हणे! खरोखर मीं मघाशीं फुकट वाद घातला त्यांच्याशीं. असो. पण माझ्या मन्‌ची अन्‌ त्यांनीं पसंत केलेली हीं दोन्ही स्त्रीरत्नं एकच आहेत, किंवा लीलेवरच माझं मन बसलं आहे हें त्यांना इतक्यांत कळूं देतां उपयोग नाहीं. आतां आपण इतकंच करावं कीं, काकासाहेबांचेकडे जाऊन आपल्या पश्चात्तापाचें पुराण त्यांच्यापुढें वाचावं! नुकतें मघाशींच उद्दामपणानें बेजाम्ता उत्तर देणाऱ्या वाघाचें इतक्यांतच लीन दीन मेंढरूं कसं झालं याचं त्यांनां थोडंसं आश्चर्य वाटेल. पण हा पश्चात्ताप अगदीं खराखुरा आहे अशी सुरेख बतावणी केली म्हणजे

झालं !—अरे हे इकडेच येताहेत वाटतं काकासाहेब—कायपण स्वारी फुगली आहे ? जशी कांहीं वरमाई-ची गुरवळीच !

( दाजीसाहेब प्रवेश करितात. )

**दाजी०**—छेः आतां क्षमा करायचं नांव तरी कशा-ला ! प्राण गेला तरी तें होणार नाहीं—पण प्राण तरी का जातोय ? म्हणावं, असा आणखी पंन्नास वर्षे जगून गुलामा तुझ्या बोकांडी बसेन. मगरूर नाहींतर ! मला उत्तर करतो नाहीं कां ? पुनः दर्शन नको त्याचं—

**रंग०**—( आपल्याशीं ) आतां, मला पश्चात्ताप झा-ल्याप्रमाणं सपक पडका चेहरा करून बोललं पाहिजे. पाहूं या कसा काय साधतो तो. ( पुढें येतो. )

**दा०**—कोणरे तो, माझ्या पुढें येतो आहे तोंड दाखवायला ? चल बाजूला हो कसा !

**रंग०**—काकासाहेब. पुरा पश्चात्ताप पावलेला लीन झालेला हा आपला नम्र पुतण्या—

**दाजी०**—आडदांड उर्मट द्वाड—पोरटा—

**रंग०**—मी चुकलों, काकासाहेब, माझ्या हातून मोठाच अपराध झाला. आतां मात्र मला पूर्ण पश्चात्ताप झालेला आहे. झालं तें झालं, कांहीं फिरून येत नाहीं. इत-उत्तर आपण सांगाल तेंच करायचें असा निश्चय करून कबुली द्यायला आपणाकडे आलों आहे.

दाजी०—कसची कबुली?

रंग०—आपली मायाममता, आपल प्रेम, आपला उदार स्वभाव इत्यादि—

दाजी०—बरं मग!

रंग०—इत्यादि गोष्टींचा विचार करून, आणि तसंच माझं कर्तव्य, आपला अधिकार इत्यादि—

दाजी०—बरं मग?

रंग०—इत्यादि गोष्टींबद्दल आपण जो मला उपदेश केला तो स्मरून—

दा०—बरं मग?

रंग०—मीं असा निश्चय केला आहे कीं, माझी इच्छा किंवा आवड कशीहि असो, पण आपणाला ज्या गोष्टींत समाधान वाटेल तीच गोष्ट नेहमीं करायची.

दा०—हें खरं? ( हंसून ).

रंग०—अगदीं खरं काकासाहेब.

दा०—( हंसून ) अस्सं आतां कसं बोललास बरं शहाण्यासारखं! अगदीं योग्य इतकं शहाणपण साऱ्या जन्मांत आज तुला आलं! बस्स. यापुढं तूं पूर्वीसारखा माझा रंग्या माझा रंगराव झालास खरा.

रंग०—मला आपण रंग्या म्हटलेलंच आवडतं!

दा०—हं हं! बरं रंगरावजी, आतां किनाहीं जिच्याबद्दल मघाशीं मी बोलत होतों ती स्त्री कोण हें सर्व सांगतों. मी हें मघाशींच सांगून टाकणार होतों; पण तूं लागलास—

रागाचे आणि उर्मटपणाचे फुसकारे सोडायला. तेव्हां म्हटलं आतां नाहीं तर नाहींच सांगायचा. ती तुझी होतकरू बायको कोण हें कळलं कां म्हटलं रंगराव ?–

**रंग०**–( वेडयासारखी मान हालवतो ).

**दा०**–ऐक. मोहित्यांची ती लीला ! तीच तुझी बायको––

**रंग०**( न समजल्यासारखें करून ) अं–अं– खळपटण्याचे ते–तेच मोहिते–अन् त्यांचीच कां–

**दा०**–छेः वेडा कुठचा–मोहित्यांची माणकुबाई अन्–तिची ती पुतणी–लीला !

**रंग**–काय मोहित्यांची माणकुबाई अन् तिची पुतणी लीला !–('आठवण करून ) छेः आपण नाहीं बुवा कधीं हें नांव ऐकल्यासारखं वाटत !–अं–पण हो–हे पहा–ती लीला म्हणजे तीच कीं नाहीं–जरा तिरव बघती–अन् डोक्याचे केंस जरा तांबुस तांबुस भुरे आहेत तीच नां––

**दा०**–काय तिरवी अन् भुऱ्या केसाची! हा मूर्खा––

**रंग०**–हं हं. मग मीं विसरलों असेन तर कदाचित्.

**दा०**–अरे खुळ्या, मी म्हणतों ती लीला म्हणजे रत्न आहे रत्न. तिचं वय म्हणशील तर १५ वं सरून १६ वं लागलं आहे ! ती माणसासारखी चालती बोलती आहे म्हणूनच, नाहीं तर तिला सुगंधीप्रेमानं जगाची बाग

दरवळून सोडणारी अर्धवट उमललेली कमळाची कळीच म्हटलं असतं.

**रंग०**–( एकीकडे ) आणि मी कुठं नाहीं म्हणत! ती आहेच तशी–( उघड ) असेल नाहीं तर नसेल. कशी का असेना? तुमच्या पसंतीला येईल ती गोष्ट करायची इतकं मला कळतं आहे. बस्स याहून इतर दुसरी तिसरी आपली इच्छा कांहीं नाहीं.

**दा०**–ऐकरे—तिचे डोळे पण काय आहेत नामी! सुंदर, थंड पण अगदीं सतेज पाणीदार. पुनः त्यांत लज्जा मर्यादा नाहीं असं नाहीं बरकां! आणखी कटाक्ष तर काय, साखरेचा तीर. एकदा हृदयांत शिरला कीं साऱ्या अंगांत प्रेमचप्रेम कालवून टाकायचा. हे झाले डोळे. आतां गाल सदा गुलाबाचे आपले, लाजेच्या गुलाबी रंगानं रंगलेले. मला वाटतं, मनचं हितगुज हटकून फोडणाऱ्या चाहडखोर डोळ्याच्या सहवासामुळें सदोदित खजिल झालेले असतात! आणि ओठ तर कांहीं विचारूंच नकोस. बहुधा हंसते. कधीं हंसत नसलेच तर चांगल्या पोसलेल्या तोंडल्यासारखे एकावर एक बसलेले. पण हंसण्याहूनही अधिक गोड.

**रंग०**–( एकीकडे ) वः वः म्हातारबुवा काय वर्णन दिलं आहेत पण प्रियेचं अगदीं हुबेहूब.

**हाजो०**–मी माणकुबाईनां नेहमीं म्हणतों—

**रंग०**–हो खरंच काकासाहेब, मी विचारायला विसरलों.

आपण चुलतीन् पुतणी दोघी सांगितल्यात, तेव्हां म्हणतो- माझी बायको कोणची होणार चुलती का पुतणी?

**दाजी०**—शिव शिव काय ही अरसिकता! अगदींच नंदी आहेस तूं. अरे, तुझ्या वयांत जर मी असतों, तर असलं हें वर्णन ऐकतांच, तारनळ्यासारखी मी टण्णकरर्न् उडी मारली असती.—अन् तूं म्हणतोस कीं माझी बायको कोण व्हायची पुतणी का चुलती—रंभा का राक्षसी असं कां नाहीं विचारलंस! अरे देवा. ती चुलती बायको करून घ्यायची म्हणजे झालंच. साऱ्या जगाचा हुंडा घेऊन जरी ती माझ्या मागं लागून आली तरी मागं वळूनसुद्धां पाहणार नाहीं!

**रंग०**—तें खरं, तरी तुमच्या काकासाहेबांच्या मनांतच आपलं तिच्याशीं लग्न लावून द्यायचं असलं तर—

**दाजी०**—हा वेडया. असल्या कामांत कुणी काकाचं-न् बापाचं ऐकत बसतो! बरं. मग काय मीं सांगितलीं अशी तुझी भावी बायको आहे. आहेना पसंत?

**रंग०**—(एकीकडे) पण म्हातारबुवा ही असली चांदणी प्रथम पसंत केली कुणी तुम्हीं कां मीं? (उघड) त्याचं काय! मीं एकदांच सांगितलं आहे कीं, या कामांत आ-पली मर्जी राखली म्हणजे मला सारं पोंचलं. कशीका असेना? वास्तविक पहातां माझी जी बायको होणार ती आपली माणसासारखी माणूस, भरपूर अवयवाची, धड अंगाची आणखी जातीची स्त्री अशी कोणी तरी असावी एवढी आपली माझी स्वाभाविक इच्छा. त्यांतूनही तुमच्या

मनाला आलंच तर तुमच्याखातर म्हणून, तुम्हीं मगाशीं सांगितलींत कीं नाहीं तशी पाठीवर आवाळूं वाढलेली, धनुकलीच्या कामटीसारखी ताठ, आणि कुब्जेसारखी सरळ, काळभैरवासारख्या फिरत्या बुबळांची, घोरपडीसारख्या मऊ अंगाची, चेटकिणीसारखी दाढीमिशाची—एवढंच काय पण ह्याहूनही अशीच सुंदर जर नवरी आपण मला पसंत केली तरी तिच्याशीं सुद्धां लग्न लावायला मागं पुढं न पाहणारा माणूस मी—त्या मला ही तुला आवडते का ती तुला आवडते असं आपण विचारतां काय? सुंदर आणि गैरसुंदर—आहे काय त्यांत—हेंच पहानां, स्त्रीला एकच डोळा असला तर त्यांत त्या नवऱ्याचं काय गेलं? पण आपली लोकांची नजर पडली फार दिवसापासून दोन दोन डोळ्यांच्या स्त्रिया पहायची म्हणून जरासं—हें, बाकी काय?

**दाजी०**—हा दगडा. चालता बोलता फत्तर आहेस तूं. खराखुराच शिपाईगडी म्हणजे काय, पशूच! अरे, असली पोरगी सुंदर—कीं पाहिल्याबरोबर पाहिजे त्याला एकदम लग्न करावसंच वाटेल—

**रंग०**—( भोळेपणानें ) आपणाला वाटतं आहे कीं करावसं—असलं, तर होऊन जाऊं द्या. मी आपलाच आहें. आपण पुतणी बरोबर लग्न करा मी चुलती पटकावतो. उलट हव तर उलट तिकडूनही कांहीं हर-

कत नाहीं. आपण चुलती घ्या मी पुतणी घेतों. आपल्याला दोनही एकच.

दा०—चल सोदा ढोंगी नाहीं तर! गुलामा तूं भरज्वानींत, तुझं लग्न व्हायचं अन् नवरीच्या बाबतींत अशा थापा मारतोस—हें खरं कसं वाटावं ढोंगी बुवा? अं? ( हंसतो ).

रंग०—काकासाहेब, माझी स्थिति, आपलं माझं नातं अन् माझं कर्तव्य इतक्या गोष्टी स्मरून मी जी वर्तणूक ठेवतों आहें त्याला आपण ढोंग म्हणतां तर नाइलाज आहे.

दा०—चल. चल. माहीत आहे तुझं कर्तव्यकर्म. बरं मी आतांच माणकुबाईला पत्र लिहितों. ( जातात ).

---

## प्रवेश २.

दाजीसाहेबांच्या वाड्यांतला जम्नेचा महाल.

( सर्जेराव एकटाच प्रवेश करितो. )

सर्जे०—आत्तां इतक्यांत येईल म्हणून मला सांगितलं आणि अजून कशी येत नाहीं बोवा! माझा संशयी तऱ्हेवाईक स्वभाव माझा मला टाऊक कां नाहीं? पण नाइलाज आहे. ही प्रेमाची गोष्ट म्हणजे अवघ्या जिवाचं सार म्हणून मला जरा कसोशी करावी लागते आहे दुसरं काय? खरोखर मला मगाशीं पाहतांच तिच्या डोळ्यांत आनंदाचं पाणी काय पण चमकून गेलं! छे, पण तें कांहीं उपयोग नाहीं. माझ्या वियोगांत ती आनंदी नव्हती अशी

खात्री होईल तर ठीक आहे नाहीं तर नांव नको तिचं. आली-आलीच वाटतं. हो तिचंच पाऊल तें.

( जम्ना प्रवेश करिते. )

**जम्ना**—हें काय. पुनः इतक्या लवकर बरी गांठ घ्यावीशी वाटली ? पण खरंच आपलं मन किनई सुप्रसन्न नाहीं. मग काय असेल तें असो.

**सर्जे०**—( कपाळाला आठ्या घालून ) छेः कांहीं नाहीं उगीच तुला कांहीं ..री वाटतं आहे झालं. तूं इतके दिवस सुखी होतीस मग माझं मन सुप्रसन्न कां नसावं ?

**ज०**—छेः पण कशाचं तरी वाईट वाटलं आहे आपल्याला. ( जवळ जाऊन ) सांगाचनां मला.

**सर्जे०**—सांगूच तर ऐक. तुझा आणि माझा वियोग असतांना तूं सुखी, आनंदी होतीस, तुला हंसणं, खेळणं आणि गाणं सुचत होतं कीं नाहीं बोल ? मला भागोजीरावानं सर्व सांगितलं आहे. बोल. माझं तर म्हणणं असं आहे कीं, प्रेमाचीं माणसें एकमेकांपासून दूर जातांनां जे अश्रू गाळतात, त्यांनीं फिरून भेट होईपर्यंत, त्यांच्या हृदयाला मोहरच पाडली पाहिजे.

**जम्ना**—कायग तरी बाई ! तो मेला वेडपा भागुबाई सांगतो काय आणि आपण ऐकतां काय ? हंसणं कसलं आणि गा॑गं तरी कसलं !

**सर्जे०**—अग तसं नव्हे. तूं आनंदांत होतीस हें खरं असलं तर मलाही त्यांत आनंदच आहे. पण खरंच

सांग, नुसतं होय म्हण म्हणजे पुरे—गातांनां आणि हंस- तांनां तुला माझी आठवण होत होती का ग !

**जम्ना**-( हंसत ) हें काय बरं विचारणं ? आपलं मन कधीं बदलायचं नाहीं असा विचार येऊन नेहमीं मला समाधानच वाटे. आणिक—( थट्टेच्या स्वरानें ) मी हंसलें खेळलें तर तें कशाकरितां माहित आहे कां ? आ- पण दूर राहून मला वियोगाचं दुःख देतां असं कुणाला कळलं तर ते आपणाला दूषण देतील तें वांचविण्याक- रितां. आपण नेहमीं दूर प्रवास करीत असतां येवढयानंच काय तें आपण मला दुःख देतां. एरवीं मीं जर आपणा- ला येवढंसुद्धां दूषण दिलं तर बाई मीं कृतघ्न नाहीं कां होणार ?

**सर्जे०**—हं हेंच. हेंच बघ. या कृतघ्न शब्दावरनच तुझं मन मला कळलं. मीं तुझे प्राण वांचविले येवढ्याचे उपकार मात्र तूं मानतोस पण खरी प्रीति अशी कांहीं तुझी माझ्यावर नाहीं—अं ?

**जम्ना**—( किंचित रागावून ) पुरे पुरे. भलतंच कांहीं तरी काढून भांडायचा निश्चयच करून आलां आहांत वाटतं ?

**सर्जे०**—छेः छेः, तसं नव्हेग. पण नीट विचार कर मी तुला मुद्दाम सवड देतों. कारण बायकांच्या हृदयांतले भाव कित्येक वेळां त्यांचे त्यांनांच कळत नाहींत. म्हणून म्हणतों कीं, तुझी माझ्यावर खरोखर प्रीति नसून, उप-

काराच्या ओझ्यानं तुझ्या हृदयावर दडपण पडल्यामुळं, तुला तसं वाटत आहे कीं काय तें नीट पहा. हो! उगीच तुझी फसवणूक नको!

**जम्ना**—अस्सं कां? बरं बरं! माझी चेष्टा आणि अपमान करायला आलां आहां इथं; दुसरा तिसरा कांहींच हेतु दिसत नाहीं मला. माझ्याशीं भांडण करून दुसरा कांहीं तरी साधायचा असेल लाग ( गहिंवरून ) पण माझा असा अपमान करतां तें मीं काय बरं केलं होतं तुमचं? ( स्फुंदत निघून जाते. )

**सर्जे०**—( घाबरून ) काय रडायला लागली?—थांब थांब! एक क्षणभर तरी थांब. छेः दरवाजासुद्धां लावून घेतलान्! जम्ने—प्रिये एक क्षणभर तरी थांब—अं? आकसाबोकशीं रडूं लागली वाटतं?—मूर्ख—मूर्ख शतमूर्ख मी. अशा रत्नाला अशा रीतीनं वागवावयाचं अं?—अं—अरे पण ऐका हां—( टाळी वाजवून ) आली वाटतं! काय पहा चंचळ स्वभाव तरी बायकांचा! जरा गोड बोललं कीं या वळल्याच. नुसत्या गोड शब्दाकरितां या काय वाटेल त्या करतील.—अं. अरे पण ती कुठं आहे? छेः मला उगीच भास झाला नि काय? स्त्रीजात बोलून चालून मोठी हट्टी. गेली ती अशी परतून यायला का गेली? प्रिये जम्ने, रागाव. हवं तितकं रागाव पण एकवार क्षमा केली असं म्हण. 'माफ' एवढा एक शब्द म्हणायपुरती तरी बाहेर ये. अं चाहूल उठली—आली वाटतं?—मग

एकूण हें रागावणं आपलं उगीच तर ?—( कानोसा घेऊन ) छेः पण ती कसची येती ! बायका म्हणजे—मनाच्या कठोर. पण मला तेंच योग्य आहे. अशा फुलासारख्या कोमळ मनाला मीं होरपळलं त्या माझी अक्कल कुठं गेली होती? छेः देवानं मला एखाद्या शूर्पणखेचीच गांठ घालून द्यायला पाहिजे. तीच माझी योग्यता—

( जातो. )

---

## प्रवेश २.

**माणकूबाईचें घर**—( माण. रंग. प्र. करितात. )

**माणकू**—आपण दाजीसाहेबांचे पुतण्ये एवढ्यांत आपली सर्व शिफारस आली. निराळी सांगायलाच नको.

**रंगराव**—बाईसाहेब, आत्तांपर्यंत लीलाबाईच्या दर्शनाचं सुद्धां मला सुख भोगायला सांपडलं नाहीं; तेव्हां मीं जर आपणाला असं सांगितलं कीं, या भावी शरीरसंबंधाचे कामांत माणकूबाईचा स्नेहसंबंध जोडायचा हेंच कायतें मला हवं आहे, तर तें आपणाला खरं वाटायला कांहीं हरकत दिसत नाहीं. बाईसाहेब! आपलं बुद्धिवैभव, आपली चतुरता, रसिकता शब्दपांडित्य याचे गुणानुवाद सारं जग आज गात आहे !

**माण०**—रावसाहेब, आपण मला अंत्यज मान देत आहां. असो. बसा तर खरे.

[illegible]—( बसतात. )

रावसाहेब, अलीकडे स्त्रियांच्या अंगच्या सुष्टगुणांचा चहा कोण करितो ?

**रंग०**—काय म्हटलं सुंठगुळाचा चहा !

**माणकू०**—अहो, स्त्रियांचे अंगीं असलेलं थोडंथोडकं संज्ञान त्यांना किती विशोभा देतं याची कल्पनाच नाहीं कुणाला ! जो उठतो तो सौंदर्यावर लब्ध. अहो, सौंदर्य हें काय फूल खरं पण, फूल उंबराचं—अगदीं निष्फळ.

**रंग०**—बाईसाहेब, आपण बोलतां तें अगदीं खरं आहे. पण मला वाटतं कीं, पुरुष सौंदर्यावरच लुब्ध असतात हा दोष पुरुषांचा नसून स्त्रियांचाच आहे विशेषेकरून. त्यांना असं वाटतं कीं, पुरुषांची सौंदर्याच्या फुलावरच सारी नजर. आणि म्हणून विद्याफळ आपणाजवळ असून नसून सारखंच. तेव्हां होतं काय कीं, बागेंतल्या झाडवेलीप्रमाणें, तारुण्याच्या व सौंदर्याच्या फुलपालवीचा बहर कोमेजून जाई तोंपर्यंत या हाडामासाच्या चालत्या बोलत्या लता, आपलीं ज्ञानविद्यादिगुणांचीं फळं मुळीं बाहेरच काढीत नाहींत. सौंदर्याचं फूल आणि सुविद्येचं फळ एकाच वेळीं धारण करणाऱ्या वस्तु जगांत काय त्या दोनच आहेत. एकं नारिंगी आणखी दुसरी—माणकूबाई साहेब म्हटलं आपण.

**माण०**—आपल्या सौभाषितेनें आपण मला अगदीं बेमार करून टाकलं आहेत ! खरोखर आपल्यामध्यें क्षा-

लीनता कशी अगदीं नारळांतल्या पाण्याप्रमाणें डबडबली आहे. असो. आतां तुम्हाला सांगतें कीं, जिच्याकरितां तुह्मी आज इयं आले आहांत, ती माझी पुतणी अशी खुळी आहे म्हणतां!! ज्याची आम्हाला अगदीं वास्तपुस्त देखील नाहीं असा कोणी एक भिकारडा नाईक आहे पलटणीतला त्याच्यावर आपलं इचं मन गेलं आहे!

**रंग०**—मला ठाऊक आहे, तिचं तें खुळं काम! पण एवढ्यानं माझं मन तिच्याविषयीं अशुद्ध झालं आहे असं मात्र आपण समजूं नका.

**माण०**—तिच्या त्या गुप्त गोष्टीचा मीं फोड केला, आणि तेंव्हांपासून तिला सक्त ताकीद दिली आहे. तसंच दाजी साहेबांचं म्हणगंही मीं तिच्यापुढं मांडलं आहे—पण ती आपलं एक चक्षारशद्ब ऐकत नाहीं.

**रंग०**—अरेरे याचं आपल्याला फार दुःख होत असे-ल नाहीं बरं!

**माण०**—अहो, दुःख म्हणून विचारतां काय? दुःखाची पारब्धी! माझ्या आज्ञेप्रमाणं तिनं त्याच्याशीं पत्रव्यवहार करायचा टाकून दिला असेल असं मला वाटत होतं! परंतु आजच त्याच्याकडनं तिला आलेलं पत्र वाटेंत प्रबुद्ध केलं. तें हें पहा—

**रंग०**—( अरे बाप! मी काल पाठविलेलें तेंच पत्र कीं हें. )

**माण०**—हें पहा—

रंग०—( माझंच, शंका कशाला ? अग शिंचे चंपे विश्वासघात केलास अं ! )

माण०—हेंच पहा. रंगराव ! हे अक्षर कदाचित् तुमच्या माहितीचं असेल.

रंग०—हो. वाटतं खरं. हो. मीं पूर्वीं पाहिलं आहे खास !

माण०—वाचा तुम्हींच रावसाहेब.

रंग०—( पत्र वाचूं लागतो ) "हे मद्हृदयाधिष्ठात्रि प्रणयि देवते ! हे परमपूज्य प्रियललिते" बाईसाहेब ही तर सौजयन्याची प्रारब्धी—म्हणतो परमावधीच झाली म्हणावयाची.

माण०—हं—सौजन्य—मी म्हणतें चांडालित्वाची प्रकाष्टाच झाली.

रंग०—हं पुढें—" मला जी बातमी कळली तिनं मी अगदीं भिऊन गेलों आहे. विशेषतः माझा प्रतिस्पर्धी—

माण०—नवा परपर्धि—म्हणजे कळलं कां कोणतें—आपणच बरं कां !

रंग०—अस्सं काय ? असो. " विशेषतः माझा नवा प्रतिस्पर्धी सद्गुण व सद्विद्या यांनीं संपन्न असून, सन्माननीय आहे असा त्याचा लौकिक आहे म्हणून "—असो हे कांहीं वावगं नाहीं म्हणा. खरंच आहे.

माण०—अहो ! असं लिहिण्यांत त्याचा कांहीं तरी पांथस्थ हेतु असावा असं मला वाटतं.

रंग०—आहेच. आहेच अंतस्थ हेतु, हें मीं अगदीं खात्रीनं सांगेन; हें सांगायला तो कशाला हवा ?

माण०—असो. पुढं वाचा म्हणजे कळेल आणखी—

रंग०—( वाचतो ) " आतां जिनं तुझ्यावर हा असा कडक पहारा ठेवला आहे त्या सुकट पडक्या फाटक्या थेरड्या हेडंबी संबंधानें—" अं हेडंबा— ही कोण बर ! कुणाला उद्देशून लिहिलं असेल बुवा हें असं !

माण०—अहो, माझ्या संमंदानं—अगदीं मला उद्देशून लिहिलं आहे बरं कां हें असं—असो. वाचा पुढें कळेल आपल्या आपणच—

रंग०—काय उद्धट बेटा लिहिणार तरी, असो-वाचूंया. " त्या सुकट, पडक्या, फाटक्या, थेरड्या हिडिं-बीसंबंधानें मी असं म्हणतों कीं, तिला टाळणं जरासं कठिण आहे, तथापि मीं तिला फसवून तिची फजिती करीन. कारण मीं असं ऐकलं आहे कीं, ती स्वभावतः फार खुळी वृथाभिमानी आहे. आणि त्यामुळें आपला कुरूप आणि ओबडधोबड चेहरा ती असा कांहीं साजिव-ती व आपल्या भाषणांत ज्याला अर्थ नाहीं किंवा ज्याचा अर्थ तिला कळत नाहीं असल्या विकट शब्दांची ती इतकी गर्दी करून सोडते कीं तें पाहून कोणाचीही हसून मुरकंडी वळेल. "—

माण०—पहा पहा बरं—ही स्वारी माझ्या भाषापद्धती-वर घसरली बरं कां ! माझ्या शब्दविपत्तीवर ही टिका !—

बरं कां! आतां या पाशुपताला काय म्हणावं! जर मला कांहीं येत आहे असं असेलं तर त्या दोन गोष्टी, एक भाषेचें गांभीर्य आणि शब्दांची अस्ताव्यस्तता!

रंग०—हो हो. नाहीं कोण म्हणेल. हा लिहिणारा बेटा मूर्ख आहे. त्याच्या मूर्खपणाबद्दल त्याला देहांत शासन देखील पुरेसं होणार नाहीं. असो. वाचूंया पुढें—
" हा तिचा हास्यकारक वृथाभिमान लक्षांत आणून् "

माण०—पुरे पुरे—तें द्या सोडून. पुढें—

रंग०—हो मी चुकलों. बरं पुढें—" मीं असा तर्क केला आहे कीं, खोटीनाटी स्तुति व कौतुक केलें असतां, वाटेल तो तिला हं हं म्हणतां फसवून जाईल! " याच्या धारिष्टाची तर कमाल झाली. " तेव्हां मीं अशी एक नामी युक्ति काढली आहे कीं, खुद्द तिच्याच कबुलीनें आपली भेट होईल. एवढेंच नव्हे तर आमच्या कार्यसिद्धीला तीच होऊन न कळत कुंटिणीसारखी मोठ्या हौसेनें भरपूर मदत करील. " अबब काय धारिष्ट हें!

माण०—(हंसून.) कां रावसाहेब आहे कीं नाहीं मौज! अशी गंमत यापूर्वी तुम्हीं कधीं ऐकली तरी असेल कां! हः हः हः—मला हा फसविणार अन् माझा डोळा चुकविणार हं! ठीक आहे म्हणावं. पाहूं या राजर्षी म्हटलं या उंबऱ्याच्या अंतःपुरांत तरी तुमचा प्रवेश होईल कां? कार्यसिद्धीची गोष्ट तर लांबच राहिली! पाहूं या कोणाची युक्ति नामी ठरते ती!

रंग०–(हंसून)–हो हो. यांत काय संशय? पाहूं ना-आपण कोण ठकवितो तें–काय बेटा धूर्त तरी! गाढवा-ला शहाणपणाचा इतका अभिमान!–बरं कायहो बाईसाहेब–मी म्हणतों, मौजेखातर असं कां करानां–ही तुमची पोरगी त्या ठकावर इतकी फिदा झाली आहे तेव्हां आणखी कांहीं वेळ करीना ती त्याच्याशीं पत्रव्यव-हार–आपलं काय जातं? कर म्हणावं खुशाल. अहो, ए-वढंचस काय पण हवंतर पळून जायचाही बेत करूं द्या त्यांनां. लीलेला कसं तरी करून पळून जायची स-वड द्या–आणि इतकी अगदीं कडेकोट तयारी झाली कीं, आपण आपला बार उडवूं. मी येतों पुढं, त्या गृहस्थाला अडवून पाडतो, लीलेला उपटतो कीं सूं—कां आहे कां नाहीं खाशी युक्ति! अहो, ठकाला महाठक व्हावं लागतं!

मा०–वहावा! फारच नामी युक्ति काढलीत. शाबास तुमचं चत्वार्य पाहून मला फार आनंद झाला. मला वाटतं यासारखं कपाटपाटुत्व आजपर्यंत कोणीही दाखवलं नसेल.

रंग०–पण कायहो! मला तिची जराशी गांठ घ्यायला द्याना? म्हणजे मी तिचंच थोडसं मन वळवून पाहीन. एकदां तिच्या स्वभावाचा मासला तरी कळेल म्हणतों.

मा०–हें कसं विधडून येईल कांहीं कळत नाहीं. कारण—

रंग०—अहो कांहीं हरकत नाहीं. माझी भेट घ्यायला तिची बिलकूल आडकाठी असायची नाहीं हें मी आपलं खात्रीनं सांगून देतो. मात्र तिला सांगा म्हणजे झालं— म्हणावं गुलबराव!—

माण०—काय रंगरावजी! गुलाबरावाचं काय म्हटलंत!

रंग०—( स्वगत ) ( थेरडे हळू बोल ) झटलं खोटच कां होईना पण द्या सांगून म्हणावं गुलाबराव नाईक आले आहेत तुला भेटायला. म्हणजे मग तरी येईल की नाहींहो धांवत भेटायला? अहो तिला असंच फसवलं पाहिजे.

माण०—हाहा ठीक आहे तोड. तिला अशीच फसविली पाहिजे.—काय म्हणे गुलाबराव माझीच कबुली घेऊन तिला भेटणार असंच सांगतो आहे नाहीं का तो तिला. घे म्हणावं घे—लीले—अग लीले. इकडे ये अशी पाहूं. हं: काय म्हणे मी कुंटीणीसारखी त्यांच्या भेटीला मदत करीन नव्हे कां? ठीक आहे. लीले, अग लीले—आलीस कां इकडे.—( रंगराव हंसतो ) ठीकच आहे; तुम्हांला इतकं हंसूं येतं याचं कांहीं नवल नाहीं. त्या भट पाशुपताला असाच फसविला पाहिजे.—मेल्याच्या धारिष्टाचें मला हंसूंच येतें—

रंग०—( हंसतो ) हः हः हः अगदीं हसण्यासारखीच मौज आहे ही.

माण०—अशानं ऐकत नाहींस कां! ठीक आहे

-रावसाहेब, आत्तां मी तिला इकडे धाडून देते. पोर ऐकत नाहीं म्हणजे काय! (जाते)

**रंग०**—ठीक आहे बाईसाहेब. (आपल्याशीं) ही इतकी सगळी तयारी पाहून एकाद्याला असं वाटेल कीं, " काय बेटा हा रंगराव मूर्ख आहे; एकदम पुढें होऊन आणि लपंडाव बंद करून आपलं खरं नांव सांगून आपली प्रिया कां पटकाविना! " पण लोकांना कुठं माहीत आहे कीं लीला म्हणजे तऱ्हेवाईकपणाची कमाल आहे. आज जर मीं हा लपंडाव बंद करीन आणि माझं खरं नांव सांगेन तर खात्रीनें लीला हातची जाईल. असो. या भट्टीचा काय रंग होतो तो तर पाहूं!

(तसबिरांकडे पहात राहतो.)

(लीला येते.)

**लीला**—आतां काय करूं! हें माझ्या हातून कसं होईल? ज्याचीन् माझ्या हृदयाची ओळख देखील नाहीं त्याच्यासमोर जाऊन तो प्रेमाची रडकथा गाईल ती स्वस्थपणें ऐकून घ्यायची—छे:—हे पुढें उभे आहेत तेच ते मला वाटतं. हे सुद्धां पलटणींतील सरदार असावेसे दिसतात. पण बाई, गुलाबरावांची यांना सर तरी आहे कां! पण हें काय. हे इतके तटस्थ कसे! मला वाटतं यांचाही माझ्यासारखाच जुलमाचा रामराम आहे.

**रंग०**—बाईसाहेब—

**ली०**—अरे देवा, गुलाबराव—

**रंग०**— लीले-प्रिये-गप्प. 'मोठ्यानें बोलूं नको. आणि इतकं आश्चर्य वाटलसं दाखवूं नको. गप्प.

**ली०**—खरंच मला इतकं आश्चर्य आणि भय वाटलं—पण खरोखरी इतका आनंद झाला आहे की—पण असो. आधीं मला सांगायचं आपण इकडे कसें आलां ?

**रंग०**—थोडक्यांत सांगूं. मीं तुझ्या काकूला साफ फसविलं. मींच रंगराव असें तुझ्या काकूला भासविलं. मग काय ?

**ली०**—आणि खरंच का तिला आपण गुलाबराव नव्हे असं वाटतं आहे ?

**रंग०**—वः तिची अगदीं बालंबाल खात्री झाली आहे !

**ली०**—ती आपणाला इतकी चतुर ह्मणवून घेती. तेव्हां तिची अशीही फजिती उडाली हें पाहून मला बाई हंसूंच येतं ( हंसते ).

**रंग०**—पण ही अमोलिक वेळ आपण फुकट दवडतों आहोंत. पुन्हा असा प्रसंग लवकर यायचा नाहीं. बोल तर. लीले या जाचांतून तुझी कधीं मोकळीक करूं ! आणि पण माझ्याही श्रमाचं मला तूं कधीं बक्षीस देणार हें सांग सांग लवकर.

**ली०**—बरं मग माझ्या हुंड्याची आशा सोडलीत कां तुम्ही ! खरंच प्रेमाच्या पाखराला सोन्याची साखळी घेऊन उडायला येत नाहीं !

**रंग०**—(तिला आलिंगून) अहाहा, प्रिये अशीच्या अशी-

च ही सर्वांगसुंदर मूर्त माझ्या स्वाधीन कर म्हणजे मला सगळं कांहीं पोंचलं! तुझ्या प्रेमाच्या हुंड्यावर मी अगदीं संतुष्ट आहें. दुसरं तिसरं कांहीं नको. प्रिये प्रेमाखेरीज इतर आणखी कांहींची जर मीं अपेक्षा केली तर त्याच्या मोबदला द्यायला या भिकारी गुलावराबाजवळ काय आहे!

ली०अहाहा किती गोड शब्द हे! मन हिरावूनच नेतात जसे कांहीं. खरंच असल्या सुगुणसंपन्न प्रियाच्या समागमांत विपत्ति किती वरं मजेशिर होईल?

रं०–( विपत्ति मजेशिर? असो. पण क्षणभर तसं बोललंच पाहिजे ) अहाहा आपला जीव किती सुखाचा होईल! प्रेम हीच काय ती आपली देवता. तिच्या सिंहासनापुढं बसून मठवाशी संन्याशाप्रमाणं, बाकी हरएक गोष्टीविषयीं विरक्तता वरून, एक तिचं ध्यान मनन आणि पूजाअर्चा करूं! अशा स्थितींत खरोखर आपल्या दारिद्र्याचाच आपल्याला अभिमान वाटूं लागेल. आणि विपत्तीच्या उदासवाण्या काळोख्या रात्रींत, आपली शुद्ध प्रीतीची ठिणगी काजव्याप्रमाणें चमकत राहील. हें तुझं आलिंगन आणि तुझं हसतं मुख मला असलं म्हणजे मग सारं जग यमस्वरूपी झालं तरी त्याची मला फिकीर नाहीं!

ली०–खरंच अशा सुखांत, मला हें जग सोडून जावं लागलं तरी कांहीं हरकत नाहीं.

# अंक ४.

## प्रवेश १ ला.

### भागोजीरावाचें घर.

**भागोजी**—अन् गनबा, मीं खरूखरच लई शोभतो न्हाई कां !

**गण्या**—त्ये काय इचारावं! धनीसाब म्हसोबाच्यान सांगतों, आपन् जस काइ आपन न्हवच अस दिसतायसा. अन् जर दैवानं कुरपा क्येलीच तर इचिभन धापाच दिसात आपल्या या फक्कड थाटाच्या तसबिरी, चितरशाळत फडकत न्हात्याल !

**भागो०**—( आपल्या अंगाकडे पाहून ) गण्या त्येका इचभिन खरंच किर ! नूरच्यानूर बदलतो कीं माणसाचा !

**गण्या**—फार सांगत न्हाई पन धनीसाब आपनाला या पोशाखांत जर का कुनी वळखील तर मिशिच देईन कीं उतरून ! नूर बदलतो म्हंजी इचारता काय—अन् गाढवाच घोडबी न्हाइका दिसनार ! आपन् रोजच्या सारख जाकी आज भुलाजीरावाच्या घरीं अन् मग बगा कशी काय मौज व्हईल ती. रोजच्या वळखीची मानस पन कुनी न वळखता गुमान जात्याल, कुनी डोळ चोळीत माझा मीच जाग्यावर हय का न्हाई अस आछिर करी.

च ही सर्वांगसुंदर मूर्ति माझ्या स्वाधीन कर म्हणजे मला सगळं कांहीं पोंचलं! तुझ्या प्रेमाच्या हुंड्यावर मी अगदीं संतुष्ट आहें. दुसरं तिसरं कांहीं नको. प्रिये प्रेमाखेरीज इतर आणखी कांहींची जर मीं अपेक्षा केली तर त्याच्या मोबदला द्यायला या भिकारी गुलबरावाजवळ काय आहे!

ली०अहाहा किती गोड शब्द हे! मन हिरावूनच नेतात जसे कांहीं. खरंच असल्या सुगुणसंपन्न प्रियाच्या समागमांत विपत्ति किती वरं मजेशीर होईल?

रंग०–( विपत्ति मजेशीर? असो. पण क्षणभर तसं बोललंच पाहिजे ) अहाहा आपला जीव किती सुखाचा होईल? प्रेम हीच काय ती आपली देवता. तिच्या सिंहासनापुढं बसून मठवाशी संन्याशाप्रमाणं, बाकी हरएक गोष्टीविषयीं विरक्तता वरून, एक तिचं ध्यान मनन आणि पूजाअर्चा करूं! अशा स्थितींत खरोखर आपल्या दारिद्र्याचाच आपल्याला अभिमान वाटूं लागेल. आणि विपत्तीच्या उदासवाण्या काळोख्या रात्रींत, आपली शुद्ध प्रीतीची ठिणगी काजव्याप्रमाणें चमकत राहील. हें तुझं आलिंगन आणि तुझं हसतं मुख मला असलं म्हणजे मग सारं जग यमस्वरूपी झालं तरी त्याची मला फिकीर नाहीं!

ली०–खरंच अशा सुखांत, मला हें जग सोडून जावं लागलं तरी कांहीं हरकत नाहीं.

# अंक ४.

## प्रवेश १ ला.

### भागोजीरावाचें घर.

**भागोजी**—अन् गनबा, मीं खरूखरच लई शोभतो न्हाई कां !

**गण्या**—त्ये काय इचारावं! धनीसाब म्हसोबाच्यान सांगतों, आपन् जस काइ आपन न्हवच असं दिसतायसा. अन् जर देवानं कुरपा क्येलीच तर इचिभन धापाच दिसात आपल्या या फक्कड थाटाच्या तसबिरी, चितरशाळत फडकत न्हात्याल !

**भागो०**—( आपल्या अंगाकडे पाहून ) गण्या त्येका इचभिन खरंच किर ! नूरच्यानूर बदलतो कीं माणसाचा !

**गण्या**—फार सांगत न्हाई पन धनीसाब आपनाला या पोशाखांत जर का कुनी वळखील तर मिशिच देईन कीं उतरून ! नूर बदलतो म्हंजी इचारता काय—अन् गाढवाच घोडबी न्हाइका दिसनार ! आपन् रोजच्या सारख जाकी आज भुलजीरावाच्या घरीं अन् मग बगा कशी काय मौज व्हईल ती. रोजच्या वळखीची मानस पन कुनी न वळखता गुमान जात्याल, कुनी डोळ चोळीत माझा मीच जाग्यावर हय का न्हाई अस आछिर करी.

त बघत व्हात्याल; सैपाकघरातल्या आचाऱ्यापासनं तों दिवानखान्यांतल्या धनीसाबा पावतर समद लोक आपल्याला बघायला दारापाशी धावत येत्याल; अन् आपल्या पिरतीतली चंद्रा पोरगी व्हाइका ती तर आपला ह्यो थाट बगुनशेनी लाजून ग्वाड मुरकाच मारील.

**भागो०**–खरच गन्या ल्येका या सफाईसारखं काइबी फसवनार व्हाई दुसरं! बरं गन्या तूं जा आतां.

**गण्या**–धनीसाब आपल्या या पोशाकाकड बगतच व्हावस वाटत बगा–पन–नग इचीभन–( जातो व पत्र घेऊन येतो. )

**भागो०**–( आश्चर्यानें ) काय! इचिभन गेली? कशी गेली? अन् हातची गेली? ( हातानें धरण्याचा आविर्भाव करितो ). अन् बायकु दुसऱ्याला गेली तर मी काय इत बेडकावानी मंगलाष्टक वरडायला आलु कां काय? अग थेरडे माणकुबाई, या भागूजीरावाला असल पतर लिवायला तुझा हात व्हायला तरी कसा म्हंतो!

( गण्या येतो. )

**गण्या**–धनीसाब. मानाजीराव आल्यात खालीं.

**भागो०**–जा. धाडून दे त्यास्नी आंत. ( गण्या जातो. )

( मानाजीराव येतो. )

**भागो०**–रामराम–मानाजीराव–

**माना०**–रामराम–भागोजीराव–

( एकमेकांस भेटतात. )

**माना०**—आपण इतक्या लवकर या कारंजपूरला कसे आलां?

**भागो०**—छः ती कांहीं बोलायची सोय न्हाई मानाजीराव! भुताच्या दिवटी मागन धावत जाऊन अंधारामधीं खड्यांत पडाव न्हाइ तशी झाली माझी गत. हें बगा आत्तां इकल्यांत आलो; इषकाच्या वासान आलों धांवत इथवर. पन फसलों. मानाजीराव! फसलों सफई. नांवगांव कांहीं सांगत न्हाई. पन एकानं माझं हाल केले.

**माना०**—नांव नको. पण हकीकत तर सांगाल कीं नाहीं, काय झाली ती!

**भागो०**—ह्मंजी अस बगा. एका फटाकड्या तरण्या पोरीवर आमचं मन गेलं अन् आम्हीं पिरतीच्या खळग्यांत डुईबूड बुडालों. पोरीच्या आपतांनींबी आम्हांला हूं म्हटलं. तिच्या मागनं कारंजपूरला आलों. आलों म्हून निरोप पाठिवला. त्येचं त्यांनीं उत्तरबी पाठीवल अन् आतां बगतो तों ती पोरगी म्हने कुनी दुसराच उपटनार! हे हाल न्हवत तर काय सांग?

**मानाजी**—हाल खरेच. पण याचं कारण बिरण कांहीं उमगतय का तुम्हांला?

**भागोजी**—अव कारण म्हंजी काय इचारतां! तिचा हाय म्हणे कुणी दुसराच पसंत केलेला पतिराव. त्येचं नांव गुलाबराव; तो या कारंजपुरांतचं हायम्हन.

**मानाजी**–अस्सं अस्सं. एकूण या कामांत आपणाला कोणी प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला आहे अन् त्यानें नीचपणानें आपणावर अघाडी मारिली आहे तर मग ?

**भागो०**–अहो नीचपणा म्हंजे इचारतां काय ?

**माना०**–तर मग याला काय/ करायचं तें आलंच असेल आपल्या लक्ष्यांत !

**भागो०**—नाहींबा देवाच्यान आपल्याला न्हाई कांहीं कळत.

**माना०**–हें पाहा तरवारी आत्तां आपणाजवळ नाहींत खऱ्या पण—

**भागो०**–म्हंजे ! त्येच्या संग लढाई करायची व्हय !

**माना०**–अलबत लढायच अन् दुसरं काय ?

**भागो०**–पन कायव त्येन मला राग आनल्याबिगर कसं लढाव हो !

**माना०**–अहो आणखी राग येण्यासारखं दुसरं काय करायचं उरलं आहे ! ज्या स्त्रीवर तुम्हीं प्रेम करितां त्याच स्त्रीवर त्यानंही डोळा ठेवला यापेक्षां दुसरा अघोर गुन्हा तो कोणता ! ह्या मित्रघाताला सीमा नाहीं उरली. भागोजीराव तुम्ही याची क्षमा अगदीं करूं नये !

**भागो०**–काय मित्रघात ! अहो पन मीं साऱ्या जन्मांत त्येला नुसता काळा का गोरा तो पाहिला देखील न्हाई ! मग वळख अन मैतरी तर दूरच कीं !

**माना०**—अशी तक्रार काय चालणारहो ! मित्र असेल तर त्यानं मित्रघात केला. जर मित्र नसेल तर अशा तऱ्हेनं तुमच्या प्रीतीच्या मार्गांत आड यायला त्याला अधिकारच नाहीं !

**भागो०**—( रागाचा आविर्भाव करून ) देवाच्यान् खरं बोलता तुम्हीं. मानाजीराव, माझ्या अंगांत कुरोध लई लई संचारला हय बगा. जर का गावला माझ्या तावडीत आत्ता तर देईन बंदुकीन उडवून—धडाड कडकडाड फूस!! बगा मानाजीराव! माझं मला ठाव न्हाई इक्त शूरत्व हय या पठ्याच्या अंगांत! पन—म्हनतो, त्याला मारून उगच अन्याव होऊ न्हव !

**माना०**—भल्या गृहस्था ! तुझा मानापमान ज्यानं लाथेखाली तुडवला, त्याचा सूड घेतांनां म्हणे न्याय अन् अन्याय ! अहो, न्याय अन्याय हा कुणीं पहावा ! लढाइला भिणाऱ्या शेंदाड शिपायांनीं. भीमसेनान अन अर्जुनान कधीं बघितला होता न्याय !

**भागो०**—मानाजीराव ! तुमच इरश्रीच शब्द कीं न्हाइ लष्करच्या शिपाइ चार्कीवाणी भसासा घुसत्यात माझ्या काळजात ! ( आंगाकडे पाहून ) देवाच्यान, मला वाटतय माझ्या अंगांत इरश्रीचं वारं खेळतय जणूं.—हटकूं त्याला एकदम लढाइला—अन् देऊं उडवून धडाड कडकडाड फूस करन !

**माना०**—अस्सं. अत्तां जरासे वीर बनला तुम्हीं! अहो, माझ्या वीस पिढ्यांतल्या पूर्वजांनीं अशींच युध्धं करून आपल्या प्रतिस्पर्ध्यांना चीत केलं आहे!! अन् तुम्हाला सांगतों, माझ्या हातांत वडिलार्जित दौलतीचा एक छदामही आला नाहीं खरा, पण या असल्या पूर्वजांचा मीं वंशज याच अभिमानानें चैनींत झुलतों आहे!

**भागो०**—अन् माझ आजोबा अन् पणजोबासुद्धां पलटणींतले कामदार होत म्हटलं! बस बस! मानाजीराव, एक अक्षरबी बोलूं नका आतां. तुमच्या भाषणाचं ह्ये कडाडणं ऐकूनशेनी माझ्या काळजातली दयामायाबिया समदी गेली बगा दुधावाणी अटून पार. अतां न्हाइ मीं ऐ-कायचा. सोडा मला. जाऊंद्याच. देतों उडवून, धाड कडकडाड फूस!

**माना०**—भागोजीराव! अहो अंगांत वीरश्री आली म्हणून, या गोष्टी कांहीं उगीच घाइघाइन अन् देहभान विसरून करायच्या नाहींत. अहो लढाईत झालं तरी शि-ष्टाचार आहेत ते पाळले पाहिजेत!! ज्याला लढाइला बोलवायचं त्याला पत्रद्वारा संभावितपणान निमंत्रणच केलं पाहिजे——

**भागो०**—छे: छे: मला कुरधानं देहभान इसरूनच गेलं पाहिजे. मानाजीराव, तुम्हीं जर माझ खर दोस्त असाल तर म्हंतो, मला रागावूं द्याच! बरं काय म्हंतां पत्र लिहू

होय त्याला! बरं हाय. कोण हायर शाइन कागद आणा बगू! ( चाकर आणून देतो ) हाय हाय हाय! मानाजीराव ही शाई रक्ताचीच व्हावी होती बगा! धड कडकडाड फूस! हं बरं आतां लिवायचं ना?

मानाo—अगदीं शांत चित्तानं चालूद्या काम!

भागोo—बरं, आरंभ करतांनां दोन शिव्या तर हसडून घेतों आधीं! हुड तुझी शेपटी मी मारी ल्येकाच्या—असं लिहू!

मानाo—छेः छेः भागूजीराव वेड तर नाहींना लागलं तुम्हांला? मीं सांगतों तसं ल्याहा. हं ल्याहा. “ राo राo गुलाबराव यांस रामराम विनंति—

भागोo—अबब—मानाजीराव, अन् ह्ये काय? मीं त्याच्या पायां पडनार? माझा अडलाय खेटर.

मानाo—अहो, तें खरं पण शिष्टाचार आहे कीं नाहीं!

भागोo—बरं बुवा तसं कां होईना!

मानाo—हं लिहा. “ आपण उभयतां एकाच स्त्रीवर प्रेम करीत आहों, त्यामुळें—

भागोo—बस बस, कारन तर ठीक बोलला—लिवलं.

मानाo—“त्यामुळें जो घोटाळा व द्वेष माजणार तो नाहींसा करावा म्हणून—

भागोo—ठीक ठीक, नाहींसा करायचाच त्येला. बरं म्होरं?

मानाο—"आपण मेहेरबानगी करून राने बहादुरांच्या आमराइत येणेचे करावें.

भागोο—मेहेरबानगी! अन् ती कशापाई बुवा? मीं काय मेजवानीबिजवानीला बोलावतो का काय त्येला, म्हनून म्हेरबानगी करतोय!!

मानाο—बाबा, आतां गप्प बैस जरा. हं लिहिलंस?

भागोο—हं, बोला पुढं.

मानाο—"म्हणजे आपल्या वादाचा एक निकाल लागण्याला ठीक पडेल.

भागोο—ठीक आहे. लिवलं. आतां हें बंद करतों. आन् त्याच्यावर मोहोर कसली करायची समजलं कां? नंबियाची अन् बंदुकीची.

मानाο—व: हेंच योग्य. ठीक आहे. भागूजीराव आतां मन मोकळं करून हातानं काम केलंत कीं सगळं भांडण एकदम मिटेल. वेळ केव्हांची ठरायची हें तुमचं तुम्हींच ठरवा. आजची संध्याकाळच ठरविली तर चांगलं असं आपलं माझं मत आहे. एकदां काय व्हायचं असेल तें होऊन जाईल; म्हंजे आपले उद्यांला मोकळे.

भागोο—ठीक आहे.

मानाο—मीं आतां संध्याकाळशिवाय तुम्हांला भे-

टणार नाहीं. तोंपर्यंत आपलें धैर्य वीर्य कसं अगदीं तरवारीसारखं लखलखीत आणि कटयारीसारखं तीक्ष्ण करून ठेवा बरं कां ! ( जातो )

**भागो०**—होहो—इचारता काय—देईन त्याला उडवून—धाड कडकडाड फूस्—( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

( भागूजीराव आणि गण्या. )

**गण्या**—छेः इचिभन आपुन न्हाईबा अशी गोष्ट कधींबी करनार. मानाजीराव न्हाई मानाजीरावाचा बा झाला म्हून काय झाल, माझ्या मनांत न्हाई तर मला लढाई कराया लावतो व्हय ?

**भागो०**—लेका गण्या, तूं जर मानाजीरावाच भाषण ऐकलं असतस तर—तर कशाला व्हाव—ल्येका, तुझंबी ईरश्रीच आवळ शिजाया लागल असत कीं !

**गण्या**—त्येचं कशाला नांव घ्येता ! धनीसाब ! बरं आनखी असं बगा, काठी घेऊन एकमेकाला बदडायच म्हटलं तर कांइ तरी बर ! पन् ह्यो जीव गमावायचा ख्येळ लइ लइ वंगाळ !

**भागो०**—पन ल्येका, तस न्हाई केलं तर आपला अपमान होतोयना ! माझ्यासारख्या गिरस्ताग, मानाला लइ जपल पाहिजे.

**गण्या**—त्ये खरं म्हना. पन धनीसाब, गिरस्ताचा मान मिळवाया जायच्या पायांत गिरस्तच गमावायचा वकुत आला तर मग? धनीसाब! ह्या मान लई टरूवा हाय बगा. ह्येच्या पायीं मानसं तशाच जात्यात फसून! म्हंजी, असं बगा मीं हाय एक सदगिरस्त आन् मानापमानाकारितां मी कलगत करतों दुसऱ्या एका सदगिरस्ताबरोबर! झालं दोघबी लढतो—हानतों, मारतों, परान घेतों. जर कां मीं त्येचा जीव घेतला तर समदं ठीक. माझा परान अन् मान माझा मला मिळाला. पन जर कां त्येच त्येन मला मारलं तर मग मीं जातों भुईंत पुरून. अन् धनीसाब, माझा मान—कुठं हाय! ग्येला का न्हाई—माझ्या दुस्मानाला आपसुखच!

**भागो०**-तसं न्हाई गढ्या. तूं जर कां मेलास तर तुझा मान येतो तुझ्या बरोबर!

**गण्या**–( मोठ्यानं हंसून ) अन् धनीसाब, त्यो मान मला यत घ्येऊन काय करायचा जी! हांतरायचा न् पांघरायचा जणूं भुईंत!!

**भागो०**—छे थू: ह्येका गण्या तूं तर भागुबाई दिसतुस. माझ्यावाणी शिपाई गड्यानं तुझं जराबी ऐकूं नये. अरं, माझं वाडवडील कस व्हतं शूर! अन् भागुबाईपणा करून त्येंच्या नांवाला काळूखी आनूं म्हंतोस व्हय?

**गण्या**--धनीसाब, आपल्या संगदांच वाडवडील लई लई चांगल असत्यात खर पन त्यांची संगतवी नगा अस वाटतं मला. कारन त्यांच्यासारख व्हायाच म्हंजी आधि परान गमावून बसायला व्हावना पन !

**भागो०**--खरं गड्या, तूं म्हंतोस त्येबी खरंच. पन कायर गन्या, लढाई करायची म्हंजी त्यांत हटकून परान् जायाचाच का कायर ! अन् मीं आतां लढाई करनार तर त्यांत लई लई भीति बिति हाय असं वाटतं कायर तुला ?

**गण्या**--धनीसाब, भीति म्हंजी इचारता काय ? आपल्याला या लढाईंत यश येईल अस आपल्याला बिलकुल वाटत न्हाई. म्हंजीं अस बगा. तुमच्याबराबर लडनार त्यो असनार कुनि तरी वाघावानी भयंकर मानूस. अन् त्येच्या हातांत, सुईवाणी बंदुका अन् फुकणीवाणी तरवार अन् मग--लइ लइ भयंकर इचिभन.

**भागो०**--गन्या, तूं काय मला भीतिबिती दावतोस व्हय ! म्हटल अशान भ्यायचा नाहीं समजलास ! हें बघ त्याला लिवलेल पत्र अन् माझा मितर रंगराव आत्तां येईल हय तवा त्येच्याबरावर देतो पाठवून.

**गन्या**--हं ठीक हाय. मीं त्या पत्राला हातवी लावायचा न्हाई. त्येला रगताचा अन बंदुकीच्या दारूचा वास येतुया जणुं. धनीसाब बगा बरं अजून म्हंतो. आपून हे पत्र पाठवूं नये हे लइ चांगलं--( जातो )

**भागो०**–नाजा मित्रा भागुबाई कुठचा मीं तर लढना-रच. धाड कडकडाड फूस.

( रंगराव येतो. )

**रंग०**–काय बुवा भागुजीराव झालं काय ?

**भागो०**–मित्रा, भाग्या कुठचा—

**रंग०**–अरे पण हो मला कशाला बोलावयाला पाठव-ल होतस तूं ?

**भागो०**–अस्सं. तूं आलास व्हय मित्रा ! हं हें बघ. ( पत्र देतो ).

**रंग०**–( वाचतो. ) गुलबराव नाईक यांस–( आप-ल्याशीं ) हं हें काय बरं लचांड ! ( उघड ) कायरे हें काय ?

**भागो०**–काय म्हंजी लढाइचं आवतन.

**रंग०**–म्हंजे आपण आतां गुलाबरावाबरोबर लढणार कीं काय ?

**भागो०**–यांत काय संशोव ! मानाजीराव इथ आल होत. त्येच्या सांगण्यावरन मला जो कांहीं कुरूध आलाय त्यो काइ इचारू नगा. आजच्या आज सांच मला त्येच्या बराबर लढल पाहिजे. का इत्का राग आलेला फुकट घा-लवायचा कीं काय म्हंतोस ?

**रंग०**–बरं मग मीं काय करायचं म्हणतोस ?

**भागो०**–तूं करायच त्ये इत्तच कीं, तुला या गुलाबरावाचा ठावठिकाण काइवी म्हाइत असेलस वाटतय तवा तूं ह्ये घ्येवावस अन् त्येला द्येवावस.

**रंग०**–( हंसून ) एवढंचना! ठीक आहे. दे ते मजजवळ म्हंजे अगदीं त्याचं त्यालाच पोचलं असं समज.

**भागो०**–पन मित्रा, तुला लइ तरास पडनार न्हव? म्हून जरा वाइट वाटत बग.

**रंग०**–छेरे. काडीइतका त्रास नाहीं अगदीं समजलास?

**भागो०**–पन् कायर रंगराव! मी जवा लढाईं करीन तवा तूं माझ्या संग न्हाशीलका माझा सोबती म्हनून?

**रंग०**–हो पण तें कांहीं कारणामुळ नीटसं दिसायच नाहीं म्हणून म्हणतो, मला माफ कर. एरवी तुला जय यावा अशी माझी मनापासून इच्छा आहे समजलास. मी जातों तर आतां वीरा! आज विजयश्री तुला खचित नवरा करून घेणार. ( जाऊं लागतो. )

**भागो०**– अन् हें बघ जर त्या गुलाबरावानं तुला विचारल तर त्याला द्ये सांगून बरं का, कीं म्हणावं भागूजीराव निवळ सैतान हाय.

**रंग०**–हो पण येवढच का? मीं त्याला सांगीन कीं भागूजीरावाला सारे लोक खवीस कुतरा म्हणतात.

**भागो०**–हं अन् इतकं सांगून जर तो थोडा भ्याल्यासारखा झाला तर दे आणखीं सांगून–म्हणावं निदान एक जवान ठार केल्याशिवाय त्याचा एक

आठवडाबि सुनका जात न्हाहीं. ( डोळे मिचकावून ) म्हंजी तो कदाचित् न्हाई येणार लढायला आणखी काय ?

**रंग०**—ठीक आहे. मी सांगेन कीं, या भागूजीरावाला सारं जग रडवय्या—अंहं—लढवय्या भागूजी म्हणतं.

**भागो०**—बस बस, असंच. हें पहा. माझा मान मला परत मिळाला म्हंजी झालं. त्येचा उगच जीव घेऊन मला काय करायचा हाय म्हणून म्हंतो.

**रंग०**—वः भागूजीराव तूं फारच मायाळू दिसतोस बाबा मला.

**भागो०**—( त्याचा हात धरून ) नाहीं मी म्हनूतों उगाच त्या गरीबाचा प्रान घ्यावा असं कां म्हनूशील तूं ?

**रंग०**—छेरे. पण अशी शंका तरी कां आली तुला ? बरं, मग त्याला काय सांगायच कीं, भागूजीराव अगदीं सैतान आहे असंचना !

**भागो०**—हो असंच. आणखी म्हणावं कीं, आज भागूजीराव जितक्या रागांत मीं पाहिला तितका साऱ्या जन्मांतही कधीं पाहिला नव्हता.

**रंग०**—हो हो. अन् खवीस कुतरा अन्—रडवय्या भागूबाई—सगळं सांगतो. ( हंसत जातो. )

( दोघेही जातात. )

## प्रवेश ३ रा.

मानाजीराव येतो.

**मानाजी०**—काय माझी माणकी सुद्धां यानं उपटलीन् हा रंगराव सुभेदार कुठं लपून बसला आहे तें देव जाणे! खरोखर हे लष्करांतले कामदार आपल्या त्या झोकानं अन् थाटानं, जातां जातां कुमारिकांचीं मनं पटकावतात. अन् अशानं दुसऱ्याच्या प्रीतीच्या कामांत जिथं तिथं बिबा घालतात! माझीं एक नाहीं दोन लग्नं अशीं बुडलीं. त्यांच्यामध्यें एवढी काय जबर मोहनी आहे तें कुणाला ठाऊक! एवढं मात्र खरं—त्यांच्या त्या पोषाखाची अक्कड पाहून पुरुषांनां सुद्धां टकमक टकमक पहात उभं राहवंसं वाटतं! बरं हा इकडे कोण येतो आहे? मला वाटतं तो रंगराव सुभेदारच. होय तोच.

**रंगराव**—( प्रवेश करून ) हं! शेवटीं माझ्या लपंडावाचा अन् मसलतीचा मासलेवाईक फजिता उडाला नाहीं म्हणजे पुरे म्हणतों. माझ्या युक्तिबाजपणाचं मला फार उत्तम बक्षीस मिळायचं एकादेवेळीं! काय तरी हा तऱ्हेवाइकपणा तिचा! शर्थ झाली. खरोखर या धास्तीनं माझं मन उदास झालेलं आहे!

**मानाजी०**—( स्वगत ) याच्याशीं बोलायला वेळ फार नामी मिळाली! याचा नूर तर माझ्या कामाला फार पडेल असा दिसतो आहे. तर मग आतां करावीच बोलायला सुरुवात आणि काय? आपल्याला जी

कुरापत काढायची आहे तिला ही अशी संभावितपणान्वी प्रस्तावना केली असलीं म्हणजे बरं! पण आतां यान्याशीं काय बोलवं बरं प्रथम? हं.—असंच (रंगरावाजवळ जवळ जाऊन) सुभेदारसाहेब यासंबंधानं म्हटलंत कीं नाहीं, तर खरोखर आपलं जुळणार नाहीं. आपला अन् माझा मतभेद आहे या कामीं.

**रंग०**—(आश्चर्य पावून) वः गड्या. तूं कीं नाहीं युक्तिवादांत फारच पटाईत दिसतोस. आपण मनकवडे तर नाहींना? कारण खरंच म्हणाल तर आपल्या स्वारीचं आगमन झालं कीं नाहीं त्यावेळीं मी कशावरच मत देत नव्हतों.

**मानाजी०**—म्हणून काय झालं? अहो मन लबाड बोलतं तशी जीभही लबाड बोलते. त्यांत काय आहे!

**रंग०**—वहावा. अहो शास्त्रीबुवा आपला गहन सिद्धांत कीं नाहीं अगदीं यथार्थ आहे. पण माझं गरीबाचं म्हणणं असं कीं, मनुष्यानं आपले मनांतले विचार जर कधींच ओंठाबाहेर काढले नाहींत तर निदान त्याच्याबद्दल मतभेद आणि वाद करायला जागाच उरत नाहीं, याचं कसं काय वाटतं आपल्या मतीला!

**माना०**—(मोठ्यानें हंसून) हं! मी तरी काय म्हणतों आहें मगाचपासून—तेंच तें अगदीं बरोबर. मी म्हणतों कीं, आपलं आणि माझं पटायचं नाहीं या बाबदींत (जरासा रागावून) आपला न माझा मतभेद आहे म्हटलं मतभेद या कामीं—समजलं कां?

• **रंग०**—या आपल्या एकंदर भाषणाच्या धोरणानं आपली स्वारी कज्जेदलाली करण्यांकडे झुकती आहे असंच मला म्हणावं लागतं. दुसरा कांहींच अर्थ दिसत नाहीं माझ्या बुद्धीला.

**माना०**—अहाहा ! सुभेदार साहेब, आपली धारणाशक्ति फारच प्रचंड आहे याबद्दल मला आनंद वाटतो. माझ्या मनांतला अर्थ आपण कसा बरोबर चटकन् उचललात म्हणून सांगूं ! (लवून जरा रागानें) भल्या माणसा मला हवी होती तीच गोष्ट तूं नेमकी बोललास.

**रंग०**—महाराज, आपल्या इच्छेच्या आड मी येत नाहीं. पण आपला हेतु काय आहे हें थोडक्यांत आणि चकटन् जर बोलून दाखवाल तर मजवर मोठी मेहरबानगी होईल.

**मानाजी०**—सुभेदार साहेब माफ करा. आणि उतावळे होऊं नका. आपलं अन् माझं जें भांडण आहे तें आपलं असंच लहानससं आहे. आणखी तें काय कसं असं जर मी फोड करून सांगत बसलों तर त्यांतली लज्जत किंवा मजा किंवा खुमारी निघून जाईल म्हणून म्हणतों ! ! आतां तुमची स्मरणशक्ति झाली तरी जराशी बुरणुसलेली दिसते. कारण एरवीं आपण माझा जो अपमान आणि अपराध केलात त्याचं आपणाला इतक्यांत विस्मरण पडलं नसतं

असं वाटतं. असो. त्याची आतां कशाला जास्ती वाटा-घाट (अस्तन्या वर केल्यासें दाखवून जरा रागानें) गृहस्था आतां कुठं, अन् केव्हां हें एकदां लवकर बोलून टाक दुसरी तिसरी गोष्ट नाहीं.

**रंग०**—ठीक आहे. आपल्या मनांतच जर आहे तर माझी कांहीं हरकत नाहीं त्या गोष्टीला. आणखी लवकर उरकून घ्याल तितकं मी म्हणतों बरंच. तर मग काय ठरलं ? आज संध्याकाळीं आणि या बागेच्या झाडींत. म्हणजे आपल्या आड कुणी यायला नको अन् जायला नको.

**माना०**—अलबत. हे लोक असे असतात कीं, त्यांना एकदां यांतली बातमी लागली कीं, प्राण जसा कांहीं जातो त्यांचा. ते काय हवेतें करतील पण मध्यें पडल्या-वांचून म्हणून राहायचे नाहींत. आणि आमच्या सार-ख्यांना स्वस्थपणानं अन् मुकाटयानं लढूं देणार नाहींत. त्यांना मोठी वाईट संवय लागली आहे. बरं सुभेदार साहेब, मला काय कुठंही म्हटलंत तरी ठीकच आहे. तरी पण त्यांतल्या त्यांत सवड करून राजे बहाद्दरांची आमराई जर पसंत केलीत तर माझ्यावर उपकार होतील. कारण सहा वाजण्याचे सुमाराला मला तिथंच कांहीं कामाकरितां जायचं आहे तेव्हां म्हटलं साधल्यास आपलं कामांत काम उरकून घेतां येईल.

**रंग०**—ठीक आहे. माझी कांहींच हरकत नाहीं. समजलांत ? तुमचा आमचा मतभेद झाला आहे असं तुम्ही नुकतेंच सांगितलें आहे. त्याचा नीट खुलासा करून टाकूं.

**माना०**—वहावा. माझ्यावर मोठे उपकार झाले बरं ! मग कसं कायहो, सहा वाजून गेल्यावर म्हटलं म्हणजे नुसता कट्यारी कट्यारीनं लढण्यापूर्तीच उजेड असेल नाहीं तिथें ? लांबून गोळी घालण्याला चांगलंसं दिसणार नाहीं.--ठीक आहे तर ठरलंच म्हणावयाचं. आतां माझ्या मनाला जरासं बरं वाटलं. ( जातो. )

( सर्जेराव येतो. )

**रंग०**—बरं बुवा तुझी गांठ पडली अनायासानें. मीं आतां तुलाच हुडकायला निघणार होतों. मित्रा, हीच तुझी आमची शेवटची भेट !

**सर्जे०**—अरे म्हणतोस तरी काय कळूं दे. कां लीले-नं मन बदलून माघार घेतली कीं काय ? मला तर वाटतं कीं, तिची स्वतःची आणि तिच्या काकूची आज्ञा या दोनही गोष्टी संभाळण्याची तिला सुरेख संधि आली आहे. कारण कुणीकडूनही पाहिलं तरी तुझा तूं कायमच.

**रंगराव**—अरे तें सारं खरं पण—गुंडाळूंच तर आतां पुराणाची पोथी! आणि सांगूंच तुला सर्व तथ्यार्थ एका शब्दांत. हें पहा ! एक सद्गृहस्थ आहे. तो स्वभावानें फारच गोड अन् चांगला आहे. त्यानं आपलं सहज

तुझा गळा कापूं देशील कां म्हणून विनंति केली अन् ती मान्य करण्याचा मी निश्चय केला आहे. बस्स. दुसरं काय!

**सर्जे०**—शहाण्या माणसा. आतां माफ कर. ही थट्टा पुरा राहूं दे.

**रंग०**—थट्टा ? छेः वेड्या ! गळे कापायची कुणी थट्टा करील कां ? हें पहा. मी तुला सांगतों. मानाजीराव म्हणून एक गृहस्थ आहे तो तुला आहे कीं नाहीं माहीत !

**सर्जे०**—आहे ठाऊक. बरं मग त्याचं काय ?

**रंग०**—हं. त्याचा मी म्हणें कायससा अपमान अन् अपराध केला आहे. कसला तो काय कीं, कसं कां असेना ? त्याचा मी अपमान केला आहे खरा. आणि तो धुवून काढण्याकरितां, त्यानं आज संध्याकाळीं मला आपली छोटी तरवार घेऊन राजेबहादराच्या बागेंत बोलावलं आहे. मला गेलं पाहिजे याबद्दल कांहीं वादच नाहीं. फक्त तूं मात्र मजबरोबर चल असं म्हणायला मी तुजकडे येणार होतों तों तूंच भेटलास, काम झालं.

**सर्जे०**—चल वेडा कुठचा. इथं कांहीं चुकीनं घोटाळा झाला आहे खास. मानाजीराव माझ्या माहितीचा आहे. त्याचं म्हणणं तरी काय हें तो मला चांगलं खुलासेवार सांगेल. अन् काय भानगड असेल ती सहज मिटवून टाकतां येईल. पण कायरे. आज संध्याकाळचीच वेळ ठरली आहे म्हणतोस. खरंच दुसरी कोणतीही वेळ असती तर फार चांगलं झालं असतं. कारण जम्नीचं

आणि माझं आतां पुनः जरासं बिनसलं असल्यामुळें माझं भान नाहींसं होऊन गेलं आहे. माझ्या या दुष्ट त्रासदायक स्वभावामुळं मीं तिला इतक्या कठोरतेनं वागविली आहे कीं, पुनः आमची दिलसफाई होई तोंपर्यंत मला चैन म्हणून पडायचं नाहीं. म्हणून म्हणतों—

**रंग**०—कमाल केलीस बुवा. तूं तरी खरोखर जम्नेसारखं रत्न पदरीं पडायला अगदींच अयोग्य आहेस.

( चाकर येऊन पत्र देतो. )

**सर्जे**०—रंगराव हें पाहिलंसका तिच्याकडेचंच पत्र आहे हें. आपली नाहीं बुवा छाति होत हें उघडण्याची. माझ्या मूर्खपणाबद्दल मला केवढं हें प्रायश्चित्त भोगायला लागत आहे !

**रंग**०—इकडं आण बरं पाहूंदे ( घेऊन वाचतो ) होय बुवा संपलं. तुला शिक्षा सांगितली आहे यांत शेवटची. आटपलीं ग्रंथ आतां आपला.

**सर्जे**०—सांग बाबा, सांग कायतें एकदम उगीच तिष्ठत बसवूं नको मला.

**रंग**०—ऐक तर. (वाचतो.) " मला निष्ठुरतेनें वागविल्याबद्दल आपलं मन आपणाला खातच असेल. तेव्हां मीं त्यासंबंधानं एक चकार शब्दही पुनः काढीत नाहीं. तरी पण आपल्या बरोबर जरासं बोलायचं आहे. चिटी पावतांच निघून यायचं करावं ! आपली जम्ना " का

सर्जेराव! हा राग आणि ही निष्ठुरता बरीच आहे म्हणा-यची लोण्याहून मऊ आणि साखरेहून गोड. ( त्याकडे पाहून ) कां या प्रेमळ निरोपानं तुला बरं नाहीं वाटलं वाटतं ?

**सर्जे॰**–हो–बरं–बरंच तर काय ! पण–

**रंग॰**–आग लागो या तुझ्या पण परंतुला. नी ऐक-तांच दुसऱ्या तिसऱ्या मनुष्याला स्वर्गसुख मिळालं असं वाटावं ती बातमी तुला ऐकायला सांपडली असून तुझा आपला पण परंतु आहेच तयार दुधांत मीठ कालवायला.

**सर्जे**–तसं नव्हे. मित्रा-पण तूंच, पहा. अगदीं प्रांजळपणानें बोल हां–माझ्या या प्रियेनें मला क्षमा क-रायची इतकी उतावळी केली, ती योग्य काय ! तिला या गोष्टींतला नाजुकपणा कांहींच कळत नाहीं. पोर अगदीं धीट आणि उद्दाम दिसते. हें नाहीं मला आवड-णार. अरे. दिल जमाई करण्याचे कामीं, विनयशील कु-मारिका आपण होऊन कधीं प्रयत्न करतील काय ? पुरुषांनीं म्हणावं हं. आणि स्त्रियांनीं म्हणत असावं अं हं. आपल्या प्रीतीचा पुरुष झाला म्हणून काय झालं तो होऊन हीन दीनपणानें प्रसन्नतेचा वर मागेपर्यंत कुमारिकांनीं आपली मर्यादा आणि भीड शाबूत राखली पाहिजे. त्यांची क्षमा काय किंवा प्रीति काय कांहीं झालं तरी मागितल्याशिवाय मिळणं म्हणजे कसं बरं ? तूंच सांग. माझा मित्र आहेस म्हणून विचारतों.

•रंग–बाबा, तुझं पांडित्य ऐकायला मला कांहीं वेळ नाहीं, अन् दम नाहीं. तूं अगदीं विक्षिप्त प्राणी आहेस यापेक्षां कांहीं जास्त मी बोलत नाहीं. सहा वाजण्याचे पूर्वीं भेट बरं! अरे! गृहस्था माझ्याकड पहा. मी काय खटाटोप केला! केवढा उपद्व्याप मांडला! लबाड झालों. कपट केलं. एक हेतु साधण्याला मीं नाहीं नाहीं तें केलं आहे. असं असून शेवटीं केवळ दुसऱ्याच्या मूर्खपणामुळं माझी सफाई निराशा अन् पुरी फजीती झाली नाहीं म्हणजे मिळाविली. अशा स्थितींत मी जर कां त्रासलों, रागावलों कुरकुर केली तर एक शोभेल. पण तूं कसा आहेस पहा. सगळ्या गोष्टी तुला अनुकूळ असून आपल्या तऱ्हेवाईकपणानं आणि संशयी स्वभावानं नसत्या अडचणी उत्पन्न करून घेऊन दुःख पिकवितो आहेस. तेव्हां तूं मात्र कींव करायला अगदीं योग्य नाहींस. तुझी फजीतीच झाली पाहिजे. बरं यायला विसरूं नको हां! (जातो).

सर्जे०–काय करावं बुवा! याचं बोलणं तर आपल्याला अगदीं पटतं. आणि त्याबद्दल वाईटही वाटतं. पण तो कांहीं कां म्हणेना? प्रीतीच्या कामांत ही कसोशी केल्याशिवाय नाहीं बोवा आपल्याच्यानं राहवणार. अरे, रानांतनं चालायचं म्हटलं म्हणजे पुढें मार्ग बघूनच पाऊल टाकलं पाहिजे. नाहीं तर तुझ्यासारखा अविचार केला तर पायांत काटे नाहीं घुसणार?—बरं पण या माझ्या मित्रा-

नं हत्यारानं खेळायचा हा घातक खेळ काढून त्यांत मला गुंतवून टाकलं आहे. त्याच्यायोगानें माझ्या डोक्यांत एक कल्पना आली आहे. ती ताबडतोब अमलांत आणलीच पाहिजे. माझ्या प्रेमपात्राची प्रीति, तिचा भाविकपणा लावून पहायला हा कसच होणार आहे. तिची प्रीति जर का बावनकशी शुद्ध सोन्याप्रमाणें उतरली तर मग मी त्यावर आपलं नांव अक्षय खोदून ठेवीन. आणि मग हा संशय सारा झुगारून देईन. पण जर कां त्या प्रीतींत गर्व किंवा स्वार्थीपणाचा कांहीं हीणकस उमटला तर ती सोनपुतळी अगदीं दूर फेकून देईन. मग ज्या अविचारी, निःसंशयी मूर्खाला ती हवी असेल तो ती खुशाल घेवो. तिच्याकरितां सुस्कारे टाकीत व पाणी गाळीत बसो कीं मरो. (जातो.)

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

(पायघोळ कोट घालून व त्या खालीं तरवार लपवून रंगराव येतो.)

**रंग०**—ही तरवार मला जरा बेतानंच वागविली पाहि-जे. कारण या कारंजपुरांतल्या रस्त्यांत कुणाच्या हातांत ही चीज बघितली कीं, पिसाळलेल्या कुत्र्याच्या मागं लागावे तसे लोक त्याच्या मागं लागून भयानं बोंबाबोंब करीत सुटतात. अरे बापरे. पण हें इकडे कोण येत आहे? हे आमचे काकासाहेब वाटतं! ठीक! आतां यांचं तोंड कसं चुकवावं बरं?

(तोंडावरून कोट घेऊन वळण घेऊन जाऊं लागतो.)

(दाजी साहेब प्र०—)

**दाजी०**—इतक्या थोडक्या अंतरावरनं सुद्धां मी फसलों अं! तो गृहस्थ मला ओळखतोसा दिसत नाहीं म्हणूनच कायतें, नाहींतर हा रंगराव नव्हे असं मला कधीं तरी वाटलं असतं काय! अरे पण हो. अं! खरंच कीं, हा रंगरावच. कायरे रंगराव! असा बाचकतोस कां! हो शंकाच नको रंगरावच तो. रंगराव अरे रंगराव!

(त्याजकडे जातो.)

**रंग॰**—( स्वर पालटून ) रावसाहेब! आपण मला ओळखतां आणि मीं आपणाला ओळखीत नाहीं असं झालं आहे खरं. आपणाला कधीं पाहिलं असावं असं कांहीं वाटत नाहीं. मग—माझं नांव गंगाजीराव आहे रावसाहेब.

**दाजी॰**—( चपापून व जीभ चावून ) अस्सं काय! मींच चुकलों माफ करा हं! मला वाटल आपण रंगराव माझे पुतण्ये (जाऊं लागतो).—( पुन्हां निरखून पाहून ) अं. अन् नव्हे कोण म्हणेल ? थांब हां. अं? रंगराव! अस्सं—गंगाजीरावनां आपलं नांव! फार उत्तम. रंग्या! अरे रंग्या! बाबा काय भामटेगिरी मांडली आहेस ही चोरा?

**रंग॰**—( संपलं. ) ( हंसून ) छेः काकासाहेब कांहीं नाहीं आपली उगीच जरा गम्मत केली गम्मत. मीं नां, आपल्यालाच पहायला आलों होतों इकडं.

**दाजी॰**—अस्सं काय! मग मी अनायासानंच भेटलों म्हणायचा. लेका नशीब तुझं. बरं पण कायरे, हा एवढा लांबलचक कोट अन् अनुवटीखालनं बांधलेला हा थाट कशाला ? अं.—कशाला ?

**रंग॰**—काकासाहेब, थंडीचा कडाका कोण पडला आहे. नव्हे बरं ? सु-सु-सु आहाहा! त्यांतनं मला कांहीं विशेष कामाला बाहेर पडायचं होतं. आणि परत यायला जरा उशीर लागेलसं वाटलं. ( जाऊं लागतो ).

दाजी०–( थांबवून ) अरे थांब तूं मला शोधायला निघाला होतासनां ? मग० चाललास कुठं ?

रंग०–हो काकासाहेब चाललों मी.

दाजी०–चाललास तें कळलं. पण कुठं ?

रंग०–खरंच मी कुठं बरं चाललों आहे ?

दाजी०–अरे गाढवा रंग्या! कां—?

रंग०–मी किनहीं चाललों होतों असाच चाललोंच होतों म्हणायचा. म्हणजे काय अं-अं. ली–लीलेकडं चाललों होतों. म्हटलं एकदां जावं आणि निकाल करून टाकावा. हो. लीलेकडेच चाललों होतों अन् तुम्हालाच शोधीत होतों.

दाजी०–हं–मग काय मला बरोबर चल म्हणतोस कीं काय ? चल माझ्याकडनं ना नाहीं. चल ( त्याचा हात धरून चालूं लागतो. )

रंग०–( हात ओढून घेऊन ) छे; छे; काकासाहेब नाहीं नाहीं मीं नाहीं येत. तुम्हाला भेटून म्हटलं तें–तें–अमुक करावं.–पण काकासाहेब–अहाहा–काय थंडीचा कडाका हा. तुम्हाला हुडहुडी भरली आहे वाटतं. चला चला. आधीं या थंडींतनं जा कसे !

दाजी०–थंडी, अन् कुठं आहे ! छे: आपण नाहीं जाणार. बरं पण कायरे तूं लीलेकडे जाऊन काय म्हणणार ?

रंग०–हां खरं तें सांगायाचं विसरलोंच मुळीं ! तिचा

जरासा विनोद करीन आणि तिच्याकडनं वचन घेऊन येईन. पण आपणाला उगींच थांबवून धरण्यांत अर्थ नाहीं. ही थंडी म्हणजे कोण पण ? काकासाहेब. आधीं-च आहे आपणाला संधिवाताची व्यथा. त्यावर ही गार हवा उपयोगीं नाहीं बरं !

**दाजी०**—अरे जाऊंदेरे. घाई नको. कांहीं म्हण, पण कायरे रंगराव तुम्हीं तरूण जवान कीं नाहीं—मोठे हे— तुमच्या इथं—( त्याच्या छातीला हात लावून ) या हृद-यांत एकदां कां प्रीतीची कटयार घुसली कीं—अरे पण कायरे या इथं हें काय !

**रंग०**—( स्वगत ) हो खरोखर प्रीतीचीच कटयार. ( उघड ) कांहीं नाहीं काका ! कांहीं नाहीं.

**दाजी०**—अरे हाताला लांबं लांब अन् टणक टणक लागतं आहे अन् नाहीं काय म्हणतोस !

**रंग०**—नाहीं हो. आहे असंच कांहीं तरी—लीलेला नजर घेऊन चाललों आहे कांहीं चीज.

**दाजी०**—अस्सं कां? बरं पाहूं या तर खरी काय चीज आहे ती! हो, तुझी रसिकता अरसिकता तरी कळेल. ( कोट ओढतो तरवार खालीं पडते )—दचकून—अं. हें काय. अरे ही चीज ! आणि लीलेला नजर ! म्हणजे म्हण-तोस तरी काय तूं वेड्या !—( खाकरून ) अं. हं हं,

अरे पोरा तिचं डोकं कापून तें तिचं तिलाच नजर करायचा तर विचार नाहींना तुझा ?

रंग०–( मोठ्यानं हंसून ) छे: छे: काकासाहेब भलतंच. म्हटलं जरा गंमत करावी ती गंमत झाली खरी. यांतली खरी गोष्ट सांगावी म्हटलं मग !

दाजी०–हं अस्सं काय. वहावा. काय गंमत पण. वाहवा ! काय चीज पण वाहवा !

रंग०–आतां सांगतों हं सारं ! आपण म्हटलतच कीं प्रेमाची कटयार—तीच ही. लीला कीं नाहीं मोठी तऱ्हेवाईक, मोठी चमत्कारिक आहे हें कांहीं तुम्हांला सांगायला नकोच. तेव्हां आतां माझा बेत असा आहे–काय कीं, मीं तिच्याकडे जावं तिनं क्षमा केली तर बरंच झालं. नाहींच तर एकदम ही तलवार म्यानांतनं काढायची. अन् शपत वाहून तिला म्हणायचं कीं लीले तूं क्षमा करीत नाहींस तर नको करूंस, हा पहा मीं या तलवारीवर पडून आपल्या अपराधाचं प्रायश्चित्त भोगतों.

दाजी०–तरवारीवर अन् तूं पडणार ? झालं ! तरी पण, पोरा तूं मोठा हिकमतबाज खरा. युक्ति पण युक्ति काढलीस–ऱ्या तुझ्या नाटकाला ती अगदीं भुलून गेलीच पाहिजे अं ? शाबास काय तुझी अक्कल. चल जा मूर्खा.

रंग०–बरं पहाल तुम्हींच. माझी युक्ति साधते कीं नाहीं ती. मीं म्हणेन–लीले लीले मला क्षमा कर नाहीं तर ही पहा तरवार.

**दाजी०**—मग काय झालं—ती म्हणेल रंगराव रंगराव ह्या खुपसून पोटांतन् काय ! चल नीघ—आण इकडे ती तरवार. ( हिसकून घ्यायचा प्रयत्न करितो. )

( इतक्यांत गण्या येतो व रंगराव तरवार घेऊन पळून जातो. )

**गण्या**—थांबवा थांबवा—त्यांनां, अरे खून खून—धरा—चोर चोर. अरे आग लागली ! विझवा विझवा. पाहतां काय थांबवा त्यांनां.

**दाजी०**—अरे. आग, खून ! आहे काय ?

**गण्या**—झालं ! त्यांनाबी कुणी धरीना अन् माझा-बी दम छाटना. दाजीसाब, आन् आपुनबी न्हाई त्येस्नीं धरून ठेवलं—मी म्हंतो आपुन तरी पकडून ठेवावं होतं त्येस्नी.

**दाजी०**—अरे लेका, तुला वेडबीड तर नाहीं लागलं. थांबवा कुणाला ? रंगरावाला ? अन् तें कां !

**गण्या**—होय जी त्येस्नीच रंगरावास्नीच म्हंतो—झालं तिकड खून पडल,, कापाकापी झाली—आतां काय सांगावं ? अबब्ब त्या अमराईंत काय हाणामारी काय लढाई चाललीया! खून-खून.

**दाजी०**—अरे खून कुणाचा. हाणामारी कोण करतं आहे सांगशील कीं नाहीं गाढवा नीट !

**गण्या**-आतां काय करावं ? अव हाणामारी करीत

न्हाई कोण अस इचारा ! कुणाचा खून पडत न्हाई असं इचारा ! मानाजीराव, आपल रंगराव–त्ये काई इ-चारू नका.

**दाजी०**–काय म्हणतोस? आतां आलं माझ्या ध्यानांत. हे त्या पोराचेच खेळ बरं सारे! अरे ती जागा तरी कुठं आहे सांग लवकर.

**गण्या**–राजबहाद्दरांची ती अमराई न्हवं कां !

**दाजी०**–अरे गाढवा तुला वाट माहीत आहे का तिकडची? असली तर पुढ हो. चल.

**गण्या**–मला गाढवाला काय वाट म्हाइतजी. धनीसाब घाबरूं नका, मी बगा आतां बोंबाबोंब करून सोडतों अन् गोळा करतों समद शिपाईप्याद कोतवाल आणि–

**दाजी०**–बरं चल तर तुझ्या खांद्यावर हात टेकून मी येतों चल धांवत. आणि जातां जातां गरूं लोक गोळा. (आपणाशीं) अरे पोरट्या काय खोटं बोललासरे. बरं आहे आतां असा रागावतो कीं हं. ही तुझी नज़र करायची चीज काय! बरं काढतों आतां तुझी खोड.

( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

जम्नेचा महाल.

( जम्ना एकटीच विचार करीत बसलेली प्रवेश करिते. )

**जम्ना**–अगबाई, ही बातमी ऐकून भीतीनं माझं

काळीज अगदीं कसं करपून गेलं आहे. काय बाई असा एवढा अपघात तरी कसला झाला इतक्यांत ! प्रिया, काय हें मला काळजींत पाडलंत आहे बरं ? मेलं डोळ्याचं पाणीसुद्धां खळेना.

(सर्जेराव प्रवेश करतो.)

**जम्ना**–हें काय हें ? असें घाबरल्यासारखं काय करतां तें ?

**सर्जे०**–प्रिये–तुझा हा शेवटचा निरोप घ्यावा म्हणून आज आलों आहें.

**जम्ना**–अरे देवा, तुम्हीं म्हणतां तरी काय !

**सर्जे०**–जम्ने, ह्या अभागी चांडाळानं आपलं जीवित आपण होऊन गमावलं आहे—अशी दचकूं नको. माझ्या चंचल स्वभावाचंच दुःखकारक फळ मला मिळालं आहे यापेक्षां ज्यास्त कांहीं नाहीं. तुला राग आला असं पाहून मीं निघून गेलों. तों सहज, कांहीं दुर्दैवयोगानें माझं नि एकाचं भांडण झालं. तात्पर्य सांगतों कीं, मला आतां याक्षणीं देश सोडून निघून गेलं पाहिजे. जम्ने हा दगा होण्याच्यापूर्वी जर तूं माझी झालीस असं मला कळतं तर ही हद्दपारीची शिक्षा मला इतकी जाचली नसती व मी त्याबद्दल इतका दुःखीही झालों नसतों.

**जम्ना**–(स्मित करून) आपण म्हणतां ही स्थिति जर असल्या घातुक भांडणामुळं झाली नसती तर

अशी संधि मिळाल्याबद्दल मला आनंद वाटला असता पण—नाहींगबाई—आपण सांगितलंत कीं नाहीं–त्यानं माझं मन अगदीं दुःखानं भरून गेलं आहे–( त्याला मिठी मारून ) प्रिया ही पहा मी आपली झालें. हं चला आतां उशीर कां. आपण दोघंही जाऊंया बरोबरच ! माझ्या तनमनाचा आतां दुसरा कोण बरं धनी आहे ! आतां मीं झालेंना आपल्या सुखदुःखाची वांटेकरीण! आपण कीं नाहीं माझ्या अंकावर डोकं ठेवून आपलं दुःख खुशाल विसरावं! प्रिया आपण जरी कसलंही घोर पातक केलं असलं तरी प्रीतीनं मीं आपल्या तीव्र खेदाचा विसर पाडीन—मी खरंच सांगतें प्रिया! एकमेकांच्या समागमसुखानं कीं नाहीं आपल्या दुःखाचे काटे काढून त्याला मी गुलाबाची पाकळी बनवीन—( हंसून ) पहावं तर खरं!

**सर्जे०**–प्रिये, अहाहा हे तुझे उपकार मी कसे फेडूं ग ! मी खरोखर दिवाळखोरच बनलों आहें. पहा या दरिद्री प्राण्याजवळ प्रेमाखेरीज इतर कांहींही तुला द्यायला नाहीं व याला गळ्यांत घेऊन तूं आपलें सुदैवाचे पंख तोडतीस ह्याचा स्वस्थपणानं जरासा विचार करशील काय ?

**जम्ना**–हें काय. मला आतां एक क्षणभरही उशीर सोसायचा नाहीं गडे ! मी इकडे जी प्रीति करतें ती इकडच्या जिवाकरतांचना ? मग ? आपण एकमेकांला

प्रेमवचनं देऊन टाकलीं आहेत तीं खरीं करण्याची. ही उत्तम संधि आली आहे. व तीं वचनं कीं नाहीं या वेळीं मला प्राणाहून अधिक मोलाचीं झालीं आहेत.—पण आतां कां बरं वेळ दवडणं होतंय? खरंच बाई मला भय वाटतं, आपण जर विलंब केला तर कदाचित्-( त्याला कवटाळते. )

**सर्जे०**—प्रिये घाईचें कारण नाहीं. संध्याकाळ होऊन अंधार पडेपर्यंत मीं बाहेर न पडावं हें चांगलं. पण प्रिये—तुझ्या या गोड आनंदी हृदयावर या इतक्या दुःखाचं दडपण पडून त्याची काय बरं वाट होईल! ( तिला कवटाळतो. )

**जम्ना**—हें काय. इतकी तीं कसलीं दुःख म्हणतें! आपल्या हातून जो काय गुन्हा घडला असेल त्यानं आपली मालमत्ता जप्त होईल एवढंचना! जाऊंद्या कीं मेलं. द्रव्यानं काय मला दुःखी करायचं आहे! ( हंसून ) आणि म्हणते या प्रेमाच्या वनवासांत श्रीमंतीचा दुधभात मला नकोन् तो गोडही पण लागायचा नाहीं मला!

**सर्जे०**—( तिला आलिंगून ) अहाहा! तुझी मी पुरी परीक्षा पाहिली. बस हा लपंडाव पुरे झाला. प्रिये माझ्या सर्व शंका उन्हानं धुकं वितळावं तशा वितळून गेल्या.—प्रिये—माझ्या तऱ्हेवाईक संशयी स्वभावाला अनुरूप असें हें जें कपट नाटक मीं केलं त्याची मला क्षमा कर. पण हें मीं कोणच्या तोंडानं म्हणूं!

**जम्ना**–(आश्चर्य चकित होऊन) एकूण तर मग आपण सांगितलेला दुर्दैवघाताचा प्रकार सर्व खोटाच म्हणतां?

**सर्जे०**–होय प्रिये. तें सर्व बनावट होतं अन् तुझी परीक्षा पहायला रचलं होतं. हें सांगायला खरोखरं मला लाज वाटत आहे. असो. पण प्रिये, आतां हें असलं कपट नाटक पुन्हां करण्याचं कारणच पडणार नाहीं. तेव्हां म्हणतों अपराधाची क्षमा कर. व कोप करून मला मारूं नकोस. उद्यां परमेश्वरासमक्ष तुला मी आपली पट्टराणी, माझी धनीण, माझी यजमानीण करून टाकतों अन् मग पहा तर खरं मागच्या सर्व पापाबद्दल प्रायश्चित्त घेऊन आजन्मपर्यंत या माझ्या प्रणयदेवतेचें भक्तिपुरःसर भजनपूजन करण्याचं व्रत घेतों. पण प्रिये, (तिला कवटाळायाला पुढें होऊन) मला क्षमा केली असं म्हणून आपल्या या सुंदर ओंठांनीं त्यावर मोहरबंदी करून टाक पाहूं!–

**जम्ना**–(रागावून—झिडकारून) आपण माझ्या अंगाला हात लावूं नये सांगून ठेवतें. आपण मला वाटलं होतां त्या भयंकर गुन्ह्यांपासून खरोखर मुक्त झालां हें पाहून मला आनंद झाला व देवानं ही कृपा केली म्हणून मला प्रेमाचं रडं येतं आहे खरं. पण–आपण संशयानं वेडावून जाऊन इतके निष्ठुर बनला आणि माझं काळीज उमळून पडेपर्यंत आपल्याला वि-

नोंद करवला, हें पाहून मात्र मला जें काय दुःख झालं आहे तें कांहीं माझ्यानं सांगवत देखील नाहीं.

( रडूं लागते. )

**सर्जे०**—पण प्रिये देवाशपथ—

**जम्ना**—ऐकाहो. दुसऱ्या तिसऱ्याच्या हातून कधीं सोसून न घेई असले अपमान तुमच्या हातून आजवर सोसून घेतले. असो. आपण माझ्या भाविक व प्रेमळ मनाला कसं कसं खेळविलंत व त्याची कुचेष्टा केलीत तें मी आतां सांगत बसत नाहीं. पण—

**सर्जे०**—प्रिये, सर्व मला कबूल आहे. माझं ऐकून तर घे !

**जम्ना**—पण आतां मला अगदीं पुरतं कळून आलं कीं, आपणाला प्रेमांत कधीं समाधान व्हायचं नाहीं अन् आपण नेहमीं संशयखोरच राहणार. तेव्हां आतां ज्यास्त काय बोलूं ? आपलं वचन मी कधींही पाळणार नाहीं. मला वाटलं होतं कीं, आपला परस्पर समागम झाला म्हणजे आपला स्वभाव सुधारेल. पण आतां पाहतें तों, माझ्यासारखी सरळ मनाची मिळूनही तुमचा स्वभाव कांहीं पालटत नाहीं. उलट स्वभाव अधिकाधिक तऱ्हेवाईक व संशयी बनत जाऊन आपण माझी विटंबना करायला मात्र जसें कांहीं हात धुवून तयार !

**सर्जे०**—पण प्रिये—जम्ने, झालं तें झालं. आतां यापुढं तर पाहशील.—

**जम्ना**—ऐका—मी आपली प्रीति आपणाला एकवार अर्पण करून चुकलें आहे. ती मात्र मीं दुसऱ्या कुणाला वाहणार नाहीं. अगदीं भाविकपणानं देवाजवळ तुम्हाला सुखी ठेवावं म्हणून प्रार्थना करून म्हणेन कीं देवा केवळ यांच्या संशयी स्वभावामुळं आमचीं वचनं जागच्या जागींच राहिलीं. तेव्हां यांचा तो स्वभाव कसा तरी काढून टाक म्हणजे ते सुखी होतील. आतां आपल्याबरोबर दारिद्र्याचें दुःख भोगून जन्माची सहचारिणी होऊन जी यायला तयार झाली होती तिची प्रीति तुम्ही गमावलीत खरी. पण त्याचं कांहीं वाईट वाटूं देऊं नका—मीं जातें बरं ( जाते. )

**सर्जे०**—गेली. गेली. शेवटीं गेली. आणि अखेरचीच गेली. तिच्या त्या एकंदर वर्तनांत जो एक प्रकारचा भयंकर निश्चय दिसत होता त्याच्या योगानं मीं जागच्या-जागींच खिळून गेलों होतों. नीचा मूर्खा, पशो—सर्जेरावा आतां मीं तुला शिव्या किती म्हणून देऊं ! काय करावं. सुदैवानं माझे स्वभावदोष नाहींसे व्हावे म्हणूनच कीं काय, अशी ही दिव्य सद्गुणी अप्सरा माझ्या मदतीला आली. आणि मीं एकाद्या झोटिंगाप्रमाणें तिला भेवडावून व झिटकारून टाकून दिली.—असो. आतां काय सर्व संपलं.

चला ठरल्याप्रमाणं रंगरावाबरोबर लढाई करायला राजे-बहाद्दरांच्या अंबराईंत जावं हेंच बरं. तिथ जो उदास-वाणा प्रकार घडणार आहे त्याचा सूर माझ्या हृदयांत आधींच लागला आहे. आतां माझी इच्छा इतकीच उरली आहे कीं त्या हाणामारींत मला शिरतां येऊन, इतका वेळ जी गोष्ट खोटीच म्हणून सांगितली ती खरीच ठरावी ह्मणजे झालं. हाय हाय ही प्रीति म्हणजे यातना उत्प-न्न करणारी दुष्ट चेटकीण आहे असं वाटतं! (जातो.)

---

## प्रवेश ३ रा.

( जम्ना, लीला माणकुबाई छब्या व गण्या प्र० )

**माणकु०**—अगबाई. यांनीं इकडे हें काय अवधूत कर्म मांडलं आहे! छेः छेः आतां काय काय प्रघात होतील ते एक दिव्य जाणें. बरं दाजीसाहेबांना मगाचपासून संशुद्ध करितें आहे पण तेही वेळेवर सांपडेनात. ते असते तर त्यांनीं तरी हें थांबविलं असतं.

**जम्ना**—अगबाई, काकू काय म्हणतां काय तुम्हीं—झालं तरी काय?

**माणकु०**—तें काय तें ते गृहस्थ कपिथ्थतील. त्यां-नींच झालं तरी हें सर्व मला अवगुंठित केलं.

**लीला**—सांग बाबा. काय झालं तरी काय?

**छब्या**—( सावकास ) बाईसाब! आपल्यासारख्या

लई मोठ्या शिरमंत धनीनसाबानीं माझ्यासारख्याला काई-बी इचारावं अन् मीं त्यें सांगू नये असा काय मीं बाजीराव लागून ग्येलों हाय.--का चंदरराव मोऱ्या--का भागानगरचा तिस्मारखान ? अन त्येंतन असं, मीं काय मानुस की बिनुसकी सोडलीया कां काय?

**लीला**--होय पण बाबा काय तें लवकर सांग. कृपा करून !

**छब्या**--छे--छेः-- बाईसाब असं किरपा बिरपा काई बी बोलूं नगासा--आपनास्नी मीं संमद सांगतु बगा. अन् त्येतूनं आपल्याला लइ काळजी हाय त्येची तवां मीं एक खिन् बी न्हाइ उशीर लावनार. मला ठाव हाय त्यें समुद सांगन आपनाला.

**जन्मा**--पण बाबा जलदी कररे. लवकर सांग काय तें--

**छब्या**--हं अशी खरं बगा आपुन बोललात्ये. असल्या द्वाड बातम्या हइतकीं न्हाइं त्या मानसाला अगदीं तवाच सांगून टाकाव्या. त्याचीं कारनबी लइ हायती. त्येंतलं पहिलं म्हंजी अस बगा इकड ती बातमी सांगाया जर उशीर लागला अन् तकड इकत्यामंदि दोतीन खून पडल तर म्हंतो मग त्या बातमी सांगन्याचा काय उपयोग ! कां बाईसाब खरं हाय का न्हाइ, मीं बोललों त्यें अन् दुसरं असं.--

**लीला**–जळलंरे मेल्या तुझं पांडित्य. काकू मीं तु-मच्या पायां पडत्यें तुम्हींच सांगा काय तें. माझ्यानं नाहीं आतां अधिक धीर धरवत. काय झालं काय?

**माणकु॰**–अग पोरिके खून विघडून येताहेत तिकडे. कात्तल्य चाललं आहे. मुरदाडे पडताहेत तिकडे आण-खी काय! त्यांतल्या शुद्र गोष्टी ज्या आहेत त्या हेच गृहस्थ सांगतील!

**लीला**–बाबा, आम्हीं तुझ्या पाया पडूं कां? सांग लवकर काय आहे तें थोडक्यांत.

**छब्या**–बाईसाहेब, त्ये तकड होत्यांत त्ये खून का काय ह्ये मीं कसं ठरवूं? कां मीं अन्यायाधीक्ष हाय कां काय त्ये ठरवाया? का असंच कीं न्हाई माणकुबाई?

**जम्ना**–पण हे भांडताहेत ते कोण एवढं तरी सांग चटकन.

**छब्या**-हं. त्ये मातर चटकन् सांगनार. त्येंतला एकजन जो हाय त्यो अक्षी लइ उमदा तरना ज्वान हाय बगा. त्येचीन् माझी लइ दोस्ती हाय. इचिभन त्ये-ला का जर काइ झालं बिल तर माझ परान न्हाई न्हानार बगा—( मोठ्यानं रडतो )

**जम्ना**–अरे पण तो कोण–कोण तो?

**छब्या**–( रडत ) माझ धनीसाब वर त्ये माज धनीसाब, काय व दवाड करम क्येलत गुलाबराव? ( डोळे पुसूं लागतो )

**लीला**–काय गुलाबराव ? अगबाई !

**छब्या**–व्हय व्हय–गुलाबराव–अं–न्हाई रंगराव–न्हाई–गुलाबराव–कोन इच्याभन कायकीं !

**जम्ना**–बरं. आणखी कोण आहेत त्यांच्या बरोबर ?

**छब्या**–आनखी व्हय, बाईसाब त्ये सारं या गिरस्ताला विचारा.

**जम्ना**–गणोबा बोल बाबा. आम्हीं कीं नाहीं तुम्हांला हात जोडतों लवकर बोला.

**गण्या**—हकडं बगा बाईसाब लइ भयंकर हाय. कांहीं तरी घात पात हाय बगा. कारन् म्हणतो बंदुका न् तरवारीन् भाल न् बरच्या न् कटयारी न् संगिनी न् सुऱ्या घेऊन जे लोक एक जागा जमल्यात त्ये काइ उगाच गंमत कराया तर न्हाई जमत ? त्येच्यांत काइ तरी भयंकर हाय बगा गळयाच्यान्.

**जन्मा**—( रडव्या स्वरानें ) बाबा सांगरे लवकर चंडाळा कोण कोण आहेत ते ?

**गण्या**—आमच बावळट खुळ भागुबाई अहं भागुजीराव तथ हाईत मग कशाला लढाया का रडाया कुना ल्येकाला ठाव ? अन् दुसर म्हनाल तर त्ये सर्जेराव.

**जन्मा**—चला काकू चलाच. आपण आत्ता जाऊन भांडण विझतं कां पांहू या.

**लीला**—चला काकू चला जाऊं याच.

**माण०**—छे: ग बयानों आपण कौमारिका आपणास अपमान शोभणार नाहीं. या असल्या लढाइतांत आपण असुस्थ बसून गोष्टी विलोकन कराव्या.

**लीला**—चलाहो काकू नाहीं म्हणूं नका. हें पहा कांहीं तरी गैरसमजावरन् हीं भांडणं माजून फुकट बळी पडणार आहेत. आपण गेलों तर वांचतील कदाचित्. अरे दोघच कां आहेत कीं आणखी कोणी ?

**छब्या**—मानाजीराव हाय ती.

**माण०**—( किंचाळून ) अगबाई माझ्या मानाजीरावांना यांत मेल्यांनीं ओढले आहे. चलाग बायानों अग तुमच्यानं इथं उभं तरी कसं राहवतं ? कायग तरी तुम्हीं निर्दय ?

**लीला**—बरं पुढं आतां काय करूं या बरं आपण ?

**माण०**—अग काय म्हणजे काय विचारतां ? पळा. अन् दुसरं काय. खेचराप्रमाणें उडून जाऊंया ! बाबा, तुला ती स्थाळी माहीत आहे कां ?

**छब्या**—हो जी बाईसाब. त्ये माझं काम. चला चला माझ्या मागनं ! गन्या ल्येका जा धांव धांव अन दाजीसावांसनी हुडकून घेऊनशेनी ये जा, मार सूं.

( गण्या जातो. )

**माण०**—चला पोरिकांनो चला. हे गृहस्थ आह्मा-

ला मार्ग दाखवितील. छब्याजी बोवा. कस काय ? तुम्ही उग्रभागीं चला आम्हीं पाश्चिमात्य येतों. पण काय हो तुह्मांला ती जागा सांपडेल ना ?

**छब्या**—हो इचिभन न्हाइ सांपडून काय करती-या ? अन् त्यांतून एक गम्मत हाय; म्हंजी बगा—बंदुकीचे आवाज निघतील न्हाइ काय, त्येच्या धोरनान जाऊं म्हंजी झालं. मग न्हाई सांपडून काय करत्यांत? काइ नका भिऊं बाईसाब तुम्हीं चला. ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

( भागूजीराव व मानाजी प्रवेश करितात. )

**भागू०**—कसं म्हंता मानाजीराव? शंभर हातावर--न्हाइल म्हंजी चांगलं न्हाई लढाईला ? अन् मग येऊंदे कीं देईन उडवून कड--कडाड--रूस. व्हय व्हय, मानाजीराव लांब उभ न्हायल म्हंजी न्येमबी नामी लागतु न्हाई ?

**माना०**—अरे. वेडा तर नाहींस ? शंभर अन् पन्नास हात हें अंतर कशाला तुम्ही पल्लेदार जेजालान् तोफा तर नाहीं उडविणार ? तीनचार हात झाले म्हंजे बस झालं. छे: त्यांतलं तुम्हाला कांहींएक कळत नाहीं. तें सारं आपलं माझ्याकडं सोपवून स्वस्थ बसा कसे ! हं तुम्हीं आतां असे उभे रहा हां, मीं तुम्हांला दाखवितों. ( त्याला उभा करून तीन पावलें मोजतो ) हं बस; इतकें अंतर म्हणजे शिकस्त झाली.

**भागू०**–( एकीकडे ) अग बया. अन् इकत्या जवळ कसं चुकवावं बा? म्हंजी गोळी चुकली तर दस्ता बी ह्मणून डोकसं फोडील की तो ! ( उघड ) अव मानाजीराव ! अस बिळांत कोंडून त्याला कशापाई मारावं म्हंतो ? अव हा जवान मरद त्येला पटांगणांत ख्येळवि-णार बगा–( त्याचा हात धरून जरा काकुळतीनें ) तो जर लांब उभा ऱ्हायला तर सवस्त मन करून न्येम धरीन. त्यो जवळ उभा ऱ्हायला अन् भागूजीराव कुरधानं उतावळा झाला तर जरा–? हं ( डोळे मिचकावतो )

**माना०**–वः वः—काय शूर पण—तो दिसेनासा लांब असला म्हणजे मग तर तुम्हांला बिनचूक नेम धरतां येईल असंचना ? अहाहा काय भागूबाई !

**भागू०**–बरं तर जाऊं द्या मला कुरध आलाच पा-हिजे. अन् त्येकाचा मरना कां मेला तर. बरं मानाजीराव ४०।५० हात लांब ऱ्हायलं तर कसकाय म्हंता ?

**माना०**–छेः तें कांहीं चालायचं नाहीं. तुमच्या बंदुकांच्या नळ्याच्या तोंडांत एकमेकापासून दोन फारच झालं तर तीन हात अंतर असलं ह्मणजे शिकस्त झाली.

**भागू०**–( तोंड वाईट करून ) छेः मानाजीराव त्येला इकता जवळ ठेऊन मारायचा म्हंजी काइ चांगली गोष्ट ऱ्हाइ बगा. अव इकता जवळचा मानूस कुनी बी मारील. मग या भागूजीरावाच्या तिरंदाजीची काय खुबी उरली ? म्हनून म्हंतो की लांबन पाडावा बगा

त्याला धाडकड कडाड फूस्—करन. ( मानाजीच्या दाढीला हात लावून ) मानाजीराव, तुम्हीं दोस्त असाल तर येवढं करूं द्याच.

**माना०**—बरं बरं तें आम्ही पाहून घेऊं. पण मला सांगा आधीं कीं या लढाईंत जर कां तुमचं बरं वाईट झालं—हो लढाईच आहे—काळ आहे, वेळ आहे, प्रसंग आहे. तर मग पुढें काय करायचं? तुम्ही मृत्युपत्र वगैरे कांहीं करून ठेवलं आहेत कां? तुमची कांहीं इच्छाबिच्छा मागं उरणार असली तर ती पुरी करायचं मी आपला पतकरतों कसा. हो. स्नेह्यांनीं जर असल्या कामांत मदत केली नाहीं तर तो स्नेह काय हांतरायचा कां पांघरायचा? कां मी म्हणतों तें खरं आहे कीं नाहीं?

**भागू०**—वः दोस्त असावा तर असा असावा. पन कायव तुमी म्हनाला त्याचा अर्थ न्हाइ उमगला मला नीटसा?

**माना०**—अहो अर्थ काय उघड आहे. हें पहा. गोळी लागली म्हंजे मग त्यांतून मनुष्य वांचतोच असं नाहीं. समजा अगदीं वर्मीं गोळी लागली अन् राम म्हणायची पाळी आली तर मग निर्वाणीच्या वेळीं तुम्हांला आपल्या कुटुंबाची, पैशाची किंवा कशाची निरवानिरव करायला सांपडायची नाहीं म्हणून म्हणतो—कां मी बोलतों तें खरं आहे कीं नाहीं?

**भागू०**-( जरा घाबरून ) काय गोळी लागून राम म्हणायचा !

**माना०**-हो तसं झालं म्हंजे मग काय करायचं ! तुम्हांला पेंढा भरून तुमच्या गांवीं पाठवून द्यायचं कां आपले या इथल्या मसणवाटींतच निजाल? इथली मसणवटी तर फार रम्य आहे. आसपास दाट आमराई, बाजूला स्वच्छ पाण्याचा ओढा. अन् रात्रंदिवस जमि-नींत गाढलेल्या भुतांची सोबत. हो पण. तुमच्या इच्छेस येईल तसं. या बाबदींत मी नाहीं आग्रह करणार.

**भागू०**-( अधिक घाबरून ) काय माझ्या अंगांत पेंढा भरायचा, मसणवटींत निजायचं ? मानाजीराव असं द्वाडवाणी बोलूं नका बगा—मीं तुमच्या पायां पडतों.

**माना०**—भागूजीराव, लढाई करण्याचा हा आपला पहिलाच प्रसंग आहे वाटतं ?

**भागू०**—हो, मी या परसंगाला जींवंत हाये त्येच्या वरनच बगा कीं.

**माना०**—अहो—भागूजीराव तुम्हांला सांगतों, मनु-ष्यानं कीं, सर्व गोष्टींची संवय करून ठेवलेली असावी. बरं पण आतां पाहूं या. अं ? गुलाबराव तुमच्यावर बं-दूक रोखील अन् झाडील तेव्हां तुम्हीं उभे वगैरे कसे काय रहाल ?

**भागू०**—अं त्येच्यांत काय त्येचा मीं लइ सराव के·

लाय.—मानाजीराव—बगा अस्सा राहीन—( नेमळ्या सारखा व एक बगल पुढें करून उभा राहतो ) अक अंग चोरायची इद्या मला लइ चांगली येती बगा.

**माना०**—छे: छे: तुम्हीं अगदींच बाजूला गेलां— हें पहा असा जर मीं नेम धरला अन् बंदूक रोखली— ( बंदूक रोखतो )

**भागू०**—( भिऊन ओरडतो ) मानाजीराव मा—माना-जीराव हं हं, अव बगा त्यो बंदुकीचा घोडा पडलायसा बगा बगा बगा अगुदर.

**माना०**—नाहीं हो—असे भितां काय ? अहो ती काय भरलीबिरली आहे कीं काय ?

**भागू०**—अव तुम्हांला म्हाइत न्हाई त्याचा काय न्येम सांगावा ? उगच उडायबिडायचीं आंत कांहीं नसलं तरी !

**माना०**—बरं पण कायहो, ते उशीर करून आम्हांला निराश तर नाहींना करणार ?

**भागू०**—अन् मग आमचा इक्ता राग फुकटच जा-णार म्हणतात का काय ?

**माना०**—छे: छे: नाहीं. तरी म्हटलं असं होईल कसं? हो. ते आलेच वाटतं! ते पहा दुरून दिसताहेत ते !

**भागू०**—( घाबरून ) का—क—काय—अ-आले ते ? उइ !

**माना०**—हा—तेच ते—पलीकडचे कुंपण उडून आले ते !

**भागू॰**—( हळू हळू एक एक पाऊल मागं सरत ) आले. अं. ये. येऊदंत त्यांना. आपण न्हाइ पळून जानार-न्हाइच पळून जानार !

**माना॰**—काय पळून जाणार ?

**भागू॰**—छेः छेः आपण न्हाइवा पळून जानार ( मागें पाऊल पाऊल सरकतो )

**माना॰**—पण हें काय करतां आहांत—कांहो तुम्हांला झालं तरी काय कां भूतबीत बडवलं कीं काय त्या मसणवटींतल ? हे असे थरथर कांपतां काय म्हणून?

**भागू॰**—छेः छेः कांहीं नाहीं. कांहीं नाहीं. पन् काइ म्हना मानाजीराव आपली तबेत जरा नादुरुस्त हाय बगा. जरा मन कचरतय बगा. का काय कीं.

**माना॰**—अरे गृहस्था, तुझा मान चालला याचा विचार कर.

**भागू॰**—हं ! अलबत. आपला मान गमावल का काय हा भागूजीराव ! हं मानाजीराव असाच मधून मधून माझ्या मानाचा येकादा दुसरा शब्द बोला बगा.

**माना॰**—हं ठीक आहे, पण ते पहा आलेच.

**भागू॰**—आले ? पन् कायव, हा शूरपना लई ठकवा हाय बगा. त्यो कवाच येतो अन् कवाच जातो त्ये माज मलाच ठाऊक पडत न्हाई बगा.

**माना॰**—हंः मग येतो तेव्हां घट्ट दाबून धरावा कीं नाहीं ? आतां धरा हं सोडूं नका ?

**भागू०**–धरला–ग्येला, बगा ग्येला. पळाला जणू. हातातून का कुठनं पाझरून जातूया जणू.

**माना०**–अहो. तुमच्या अंगाला दरदरून घाम फुटला आहे वाटतं? अरे गृहस्था तुझ्या मानापमानाची नाहीं कां कांहीं तुला शरम! हं. हे आलेच आतां मात्र.

**भागू०**–(आपल्याशीं) अग बया बया बया. (रडक्या स्वरानें) उगाच सुखानं दाराला कडी कुलूप लावून बसायच सोडून काय अवदसा आठवली मलाही!

( सर्जेराव व रंगराव येतात. )

**भागू०**–( रंगरावास पाहून आनंदानें ) अं रंगराव, मित्रा रंगराव!

**माना०**–ह भागूजीराव! आपल्या वैऱ्याला झाली तरी सलामी द्यावी हें योग्यच आहे. ( सर्जेरावाला उद्देशून ) कसं काय गुलाबराव आपण आपलीं हत्यारं घ्या कायती हातांत कीं मी अन् रंगराव आपलं अंतर मोजून घेतों किती तें!

**सर्जे०**–माझीं हत्यारं घेऊं?

**माना०**–हो हो. भागूजीरावाबरोबर तुम्हीं लढणार ना?

**भागू०**–( आनंदानें ) वः वः मानाजीराव वहावाहे, माझ्या या दोस्ताबरोबर लढूं म्हणतासा कायव? अव हा तर सर्जेराव. अन हित दुसरं तिसरं तर कुनीबी दिसत न्हाई कीं.

**माना०**–( सर्जेरावास ) कायहो गुलाबराव, भागूजीरावाबरोबर लढायलानां तुम्हीं इथं आलां?

**सर्जे०**–छेः नाहींबा. मी तर सर्जेराव, अन् तुम्ही गुलाबराव कुणाला म्हणता?

**माना०**–( त्रासून ) छेः आग लागोरे या घोटाळ्याला! आतां राग न यावा तर काय व्हावं? बरं असो. सर्जेराव. आम्ही म्हणजे मी भागूजीराव अन रंगराव तिघे असामी आलों आहों लढाईचा खेळ खेळायला. मीन रंगराव जोडी झालों. राहतां भागूजीराव उरतो आहे तेव्हां अशा वेळीं तुम्हीं आपलं आंग बाहेर काढणं कांहीं बरोबर होणार नाहीं.

**रंग०**–बरं बोवा सर्जेराव, तुझं तरी काय जातं? त्या गृहस्थाची मौज तूं कशाला कमी करतोस उगीच?

**सर्जे०**–मी भितों असं नव्हे. भागूजीरावाची इच्छाच असेल तर हा पहा आहें मी तयार ( तरवार उपसून उभा राहतो )

**भागू०**–छेः छेः छेः अंहं अंहं–सर्जेराव, नको नको माझ्या करितां नको तरवार उपसायला. अहो, माझी गरीबाची कसली मौज न काय? ( त्याचा हात धरतो ) मानाजीराव हे बगा मला लढायच काइबी कारन न्हाई. अन तुम्हीं बी बगा आपला इचार- अव उगच कशाला शीर गमावता म्हंनतो?

**माना०**–( रागानें ) हे पहा भागूजीराव, माझ्याशीं

असेला चावटपणा नाहीं चालायचा. तुम्ही आतां जे या ठिकाणीं आलां आहांत ते कुणाबरोबर तरी लढायला आलां आहां खास! अन तुम्हीं कुणा एकाला लढाईला हटकलं होतं खरं! आतां तुमचा तो हटकलेला माणूस आला नाहीं, पण हे गृहस्थ--सर्जेराव जर त्यांचे जागीं उभा रहायला तयार आहेत तर तुम्हीं माघार कां घ्यावी, कळत नाहीं!

**भागू०**—अव पन मानाजीराव, मीं हटकला हाय त्यो सर्जेराव न्हव, त्यो गुलबराव. त्यो कुठं बसला हाय मुरका मारून कुना ल्येकाला ठाव? अर त्येला म्हनाव येकीं असा पुड म्हंजी देतो उडवून धाड कडकडाड फूस!

**रंगराव**—अस्सं अस्सं—भागूजीराव तुझी कीं नाहीं या कामांत थोडीशी चूक झालेली दिसते आहे ती मी नीट करतो. अरे. गुलबराव म्हणून खरोखर निराळा माणूस कुणीं नाहीं. त्याचं नांव ज्यानं कांहीं कारणाकरितां धारण केलं होतं तो किनही गृहस्थ कोण म्हणशील तर हा इथं आहे (आपल्या छातीला हात लावून) तुझी इच्छा असली तर गुलबराव या नात्यानं तुझ्याशीं दोन हात करायला तयार आहें. आहे इच्छा?

(तरवार उपसतो.)

**भागू०**—(एकीकडे तोंडावर हात मारून) हें तर लचांड झालं कीं! आतां काय करावं बुवा!

**माना०**—(आनंदानं टाळी वाजवून) हा हा आतां

मात्र जुळलं खरं, दैवयोगानं जुळलं पुन्हां—हं भागूजीराव हं. मिळाला तुझा तुला गुलबराव. चल आटप आतां का उशीर ?

**भागू०**—( हंसण्यावारी घालवून ) हः हः हः काय मानाजीराव ? काय म्हंता माझ्या दोस्तासंगट लढूं ? न्हाईर बा इच्चिभन आपल्या बाच्याबी हातनं व्हायाचं ! माझा रंगराव लंगोटीयार अन् त्याच्या संग भांडूं म्हनता मानाजीराव ? बरं पन मानाजीराव तुमचा रंगराव तुम्हाला मिळालाना ? तुम्हीं घ्या अगुदर लढून रंगरावाबरोबर मग मी लढतों गुलाबरावाबरोबर. (रंगरावास आलिंगन देतो) न्हाईर बा असल पिरथी बिगर ह्राड काम आपल्या हातनं व्हायचं. मग ह्यो एक न्हव हजार गुलबरावबी कां असना ! !

**माना०**—भागूजीराव—हंः आपल्या शौर्याचान् धैर्याचा झरा आटला वाटतं पार. आतां डोळ्यांतला झरा तरी पान्हवूं दे जरा !

**भागू०**—अव जा ! तस काय म्हून व्हईल का मीं भागूबाई बिगूबाई हाइ कां काय ? मानाजीराव तुम्हीं लढाया लागा. म्हंजी तुम्हास्नी मदत करतु कां न्हाइ बगा ! अन् बघा जर का तुम्हाला येकादी गोळी लागली अन् तुम्ही राम म्हनायचा वकुत आला तर तुमच्या मनांत काय इच्छाबिच्छा न्हाइली असल कीं न्हाई ती सांगा या भागूजीरावाला पार पाडाया. मग बोला, तुमच्या अंगांत काय पेंढा भरून पाठवून द्यायचं कां या इथल्या

मसणवटींत निजाया तुम्हांला गोड वाटल. व्हय खरंच इथली मसणवटी लई रम्य हाय. आंबराई काय दाट अन् स्वच्छ पाण्याचा वढा व्हातोय. मसणवटीची ढेकळं खावी, वढ्याचं पानी प्यावं अन् रातंदिस भुईंत गाडले-ल्या भुतांबरोबर कानगोष्टी करीत खुशाल निजावं. तु-म्हांला वाटल तसं सांगा. माझा कांहीं या कामांत आग्रव न्हाई तुमास्नी.

**माना०**—(रागावून) अरे जा. भित्रा भागूबाई दळ्या कुठला ! लेका हातांत बांगडया भर.

**भागू०**—(रागाचा आविर्भाव करून) बगा बरं बगा दोस्तानो ह्यो मला काय म्हंतो त्यो.

**माना०**—(त्वेषानें तरवार उपसून) तर काय, भी-तो का काय तुला ? दळ्या, भागूबाई कुटचा.

**भागू०**—(मऊ पडून) (स्वगत) अर इच्या भन, ह्यो तर अक्षी नाकावर माशी बी बसूं देईना कीं ? जे जे करावे त्ये इचिभन आंगशींच येऊं करतयां ! (उघड) छेः छेः मानाजीराव रागावता कशापाई ? मी कुठं रागावतोय दळ्या म्हटलं म्हून ? तुम्हीं दळ्यान भागूबाई थट्टेनं गमतीखातर म्हणता, त्ये जस काय ठाव न्हाइ मला व्हय ! मातर तुम्हीं याच्याही म्होर काइ म्हटलं असतंत ! तर—

**माना०**– (सरसावून) तर तर काय, काय केलं असतंस.

**भागू०**–(घाबरून) केलं असतं म्हंजी कायव–कांहीं नाहीं. हे पहा मानाजीराव–

**मानाजी०**–चल नीघ मूर्खा. तूं कवडीच्या किंमती-चासुद्धां नाहींस.

**रंगराव**–बरं असो. मानाजीराव, भागोजीराव तुमचं सहाय चांगलं करील याचं कारण माहीत आहे कां? तो, रडवय्या—नाहीं लढवय्या भागूजीराव आहे. लोक त्याला खवीस कुतरा म्हणतात. अन् एक जवान मा-रल्याशिवाय त्याचा एक दिवसही जात नाहीं. कां असंचनां भागूजीराव.

**भागू०**–अर चूप बाबा ते सारं घरच्या घरीं. त्याचं इथं काय ?

**मानाजी०**—असो. बरं रंगराव—आपल्या कामाकडे आपल्याला आतां पाह्यलं पाहिजे. ( तरवारीकडे पाहून ). चल निघ म्यानांतनं ( तरवार उपसतो ) आणि विचार या गृहस्थाला–म्हणावं लीला मुकाटयानं सोडावयाची आहे कां पिऊं काळजांतलं रक्त !

**रंगराव०**—चल ये. हा पहा मी तयार आहें. ( तर-वार उपसतो ) एकूण तुम्हाला तडजोड माहीतच नाहीं तर. ठीक आहे, हे घ्या आपल्या प्रश्नाचं उत्तर.

( दाजीसाहेब गण्या माणकूबाई लीला व जम्ना प्र०)

**गण्या०**—दाजीसाब, अव धरा धरा मारा त्येस्नी. आमच्यो धनीसाबासनी तर अगुदर आवरा त्येंच्या दोन हाताच चार हात करून टाका बगा.

**दाजी**०—रंग्या, ए रंगराव! आटप हात, हात आटप नाहीं तर माझा राग अनावर होऊन भडकेल बघ—गाढवा, कायरे ही लढाई कशी उपस्थित झाली? अन् तूं त्यांत कसा सांपडलास? बोल लौकर बोलतोस कीं नाहीं?

**रंग**०—काकासाहेब खरंच जर पुसाल तर कीं नाहीं ते गृहस्थ सगळं सांगतील आपल्याला काय तें! कारण मी राणी सरकारच्या लष्करांतला सरदार. मी त्यांच्या वाटेस जाण्याचा संभव तरी?

**दाजी**०—वाहवारे राणीसरकारच्या लष्करांतल्या माझ्या सरदार गड्या. राणीसरकारची सरदारी-अशीच करायची वाटतं दुसऱ्याचे गळे कापून? अरे राणीसरकारची तरवार तिच्याच प्रजेवर चालवावयाची?

**रंग**०—पण काकासाहेब त्यांणींच मला इरईला घातलं. मी काय करूं हो! अन् कारण सांगा म्हटलं तर सांगेनात! विचारा हवंतर त्यांचं त्यांनांच!

**दाजी**०—कायहो हा माझा पुतण्या म्हणतो कीं, तुम्हीच घातलंत त्याला इरईला अन् कारण विचारलं तर सांगत नाहीं म्हणाला—होयना? हें कां, असं कां?

**माना**०—अहो मला सोसेनासा तुमच्या पुतण्यानं माझा अपमान केला. विचारा हवंतर त्याचं त्यालाच.

**दाजी**०—हं अस्सं? कायरे-रंगराव त्यांना सोसेनासा त्यांचा तूं अपमान केलास म्हणे? अं: ? काय?

रंग०—मी अन् काय ? आणि कधीं ?

माना०—काय अन् कधीं ? माझ्या प्रीतीची पोरगी उपटायची उपटून पुन्हां काय काय ? वाहवा हो राजश्री !

दा०—अहो पोरगी कोणती ?

माना०—कोणती ह्मणजे ही तरूण माणकी. ( लीलेकडे बोट दाखवितो ).

रंग०— ( हंसून ) अस्सं अस्सं काकासाहेब आतां समजलों; लीलेच्या सहीनं पत्र लिहून कुणी तरी यांना फसविलं आहे. मला माहीत आहे. पण 'माणकुबाई' मीं नाहीं हो बोलायचा !

दा०- ( हंसून ) अस्सं, अस्सं, अहो मानाजीराव तुम्हांला फसविलं हो फसविलं कुणी तरी. अहो, माझ्या रंगरावाची लीला तुम्हांला कशाला पत्र लिहील ? कां तुम्हीं तरूण आहां कां सुंदर आहां ? अहो तुमच्या शेंडीची अंबाडी आणि तोंडाचं बोळकं होत आलं आहे. तुमच्यावर फिदा झालेली असेल कुणी तरी सुरकतलेली आजीबाई. हो. असंच कीं नाहीं माणकुबाई ? तुमच्या पोक्तविचाराला कसं येतं ?

( माणकुबाई तोंड फिरविते. )

माना०—दाजी-साहेब आतां माझी तरी कांहीं चूक झाली आहे कां पहा या कामांत! याच पोरीनं मला लिहि-

लेलीं हीं पत्रं पहा म्हणजे माझी स्थिति तुम्हांला कळून येईल! आपल्या हातचीं पत्रं, आतां ती जर नाहीं म्हणून खोटं बोलणार असेल तर खुशाल बोलो! हीं पहा—

( पत्रें काढतो )

हीं पाहिलींत माणकी हें नांव धारण करून या तुमच्याच लीलेनं लिहिलेलीं पत्रं मीं आपल्याजवळ जतन करून ठेवलीं आहेत.

**माण०**—( अग बाई आतां सारं गुपित उघडं होणार! ) अहो. कांहीं तरी चूक झाली असेल. थांबा. मी पाहतें कांहीं करतां येतो का उलगडा मला.

**माना०**—अहो आजीबाई, माफ करा आपलं काम नाहीं त्यांत उगीच मध्यें बोलूं नये—अहो लीलाबाई, हीं जी या पत्रांतली माणकी ती तुम्हीच होय कीं नाहीं एवढं तरी सांगा देवाला स्मरून.

**लीला**—( हंसून ) देवाची शपथ, माणकी म्हणजे मी नव्हे.

**माणकू०**—( रडव्या स्वरानें ) मानाजीराव आपण असे कृतघ्न बनाल असं मला वाटलं नव्हतं कधीं. माणकी म्हणजे दुसरी कोण असणार? आपल्यावर प्रेम बसलेली हीच माणकूबाई—माणकी! मला बाई लाज वाटते.

**माना०**-( चकित होऊन खो खो हंसून ) काय म्हटलं आजीबाई? तुम्हीं का माणकी? उफ् उफ् काय

भलतंच ? आपणाला लाजायचं कारण नाहीं समजलांत आजीबाई ? आजीबाई आपले माझ्यावर फार उपकार झाले बरं ! आतां ही माझी कुचेष्टा आपण केलीत काय किंवा लीलेनें केली काय, माझ्यावर दोघींचेही उपकार सारखेच आहेत ! रंगरावजी इकडे आपले उपकार मी स्मरतों हें दाखविण्याचा मला हा प्रसंग आला आहे. आपण माझ्या मनूची स्त्री तर उपटलीतच. तेव्हां, आपणाला हवंतर वरती हें सुरकुतलेलं कोवळं माणीकही बक्षीस देतों.

**रंगराव**—( हंसून ) अहाहा मानाजीराव आपण फारच उदार आहांत. आपले उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. असो. आपण जर माणीक देऊन टाकायलाच बसला आहां तर आमच्याजवळ एक कोंदण आहेच तयार ! हें पहा हा आमचा मित्र खवीस कुत्रा रडवय्या म्हणतो लढवय्या भागूजीराव रिकामा आहे.

**मानाजी॰**—( टाळ्या वाजवून ) हा हा ! नामी जुळलं, अहो तरवार बहादूर शेंदाड शिपाई—हं उचला हें माणीक म्हणजे डोईची डोई शाबूत ठेवून सत्तेची नवी आजीबाई मिळेल अन् पैशालाही तोटा नाहीं मग !

**भागूजी॰**—अबब, ही सुरकतलेली दिपमाळ नग बा आपल्याला. आजीबाई, सवस्त न्हावा बरं तुमी ! तुम्हांला न्हाई बरं पतकरत मीं ! तुमचं तुमाला मानाजीरावच घ्या. असो. मानाजीराव, आतां आपण आपलं मेतकूट जम-

वून टाकूं ! देवाच्यान् आपण मातर मला इरईला घालून माझ तर हाल अन् धिंडवडे केलेत. पुनः तुमच्या अशा तावडींत गवसन तर इचिभन गाढीचा भागूजी न्हव.

**दार्जी०**—माणकूबाई अशा दुःखी कां होतां ? असा चेहरा पाडायला काय झालं त्यांत ? अहो तुम्ही अजून आपल्या पणांतच आहां. ( एकीकडे ) हो म्हातारपणांत आहेतच.

**माणकू०**—अहो दार्जीसाहेब—तुम्हीं पुरुष म्हणजे सारे निर्दय रानटी—

( रागानें निघून बाजूला उभी राहते. )

**दार्जी०**— अन् तुम्हीं थेरडया म्हणजे साऱ्या मूर्ख.

( रंगभूमीच्या एका अंगास )

**जम्ना**—( स्वगत ) अगबाई, स्वारी तर अगदीं उदास अन् दुःखी दिसते आहे. त्यांनीं मला सांगितलं तें अगदीं कांहीं सारंच खोटं नव्हतं तर मग ! असो. पण आम्ही वेळेवर आलों म्हणून बरं झालं !

**सर्जे०**—जन्मे—प्रिये तूं माफी कर असे म्हणण्याची माझी योग्यतासुद्धां नाहीं तेव्हां मीं तें कसं करूं ? माझा धीर होत नाहीं पण इतकेंच सांगतों कीं, पश्चात्तापानें नेहेमीं सदाशा उत्पन्न होते.

**जम्ना**—असं काय बोलायचं तें ! आपणा उभयतांचा

तऱ्हेवाईकपणा आहे तो केवळ प्रेमामुळं आहे हें आतां चांगलं कळून आलं आहे. आपल्या मनावरन दुसऱ्याची परीक्षा केली म्हणजे सारं कांहीं कळतं ?

**सर्जे०**—प्रिये, आतां मात्र मी धन्य झालों.

( इतक्यांत दाजी साहेब येतात. )

**दाजी०**—अं हें काय चाललं आहे इकडं ? कां अजून तुमचं भांडणच चाललं आहेना ! आतां मात्र तुम्ही शिकस्त केलीत. जम्ने, आतांपर्यंत मी तुमच्यामध्यें पडलों नव्हतों. आतां शेवटीं तरी मला मध्यें पडून यश घेऊं दे. सर्जेरावाचे जे जे कांहीं दोष म्हणून तुला वाटत असतील ते सर्व तुझ्यावरच्या नाजुकप्रेमानें उत्पन्न झाले आहेत हें लक्ष्यांत ठेव. आतां विलंब करूं नको. आपलं अनुमोदन देऊन त्याला एकदांचा सुखी करून टाक. म्हणजे पहा त्याचे दोष कसे चटकन् निवळतील ते. मी जरा रंगरावाकडे जातों ( जातो. )

( रंगभूमीचे दुसरे बाजूस )

**रंग०**—प्रिये, लीले, ही परीक्षेची वेळ आहे. याकरितां आश्चर्य वगैरे कांहीं वाटलं असं दाखवूं नकोस ! तुझा आनंद तुझं आश्चर्य सारे भाव अगदीं दाबून ठेव क्षणभर.

**लीला**—( स्वगत ) अगबाई. हे तर गुलाबराव आता काय करूं ? त्यांनीं आमच्या काकी साहेबाप्रमाणें दाजीसाहेबांनाही फसविलं कीं काय ?

रंग०—प्रिये, कां इतकी उदासवाणी कां! मगासचे प्रेमोत्कर्षांचे वारें फिरलें कीं काय?

लीला—असं कसं बरं होईल? या कंठांत प्राण आहेत तोंपर्यंत असं होईल कां माझ्या हातून?

लीला—आपल्याला असं कां वाटतं कीं, माझ्या त्या खुळ्या काकूबाईनीं कितीही जरी धमकी दिली तरी त्याला मी एवढं तरी भिईन! रंगराव बिंगराव कांहीं कां म्हणेनात, आपले गुलाबराव माझे!

( इतक्यांत दाजी साहेब जवळ येतात. )

दाजी०—काय गुलाबराव-कुठला गुलाबराव-अं:? काय काय म्हणते काय लीला—हा माझा पुतण्या रंगराव पुढं उभा असतांना—गुलाबराव—!

लीला—तें काय म्हणून! हे उभे आहेत हे गुलाबराव नव्हेत कां?

दाजी०—लीले, तुझा मगज बिघडलाग बिघडला खास. पुस्तकें वाचून वाचून तुला वेड लागलें. अरेरे! पण—थांबाहो. ( विचार करून ) आधीं ह्या सोद्याची कांहीं कुचेष्टा असली तर—हं—जुळलं—अहो पुणेरी भामटे—अहो रंगराव महाराज, इकडे या पाहूं! ( त्याच्या हाताला धरून पुढें ओढतो ) हे अद्भुत पुरुषा जादुगारा—बोल बाबा. तूं कोण—तूं कोणी यक्ष, पिशाच्च, वेताळ आहेस कीं लीलेच्या डोळ्यांतला गुलाबराव कीं माझ्या भावजयीच्या पोटांतला—माझा पुतण्या रंगराव—?

**रंग०**—( शांतपणानें ) हं. खरंच पुसाल कीं नाहीं—तर—माझा मी कोण याचा माझा मलाच अजून उलगड झालेला नाहीं. जरा दमान घ्याल तर हळुं हळुं आठवण करून सांगेन म्हणतो—हो पाहतो विचारकरून—सुचजें कां ?—

**दाजी०**—बरं आपण माझे पुतणे होय कीं नव्हे, याचं तरी एकदां उत्तर द्या पाहूं ! हो. माझा मान गेला हं:—आतां बोलून काय उपयोग ! पण आपले वाडवडील यांना स्मरून एकदां सांगा काय सांगतां तें !

**रंग०**—( स्वगत ) देवा—आतां या वेळेस तुझ्या साऱ्या जगांत जो काय असेल नसेल तो निर्भीडपणा व धिटाई माझ्या मदतीला पाठीव, नाहीं तर माझी अवस्था कठिण आहे. ( उघड ) सांगूंच तर आतां ऐका—काकासाहेब. आपल्याच भावाचा व भावजयीचा मी मुलगा आहें हें खास. अर्थात् मी आपला पुतण्या रंगराव आहें. आणि आजपर्यंतच्या माझ्या नम्र आचरणानें आपल्याला तें खरं वाटत असेलच. लीले——गुलाबराव म्हणजे मीच. तुझ्या स्वभावाचा तऱ्हेवाईकपणा पण दिलदारी पाहून मी हें गरीबीचं नांव धारण केलेलं कायम ठेवलं आहे. तुझं अकृत्रिम आणि निरभिलाषी प्रेम पाहण्याला या नांवाचा चांगला उपयोग झाला. आतां तुझ्या परवानगीनें हें टाकून देऊन माझं खरं व अधिक वैभवाचं नांव धारण करीन म्हणतो.

लीला—( त्रासून व झणकाऱ्यानें बाजूला जाऊन उभी राहते. )

दाजी०—रंगराव—तुझ्या धारिष्टाची आणि उद्धट-पणाची कमालच झाली ! तुझ्यासारखा धीट आणि निर्भीड तुझा तूंच.

रंग०—छेः छेः काकासाहेब. आपण माझी उगीच स्तुति करून हरभऱ्याच्या झाडावर चढवूं पहातां. वास्तविक अंगची मर्यादा हाच माझा अवगुण मला बाधक झाला. अहाहा. आपण म्हणतां तसा मी असतों तर किती मौज झाली असती.

दाजी०—( हंसून ) तें असो म्हणा. पण, तूं नो मला मठ्ठ कुचकामाचा माणूस दिसत होतास तसा खरो-खर नाहींस हें पाहून मला फार आनंद होत आहे. बरं रे पोरा. आपल्या चुलत्याला असं फसविलंस अन् मूर्ख ठरविलंस अं ! अन् गुलामा हाच कां तुझा. पश्चात्ताप न् तुझा नम्र आज्ञाधारकपणा !! वाहवारे वहावा. तरी मला त्या वेळेला वाटलंच कीं ढोंग आहे म्हणून ! कारण तुझा नूर एकदम बदलला !! अन् थापा काय मारल्यास ( वेडावून ) मीं त्यांना कध्धीं पूर्वीं पाहिलंही नाहीं.— त्यांचं नांव सुद्धां ऐकलं नाहीं; नव्हे का ?—काय म्हणे— " ते खलपटण्याचे मोहिते नव्हे कां ?." आणखी काय —हं—"आपल्या इच्छेप्रमाणें मी वागलों असं झालं म्हणजे

त्यांत सर्व कांहीं आलं–"–हो तें बरोबरच आहे. तुझ्या मनांतलीच गोष्ट झाली तेव्हां कां नाहीं तूं माझं ऐकणार ? अरे ठगा—हो हो बरी आठवण झाली, " ती लीला म्हणजे जरा तिरवी बघती अन् भुऱ्या के· साची " तीच नव्हे कां ती पहा तिरशी पाहते आहे. अस्तु काय राजश्री ! आपल्या ढोंगाचा भोपळा फुटला आपल्या डोक्यावरच; आतां कां मान खालीं घालतां !

रंग०–काका साहेब. माझ्या मनांतल्या गोंधळाला पारावार नाहींसा झाला आहे. माफ करा. माझी भीडमर्यादा आतां मला फार अवजड झाली. यांतून मी कांहीं वांचत नाहीं. माफ करा. आतां आणीक किती माझी फजीति कराल. झालं तेवढं पुरें नाहीं का ! क्षमा करा. ( हंसून ) मी कीं नाहीं तुमच्या पाया पडतों.

दाजी०–(आपल्याशीं) बरं बरं–जाऊंद्या पोर आहे. द्या सोडून. असो. सर्व यथास्थितच झालं आहे मनासारखं! तेव्हां आतां सारा विनोद मानायला हरकत नाहीं! चला, आपण सर्जेरावाला आणि जन्माबाईला घेऊन येऊं (जातां जातां) बरं कसं काय रंगराव ! गाल अन् डोळे, मीं सांगितले तसे आहेत कीं नाहीं ? मीं सांगितलें तस्से ! उगीच नाहीं म्हटलं निवडून काढली ! चला, आपलं काय ! त्यांचे आतां दिवसच आहेत ! कशाला उगीच त्यांच्या प्रेमाच्या आड ! छेः छेः मला फारच आनंद झाला आहे बुवा ! चला–( जातो· )

( लीला त्रासून उसासा टाकते )

**रंग०**—( स्वगत ) हें वाक्विवाचं चिन्ह दिसतं वरं का ? हा उदासपणा अनिष्ट दाखवितो बुवा ! वारा तर वाहूं लागलाच. पाणीही डोळ्यांत डळमळतं आहे असं वाटतं ! ( उघड ) प्रिये लीले, लीलाबाई-म्हटलं आतां इथं दुसरं तिसरं कुणी नाहीं. मग हा भिडस्तपणा अन् गंभीरपणा पुरे नाहीं का झाला ?

**लीला**—( त्रासून ) काय म्हणणं आहे आपलं महाराज !

**रंग०**—( दचकल्यासारखें दाखवून ) ( स्वगत ) तरी मला वाटलंच. ( उघड ) प्रिये, या तुझ्या महाराज शब्दानं माझ्या अंगावर बर्फाचा पर्वत कोसळल्यासारखं दुःख झालं ! लीले, आपल्या परस्पर आणाशपथा झाल्या त्यांना आतां आपल्या वडील माणसांच्या संमतीनं चांगला जोर आला असं असून—

**लीला**–( त्रासून ) होहो. संमती तर. तें काय विचारावं !

**रंग०**–प्रिये, पैशावर लाथ मारून नुसत्या प्रेमाच्या उबेनं दारिद्र्यांत दिवस काढावे ही तुझ्या मनची हौस होती खरी. पण नाइलाज होऊन आपल्या घरीं, थोडासा पैसा जर चालून आलाच आहे तर आपण काय करणार? कसं तरी करून जें काय सुखसमाधान मिळेल तें सोसूं

झालं. मग करायचं काय? अन् लग्नाचा समारंभ अन् सोहळा असा फक्कड उडवून देऊं कीं ज्याचं नांव तें.

**लीला**–जळला मेला समारंभ न् सोहळा.

**रंग०**–प्रिये अशी रागावूं नकोस. मी तुझी विनवणी करतों पहा—

**लीला**–विनवणी तर—काय विनवणी!

**रंग०**–बरं राह्यलं. हे पहा तुझी प्रीति जर मला मिळती आहे तर मला तो हुंडा नकोच आहे. मी तो गंगार्पण करतों—मग तरी झालं!

**लीला**–प्रीति—अगबाई. प्रीति का अशी वाटेवर पडली आहे वाटतं! आपण जी प्रीति संपादन केली होती ती कपटानं मला फसवून संपादन केली होती हें आतां उघडकीला आलं! आपणाला काय पोर वाटलें कां मी हवी तशी फसवायला! मी तऱ्हेवाईक म्हणून माझी थट्टा कां चालविली होती आपण! आणि मी चांगलीं सपशेल फसले अन् आपणाला या कपटांत जय मिळाला म्हणून पुनः हंसतां काय मला?

**रंग०**–( वाईट तोंड करून घाईघाईनें ) छेः छेः छेः हें काय—? हें काय? प्रिये. अन्याय आहे. अशी कां आग पाखडतेस बरं माझ्यावर! ऐकून तरी घेशील कीं नाहीं जरा—

**लीला**–( रडव्या स्वरानें ) पुरे पुरे. काय ऐकायचं आहे. मी आपली मनांत समजत होतें कीं, माणकूबाई-ची चांगली फजिती करणार आहें म्हणून—तर शेवटीं माझीच उलट फजिती करून माझं हासं केलंत नाहीं कां? ( इकडे तिकडे फिरून ) बरं आहे–हें पहा. ही गुलाबरावाची तसबीर–तुमचीं नव्हे–( बोटांतून तसबि-रीची आंगठी काढून)ही आंगठी–लोक नांव ठेवीत असतां–आमच्या काकूबाई धमकी धाक दाखवीत असतां निवळ प्रेमानं रात्रंदिवस अगदीं उराशीं बाळगली.—ती ही घ्या तुमची तुम्हाला लखलाभ असो—( फेंकते ) जसं चित्र तसा चित्राचा धनी सुद्धां मी आपल्या हृदयांतून काढून टाकून दिला हेंच समजा बरं कां!

**रंग०**–छेः छेः प्रिये, असं करूं नको इकडे पहा. ही पाहिलीस कां लीलेची तसबीर ( आंगठी काढते ) याच सुंदर दिव्य चेहऱ्याच्या गोड सुहास्यानं, माझ्या आशा-लतेनं जीव धरला बरं कां! प्रिये, तूं जें वचन दिलंस तें मदनानं कमलपत्रावर प्रेमरसाच्या लाल शाईनं लिहून ठेवलं त्याची शाई सुद्धां अजून जशीची तशी ओली आहे. ज्या ओंठांनीं तें वचन उच्चारलें ते हेच बरंकां! ( तसबि-रीवर दाखवून) या हल्लींच्या तुझ्या उग्र स्वरूपांत आणि यांत किती बरं फरक आहे!! छे, तूं हवं तसं कर पण ह्या आंगठींतली लीला जो पर्यंत मजकडे प्रेममुद्रेनं पाहते

आहे तोपर्यंत तरी मी तिला अगदी पहिल्याप्रमाणें उराजवळ घट्ट बाळगून धरणार. तुझ्यापेक्षां ही फारच चांगली आहे बुवा! ( आंगठी ठेवतो ). असो. पण प्रिये, झालं तें होऊन गेलं आतां काय ?

**लीला**—( रडव्या स्वरानें ) आतां काय ! हुंः हें सगळं करणं—आप—आपलंच आहे म्हटलं ! बरं असो आतां तरी झालं ना एकदाचं मनाचं समाधान !

**रंग०**—हो हो झालं की ! न व्हायला काय झालं आहे ! पण लीले तुझ्या अंगांत पाणी आहे बरं कां !

**लीला**—हो म्हणूनच डोळ्यांतून येतं आहे.

**रंग०**—( एकदम पुढें होऊन व तिला कवटाळून ) प्रिये बस्स झालं. अग विनोदाला सुद्धां सीमा आहे. तुझ्या प्रत्येक आठीबरोबर माझ्या काळजांत चरके कसे बसतात हें जर तुला कळलं तर तूं हा खोटा सुद्धां राग तेव्हांच सोडून हंसत हंसतच मला मिठी मारशील. काय !—नाहींना ? नाहीं तुला माझी दया येत ? ठीक आहे. ( तिला सोडून दूर जातो व कटयार उपसून हातीं घेतो ) लीले ! कांहीं हरकत नाहीं. तुझी प्रीति कांहीं वाटेवर पडली नाहीं ! तुझ्यासारख्या मानी स्त्रियेच्या प्रेमपाशांत गुंतून तनमन वाहण्याचा मी घोर गुन्हा केला याबद्दल क्षमा कर. प्रायश्चित्त घ्यायचें तें माझ्या हातांत आहे. तें हें पहा तुझ्या समोर घेतों. हें मला एका घटकेपूर्वीच घेतां आलें असतें. पण काका साहे-

बांनीं मध्येंच येऊन माझा घात केला. असो. प्रियें, ही कटयार फुकट त्या मानाजी रावावर चालवून विटाळणार होतो ती आयतीच ह्या प्रेममंदिरांत जाऊन तुझ्या नागीं खुशाल बसेल. माझ्या काळजांतल्या अस्सल रक्तानं माखलेली तिची जीभ कधींही खोटं बोलणार नाहीं. तिलाच विचार हा रंगराव कसा होता तो—( कटयार वर उचलून खुपसून घेण्याचा आविर्भाव करतो तोंच लीला येऊन त्याला मिठी मारते ). सोड सोड प्रिये. या चांडाळाला त्याच्या लबाडीचं प्रायश्चित्त घेऊंदेच.

लीला—( गादीवरून व त्याचे तोंडाकडे पाहून ) हर हर. मी चुकले. क्षमा करा. प्रिया खरंच किती मी निर्दय. किती ग बाई मी वेडी ? नांवांत तें मेलं काय आहे ? गुण तेच ना ? गुलाबाला गुलाब न म्हणतां, गुलछबु किंवा गुलनार म्हटलं तरी तो जातीचा गोड सुवास कां बदलेल ! ( आनंदानें मिठी मारते. )

२२८३